नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक ९० * ** नागपूर ** शनिवार, दिनांक २८ जून २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## बब्बर खालसाचे ३ हस्तक अटकेत

■ वृत्तसंस्था, चंदीगड, दि. २७ :
पंजाब पोलिसांच्या मोहाली येथील राज्य विशेष ऑपरेशन सेलने पाकिस्तानी आयएसआय समर्थित बब्बर खालसा इंटरनॅशनल (बीकेआय) च्या दहशतवादी नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे.
हे मॉड्यूल यूकेस्थित निशान सिंग आणि पाकिस्तानस्थित दहशतवादी हरविंदर रिंदा चालवत होते. पोलिसांनी एका अल्पवयीन मुलासह तीन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्याकडून २ हँडग्रेनेड, १ ग्लॉक पिस्तूल आणि इतर स्फोटके जप्त करण्यात आली. आरोपी अमृतसरमध्ये पोलिस प्रतिष्ठानांवर हल्ला करण्याचा आणि लक्ष्यित हत्या करण्याचा कट रचत होते. अटकेमुळे दहशतवादी कट उधळून लावण्यात आला आहे.

अग्रलेख
## खरीखरी..
# मित्रविहीन पोकळी

पहलगाम येथे भारतावर आतंकवादी हल्ला झाला. भारतात त्याविरुद्ध जबरदस्त प्रक्रिया उमटणे स्वाभाविकच होते. पण जगातील दोन महाशक्ती म्हणजे चीन आणि अमेरिका यांनी अजूनही पाकिस्तानच्या चिथावणीवरून भारतावर आतंकवादी हल्ला झाला आहे. हे दिसत असूनही त्यांनी ती गोष्ट मान्य केलेली नाही. लहरी लाला ट्रम्प पाकिस्तानच्या जनरलला आपल्या पांढऱ्या प्रासादात म्हणजेच व्हाईटहाऊस मध्ये बोलवून त्याला मेजवानीचा प्रसाद देतो. गंमत अशी आहे की, त्यावेळी पाकिस्तानचे प्रधानमंत्री एक शब्दही तौंडातून काढत नाहीत. यावरून पाकिस्तानात खुर्चीवर कोण आहे आणि सत्ता कोणाची आहे. याचा सबंध जगभराला बोध व्हावा. या ट्रम्पाचे डोके कधीच सरळ चालत नाही. बुद्धिबळामध्ये घोडा जसा अडीच घरे चालतो. तसाच हा घोड्यासारखा ट्रम्प उलटसुलट चालत असतो. मात्र अमेरिकेत लोकशाही असल्यामुळे या ट्रम्पविरुद्ध बरेच पत्रकार आणि बडीबडी वृत्तपत्रे आहेत. जी त्याच्या अनाकलनीय धोरणाबद्दल विरोधात्मक लिहीत आहेत. हे सहज दिसून येते. विशेष म्हणजे त्या बातम्या जगभर प्रसिद्ध होऊ शकतात. आताही इराण आणि इस्त्राईल युद्धात या ट्रम्पाने शेवटी सपशेल शेपूट घातले. यावरून ट्रम्पाळलेली अमेरिका हे ट्रम्पाळलेले शैवाळ अमेरिकेच्या हिताचे नाही. हेच समजून चुकलेली आहे. अमेरिकेच्या कायद्याप्रमाणे या ट्रम्पाला पुढील साडेतीन वर्ष झेलणे भाग आहे. पण आपले पंतप्रधान मोदी साहेबांचा हा तथाकथित मित्र भारताला घडीघडी अपमानीत करीत असतो. भारतामध्ये अमेरिकन महिलांनी जाऊ नये. हे करू नये. ते करू नये, वगैरे सारख्या ॲडव्हायझऱ्या अगदी झारून झारून देत असतो. त्यातून भारताची जेवढी बदनामी होईल. तेवढी करण्याच्या या ट्रम्पाचा खाक्या आता आपल्याला दिसून आलेला आहे. आपला देश शांततावादी आहे म्हणून त्या ट्रम्पाच्या माकड चेष्टांवर आपण गप्प राहतो. ही आपली महत्ता आहे. हे झाले अमेरिकेचे, आता आपण लोकशाही धोरण नसलेल्या चीन बाबतची गोष्ट बघूया. कालपासून चीनच्या किंग दावो नावाच्या शहरात शांघाय सहयोग संघटनेच्या नावाखाली तेथील संरक्षण मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीत भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंगही उपस्थित होते. तसेच त्यामध्ये पाकचे संरक्षण मंत्री ख्वाजा यांचाही सहभाग होता. राजनाथ सिंग यांनी त्या पाकड्या संरक्षण मंत्र्यांची अजिबात भेट घेतली नाही. आपल्या भारताच्या संरक्षण मंत्र्यांनी शांघाय सहयोग संघटनेच्या संयुक्त पत्रकावर हस्ताक्षर म्हणजे स्वाक्षरीसुद्धा केलेली नाही. म्हणजेच भारताने आपला विरोध अगदी ठाम पणाने प्रकट केलेला आहे. (असा ठामपणा अमेरिकेबाबत का व्यक्त होत नाही) या संयुक्त पत्रकात जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम मध्ये झालेल्या आतंकवादी हल्ल्याचा उल्लेखही करण्यात आलेला नव्हता. पाकिस्तानच्या बलुचिस्तान जी एक छोटीशी घटना घडली. त्याचा मोठ्या गाजावाजाने उल्लेख करण्यात आलेला होता. त्यामुळे आपल्या संरक्षण मंत्र्यांनी जो आक्रमक पवित्रा घेतला. त्याला निश्चितच महत्त्व आहे. राजनाथ सिंग म्हणाले की, पाकिस्तान आतंकवाद्यांना पैसा पुरवते. थोडक्यात पाकिस्तानात त्या आतंकवाद्यांचे प्रयोजक आहेत. भारतामध्ये आतंकवादी घटना करून पळालेल्या गुन्हेगारांना पाकिस्तानमध्ये अभय मिळते. असे असूनही पाकवर दोषारोप होत नाही. यावरून राजनाथ सिंग यांनी खडेबोल सुनावले. आपल्या येथे शांती, सुरक्षा आणि विश्वासाची कमतरता आहे. हीच मोठी समस्या आहे. कट्टरता, उग्रवाद आणि आतंकवाद यांच्यासोबत शांतता आणि समृद्धी चालू शकत नाहीत. हे राजनाथ सिंग यांनी स्पष्ट केलेले आहे. आतंकवादाबद्दल ज्या ठिकाणी असे दुहेरी मापदंड आहेत. त्या ठिकाणी आपण उपस्थित राहून आपला दुहेरी मनस्ताप करून घेण्याची गरज आहे काय. याचाही विचार आता झाला पाहिजे. सध्या पाकिस्तान, जो अमेरिकेचाही लाडका आहे आणि चीनचाही लाडका आहे. त्यामुळे हे दोन्ही देश पाकिस्तानला मुक्तहस्ते भीक देण्यास तयार आहेत. या सर्व प्रकरणात भारताकडे किती मित्र देश आहेत. याचाही आपल्याला विचार केला पाहिजे. आपल्याच अटल बिहारी वाजपेयी यांनी म्हटल्याप्रमाणे शेजारी बदलता येत नाहीत. पण शेजा ?यांसोबत मैत्री करता येते. आजच्या घडीला एकही शेजारी आपल्याबरोबर नाही. एक बांगलादेश चांगला मित्र होता. त्यानेही भारताबरोबर उभा दावा मांडलेला आहे. इतर आजूबाजूचे सर्व शेजारी भारताबरोबर नाहीत. जागतिक पटलावर सुद्धा आपले मित्र किती आहेत. याचा शोध घेतल्यावर दोन्ही हाताच्या बोटावर मोजण्याइतके मित्रही आपण कमावलेले नाहीत. अशी आपली खरीखरी परिस्थिती आहे. या संमेलनापूर्वी झालेल्या जी - ७ संमेलनातही भारताला काहीच भाव दिला गेला नव्हता. म्हणून आपल्याला आपले मित्र देश वाढवणे गरजेचे आहे. कठीण परिस्थितीमध्ये आपल्याबरोबर कोण कोण येतील. याचा शोध आता आपणच घेतला पाहिजे. सध्याही आपल्या भोवतीची जी मित्रविहीन पोकळी आहे. ती आजमितीला अत्यंत चिंताजनक आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## हिंदीच्या भाषेच्या सक्तीवर
# महायुतीमध्येच मतभेद

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २७ :
पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावी. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे, अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मांडली आहे. तसेच पाचवीपासून हिंदी शिकवली तरी काही हरकत नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपला पुरक अशी भूमिका घेतली आहे.
अजित पवारांनी थेट भूमिका मांडली असली तरी भाजपमुळे शिवसेना शिंदे गटाची कुठेतरी गळचेपी होत आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. एकनाथ शिंदे यांनी थेट भूमिका मांडणे टाळले असून विरोधकांवरच खापर फोडले आहे. तर दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटाने मनसेसोबत मैदानात उतरण्याचे ठरवले आहे. ५ मार्च रोजी महायुती सरकारच्या या निर्णयाविरोधात ठाकरे बंधू एकत्र येणार आहेत.
राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधामध्ये ठाकरे बंधू एकत्र आले आहेत. दोन्ही ठाकरे बंधू जर मोर्चा काढणार असतील तर एकत्र का नाही? असा प्रश्न त्यामुळे राज्यात विचारला जात होता. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील शाळेत हिंदी विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट त्यांनी केली आहे. त्यामुळे हिंदी सक्ती विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार हे निश्चित झाले आहे.

### अजित पवार म्हणतात, पहिली ते चौथी हिंदी नको
### एकनाथ शिंदेंची भूमिका भाजपला पुरक

**पाचवीपासून हिंदी सक्ती करावी**

सध्या महाराष्ट्रात हिंदी सक्तीच्या विरोधात मोठा वाद सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पत्रकारांनी अजित पवारांना प्रश्न विचारला असता त्यावर पवार म्हणाले, पहिली, दुसरी, तिसरी आणि चौथी या वर्गात हिंदी असू नये. पाचवीपासून हिंदी असावी. पहिलीपासून मुलांना मराठी शिकवावे, त्यांना मराठी लिहिता, वाचता यावे. मुले पहिलीपासून मराठी लिहायला वाचायला शिकतात तेव्हा हिंदीही लिहिता वाचता येते फक्त बोलण्यासंदर्भात असेल तर पाचवीपासून हिंदी शिकवली तरी काही हरकत नाही. पाचवीपासून हिंदी सक्ती करावी.


उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर प्रतिक्रिया देताना म्हटले, आमचे मंत्री दादा भुसे अनेकांना भेटत आहेत. हिंदी भाषेवर ज्यांनी आक्षेप घेतला आहे त्यांच्याशी चर्चा केली जाईल. त्यांच्याशी सल्लामसलत केली जाईल. आम्ही हिंदी अनिवार्य शब्द काढला आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. जोरजबरदस्तीने निर्णय घेणार नाही. आम्ही सर्वांशी बोलल्यानंतर यावर निर्णय घेऊ. मी मुख्यमंत्री असताना मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवला, महाराष्ट्रात मराठी भाषा सक्तीची केली. जनतेच्या हिताचा निर्णय घेतला जाईल असे सांगत शिंदे यांनी मात्र हिंदी भाषा सक्तीवर थेट भूमिका घेणे टाळले.

## हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा
### उद्धव ठाकरेंचे आदेश : मोर्चात शरद पवारांच्या एनसीपीचाही सहभाग

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

उद्धव ठाकरे यांनी हिंदी सक्तीच्या सरकारच्या निर्णयाला कडाडून विरोध केला आहे. अशातच आता हिंदी सक्ती विरोधात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन करा आणि हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा, असे आदेश उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले आहेत.
दुसरीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हिंदी सक्तीच्या विरोधात ५ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढणार आहेत. ना कुठला झेंडा, फक्त मराठीचा अजेंडा असा नारा देत दोन्ही बंधूंनी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. त्यात आता शरद पवारांच्या राष्ट्रवादीनेही पहिली ते चौथी हिंदी नको अशी भूमिका घेत या मोर्चात सहभागी होण्याचा निर्णय जाहीर केला आहे. याबाबत पक्षातर्फे निवेदन जारी करण्यात आले आहे.
उद्धव ठाकरे यांनी आज जिल्हाप्रमुखांशी ऑनलाईनद्वारे संवाद साधला. यावेळी उद्धव ठाकरेंनी राज्यभरात आंदोलन करण्याचे आदेश दिले आहेत. रविवारी दुपारी ३ वाजता हिंदी सक्ती विरोधात प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आंदोलन करत शालेय शिक्षण विभागाकडून काढण्यात आलेल्या हिंदी सक्तीच्या जीआरची होळी करा, असे उद्धव ठाकरेंनी जिल्हाप्रमुखांना सांगितले.
महाराष्ट्र सरकारने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याअंतर्गत त्रिभाषा सूत्राच समीकरण पुढे करत इयत्ता पहिलीपासून शालेय अभ्यासक्रमात हिंदी भाषा बंधनकारक करण्याचे योजिले आहे. कुणालाही न जुमानता राज्य सरकार 'हिंदी सक्ती' साठी हट्ट धरून बसलं आहे. हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी ५ जुलै रोजी तमाम मराठीजनांकडून मुंबईत एक मोर्चा पुकारण्यात आला आहे.
'राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार' पक्षाचा या मोर्चाला संपूर्ण पाठिंबा आहे. ५ जुलैच्या मोर्चात प्रचंड संख्येने आवर्जून सहभागी व्हा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवेदनात करण्यात आले आहे.

## एसी तापमानाचा नियमच नाही..

■ वृत्तसंस्था
नवी दिल्ली, दि. २७ :
एअर कंडिशनरचे तापमान २० ते २८ अंशांच्या दरम्यान ठेवण्याचा नियम आता लागू केला जाणार नाही. केंद्रीय पर्यावरण मंत्री भूपेंद्र यादव यांनी शुक्रवारी नवी दिल्ली येथे झालेल्या इंडिया क्लायमेट समिटमध्ये ही माहिती दिली.
भूपेंद्र यादव म्हणाले, सरकार सध्या एसी तापमान निश्चित करण्यासाठी नियम आणणार नाही. हा बदल हळूहळू आणि कालांतराने केला जाईल. हे २०५० नंतरच शक्य होऊ शकते. यापूर्वी ११ जून रोजी ऊर्जा मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी सांगितले होते की, लवकरच २० ते २८ अंश सेल्सिअसच्या निश्चित मर्यादेत एसी चालवणे अनिवार्य केले जाईल.
खट्टर म्हणाले होते, एसी तापमान सेट केल्याने विजेची मागणी कमी होईल. एसी उत्पादक कंपन्यांसाठी नवीन नियमामुळे कूलिंग चांगले होईल. यामुळे उन्हाळा वाढत असताना विजेची मागणी कमी होण्यास मदत होईल. प्रत्यक्षात असा नियम नसल्याचे भूपेंद्र यादव यांनी आज स्पष्ट केले.

## ठाकरे बंधूंचा मोर्चा निघूच देणार नाही
### वकील गुणरत्न सदावर्ते यांचा दावा

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
हिंदीच्या सक्तीविरोधात ठाकरे बंधूंनी संयुक्तपणे ५ जुलै रोजी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. यामुळे अवघ्या राज्याचे राजकारण ढवळून निघाले असताना आता वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाला कडाडून विरोध दर्शवला आहे. आपण कोणत्याही

स्थितीत हा मोर्चा निघू देणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांनी या प्रकरणी राज ठाकरे यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे.
गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाला कडाडून विरोध दर्शवला आहे. मी राज ठाकरे व उद्धव ठाकरे यांचा मोर्चा निघू देणार नाही. हा मोर्चा म्हणजे ठणठण गोपाळ आहे. जे नियम सर्वसामान्य नागरिकांना आहेत, तेच नियम यांनाही लागू असले पाहिजेत. राज व उद्धव ठाकरे खोटे नरेटिव्ह पसरवत आहेत. त्याला आमचा विरोध आहे. ठाकरेंचा मोर्चा अन्यायकारी आहे. कोर्टाच्या निर्देशानुसार त्यांना मोर्चा काढता येणार नाही. त्यांचा मोर्चा बेकायदेशीर आहे. हा बाळगोपाळांचा मोर्चा असल्याचे सदावर्ते यांनी म्हटले आहे. राज ठाकरेंवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

### सैनिकांच्या माघारीशी संबंधित कराराचे
# पालन व्हायलाच हवे


राजनाथ सिंह यांनी चीनी संरक्षणमंत्र्यांना मधुबनी चित्र भेट दिले

■ वृत्तसंस्था, बीजिंग, दि. २७ :
एससीओ शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर भारत आणि चीन यांच्यात शुक्रवारी संरक्षण मंत्र्यांची द्विपक्षीय बैठक झाली.
भारताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि चीनचे संरक्षण मंत्री ॲडमिरल डोंग जून यांनी त्यात भाग घेतला. राजनाथ सिंह यांनी चीनच्या संरक्षण मंत्र्यांना बिहारचे मधुबनी चित्र भेट दिले. या बैठकीत राजनाथ सिंह यांनी चीनशी राजनैतिक संबंध सुधारण्यासाठी ॲडमिरल डोंग जून यांना ४ कलमी योजना सादर केली.
सैन्य मागे घेण्याबाबत २०२४ चा करार पूर्णपणे अंमलात आणला पाहिजे. सीमेवरील तणाव कमी करण्यासाठी सतत प्रयत्न.
सीमा निश्चित करण्याची प्रक्रिया जलद करण्यासाठी.
मतभेद दूर करण्यासाठी आणि संबंध सुधारण्यासाठी विशेष प्रतिनिधींच्या पातळीवर चर्चा करणे.
बैठकीनंतर राजनाथ सिंह म्हणाले की, दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांवर रचनात्मक आणि भविष्यसूचक चर्चा झाली.
राजनाथ सिंह यांनी दोन्ही देशांमध्ये चांगले शेजारी संबंध निर्माण करण्याची आणि आशियामध्ये स्थिरतेसाठी एकत्र काम करण्याची गरज यावर भर दिला. त्यांनी कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाल्याबद्दल प्रशंसा केली.
यासोबतच त्यांनी जम्मू-काश्मीरमध्ये अलिकडेच झालेल्या दहशतवादी हल्ल्याची आणि पाकिस्तानमध्ये भारताच्या कारवाईची माहिती चीनच्या संरक्षणमंत्र्यांना दिली.

## लॉ कॉलेजमध्ये सामूहिक बलात्कार

■ वृत्तसंस्था
कोलकाता, दि. २७ :
येथील आर जी कर महाविद्यालय आणि रुग्णालयातील एका महिला डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आल्याची घटना घडली होती.
त्या प्रकरणानंतर आता कोलकातामधील एका लॉ कॉलेजमध्ये एका विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात तीन जणांना अटक करण्यात आल्याची माहिती सांगितली जात आहे. तीन आरोपींपैकी एक आरोपी तृणमूल काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेचा नेता असल्याचं सांगितलं जात असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

## गुणरत्न सदावर्तेला एक दिवस मराठी माणूस जाम चोपेल


■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :
महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणात हिंदी भाषेच्या सक्तीच्या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे तसेच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे मोर्चा काढणार आहेत. परंतु, या मोर्चाला गुणरत्न सदावर्ते यांनी विरोध केला आहे. त्यांनी केलेल्या विरोधाला मनसे नेते अविनाश जाधव यांनी चांगलेच प्रत्युत्तर दिले आहे.
अविनाश जाधव म्हणाले, सदावर्ते हा भाजपने पाळलेला माणूस आहे. या आधी सिद्धिविनायक मंदिराच्या विषयातही त्याने उडी मारली. एवढीच हिम्मत असेल तर जा न तिकडे साऊथमध्ये. तू

स्वतःला एवढा ज्ञानी समजतो ना मग तिकडे जाऊन विरोध करून दाखव. याला मराठी माणूस एक दिवस जाम चोपेल. आमची भाजपला विनंती आहे की, याच्या तोंडाला पट्टी बांधावी, नाहीतर याच्या तोंडात दात नसतील, असा जाधव यांनी हल्लाबोल केला आहे.

## सीएमच्या ताफ्यातील वाहनांमध्ये डिझेलऐवजी भरले पाणी

■ वृत्तसंस्था, भोपाळ, दि. २७ :
मध्य प्रदेशमध्ये एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ वाहनांमध्ये डिझेलऐवजी पाणी भरल्याचा प्रकार समोर आला आहे.
या प्रकारामुळे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ वाहने अचानक बंद पडल्याचं पाहायला मिळालं. तसेच या घटनेमुळे पोलिस प्रशासनाचीही चांगलीच धावपळ उडाली. या घटनेनंतर संबंधित पेट्रोल पंपावर मोठी कारवाई करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.रम्यान, या घटनेनंतर संबंधित पेट्रोल पंपावर मोठी कारवाई करण्यात आली आहे.
मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांच्या ताफ्यातील १९ इनोव्हा कार गुरुवारी रात्री डिझेल भरण्यासाठी रतलाम जिल्ह्यातील एका पेट्रोल पंपावर थांबल्या होत्या. तेव्हा ताफ्यातील १९ इनोव्हा कारमध्ये डिझेल भरलं. त्यानंतर ताफा काही अंतरावर गेल्यानंतर एकाचवेळी सर्व गाड्या अचानक बंद पडल्या. ताफ्यातील १९ गाड्या एकाचवेळी बंद झाल्या. या प्रकारानंतर सदर पेट्रोल पंपावर तडक कारवाई करण्यात आली.

## डीजेच्या आवाजाने हत्ती नियंत्रणाबाहेर

■ वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. २७ :
शुक्रवारी सकाळी १० वाजता अहमदाबादमध्ये भगवान जगन्नाथांच्या रथयात्रेदरम्यान एक हत्ती नियंत्रणाबाहेर गेला आणि १०० मीटर धावला. त्यानंतर रथयात्रेत चेंगराचेंगरी झाली. लोक इकडे तिकडे धावताना दिसले. अनियंत्रित हत्ती १७ हत्तींच्या गटाच्या समोरून चालत होता. वन विभाग कर्मचाऱ्यांनी हत्तीला नियंत्रित केले.

डीजे आणि शिट्टीच्या आवाजाने हत्ती अस्वस्थ झाला आणि नियंत्रणाबाहेर गेला. सध्या रथयात्रेतून ३ हत्तींना काढून टाकण्यात आले आहे, ज्यामध्ये दोन मादी हत्ती आणि एक नर हत्ती आहे. आता १७ पैकी १४ हत्ती रथयात्रेत सहभागी होतील.
रथयात्रेत १७ हत्तींच्या गटाचे नेतृत्व करणारा हा अनियंत्रित हत्ती नियंत्रणाबाहेर गेल्याने चेंगराचेंगरी झाली. अनियंत्रित हत्ती १०० मीटर धावला. यादरम्यान लोक जीव वाचवण्यासाठी पळाले.
शुक्रवारी सकाळी रथयात्रा सुरू होती. रथ खाडिया परिसरातून जात असताना येताच, आघाडीवर चालणारा नर हत्ती अचानक गोंधळला. मोठ्या आवाजातील डीजे आणि शिट्ट्या ऐकून तो घाबरला. तो जवळच्या पोळ गलीकडे १०० मीटर वेगाने धावला, बाटेत बॅरिकेड्स तोडले आणि अनेक लोकांना खाली पाडले. तथापि, कोणीही गंभीर जखमी झाले नाही.

**मादी हत्तींच्या मदतीने नियंत्रित**
वन विभागाचे अधिकारी आर.के. साहू यांनी सांगितले की, हत्तीणीला नियंत्रित करण्यासाठी दोन मादी हत्तींची मदत घेण्यात आली. मादी हत्तींच्या उपस्थितीमुळे नर हत्ती शांत झाला आणि त्याला खाडियाजवळील एका सुरक्षित ठिकाणी बांधण्यात आले आहे. सध्या तो शांत आहे आणि निरीक्षणाखाली आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, फक्त एक हत्तीच नियंत्रित होऊ शकतो, म्हणूनच मादी हत्तींना बोलावण्यात आले.

## लेआऊट, फार्म हाऊस आणि मर्सिडीजवाल्यांना कर्जमाफी नाही

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. २७ :
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय योग्यवेळी घेण्यात येणार असल्याचे सांगितले. आता महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठे विधान केले आहे.

ले-आऊटवाल्यांना, फार्म हाऊस वाल्यांना आणि कर्ज काढून मर्सिडीज घेऊन फिरणाऱ्यांना कर्जमाफी मिळणार नाही, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. अमरावतीच्या कौंडण्यपूर येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.
चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आपल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने लाडक्या बहिणींसाठी जो महिना १५०० रुपये सुरू केला होता, तो पुढच्या काळात लाडक्या बहिणींना २१८८ रुपये देणार आहोत. आम्ही शेतकऱ्यांना शब्द दिला होता की, शेतकऱ्यांना पुढील ५ वर्षे शेतात वीजेचा बिल येणार नाही. तसेच, आमच्या सरकारने सांगितले की, खऱ्या गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी आम्ही देणार आहोत.
पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शेतीवर कर्ज काढून ज्यांनी मर्सिडीज घेतल्या, त्यांचे लेआऊट आहेत, फॉर्म हाऊससाठी कर्ज घेतलेल्यांना कर्जमाफी भेटणार नाही. धन दांडग्यांना कर्जमाफी नको, ज्यांना गरज आहे त्यांनाच कर्जमाफी मिळायला हवी. कर्जमाफीसाठी उच्चस्तरीय समिती तयार होत आहे, अधिवेशन काळात ती समिती घोषित करू, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

**बच्चू कडू यांच्यासोबत बैठक**
येत्या ३ तारखेला ४ वाजतापासून रात्री १० वाजेपर्यंत बच्चू कडू यांच्यासोबत विधानभवनात बैठक लावली आहे. माझ्या दालनात बैठक लावल्या आहेत. या बैठकीत ३ ते १० मंत्री सोबत असतील, तेव्हा महत्त्वाच्या निर्णयाचे शासन निर्णय होतील, असे बावनकुळे यांनी म्हटले आहे.

### व्हर्टिकल सातबारा येणार : इमारतीतील प्रत्येकाला स्वामित्व!

राज्यातील फ्लॅटधारकांना त्यांच्या घराचे थेट स्वामित्व मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने व्हर्टिकल सातबारा या क्रांतिकारी योजनेवर काम सुरू झाले असून, येत्या पावसाळी अधिवेशनात या संदर्भातील विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे. सध्या गावठाण तत्त्वावर असलेल्या इमारतींमध्ये राहताना रहिवाशांना सातबारा उतारा मिळत नाही. मात्र व्हर्टिकल सातबारा लागू झाल्यास, प्रत्येक फ्लॅटमालकाला त्याच्या फ्लॅटचा स्वतंत्र सातबारा उतारा मिळू शकणार आहे. त्यामुळे घराच्या खरेदी-विक्रीसह बँक कर्ज व्यवहार, वारसाहक्क हस्तांतरण या बाबी सोप्या आणि पारदर्शक होतील. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या योजनेचा प्रस्ताव तयार केला असून, अंतिम मसुद्यावर सध्या विचारविनिमय सुरू आहे.

## शिक्षणमंत्र्यांना पहिलीत पाठवा तिथेही नापास होतील : आदित्य ठाकरे



**मुंबई :** राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा एक भाग म्हणून पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना तृतीय भाषा म्हणून हिंदी शिकवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या निर्णयाला राज्यभरातून विरोध होत आहे. त्यामुळे आता या विद्यार्थ्यांना हिंदीचा केवळ मौखिक अभ्यास करावा लागेल, असे स्पष्टीकरण सरकारच्या वतीने देण्यात आले आहे. या स्पष्टीकरण नंतर आता उद्धव ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे चांगलेच संतापले आहेत. या संदर्भात आदित्य ठाकरे म्हणाले की, शिक्षणमंत्र्यांना पहिलीत पाठवा, ते तिथेही नापास होतील. हे सरकार चालवत आहेत की, कॉमेडी शो चालवतात? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात आदित्य ठाकरे यांनी सोशल मीडियावरील एका पोस्टच्या माध्यमातून सरकारच्या या भूमिकेवर कडक शब्दात टीका केली आहे. या संदर्भात आदित्य ठाकरे यांनी पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, 'शिक्षण मंत्र्यांनी स्वतः आधी शाळेत जाऊन बसावं आणि असे धडे घ्यावेत! आधीच पहिलीतल्या मुलांवर तीन भाषा शिकण्याची सक्ती, त्यात पुस्तक नाही तर मौखिक अभ्यास!!! हे सरकार चालवताएत की कॉमेडी शो? काय बोलताय, काय ठरवताय, स्वतः जरा ऐकून बघा आणि ह्यांनाच आधी पहिलीत पाठवा! तिथेही 'नापास' होतील!'

## माझ्या यशात डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे मोठे योगदान
# सरन्यायाधीश भूषण गवई यांचे प्रतिपादन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**अमरावती, दि. २७ :**

शहरातील डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचे माज्या यशात मोठे योगदान आहे. महाविद्यालयाला अभिमान वाटेल असे कार्य माज्या हातून घडावे. तसेच देशाची व समाजाची चांगली सेवा या पदावरुन करता यावी. माज्या आयुष्यात महाविद्यालयाचे महत्त्वाचे स्थान आहे, असे प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयात गुरूवारी (दि. २६) रन्यायाधीश भूषण गवई यांच्या सत्कार समारंभ आयोजित केला होता. याप्रसंगी सत्कारमूर्ती म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, मुख्य अतिथी खासदार बळवंत वानखडे यांची उपस्थिती होती. या वेळी व्यासपीठावर माजी न्यायाधीश विजय आचलिया, प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख यांची उपस्थिती होती.




या वेळी बोलताना सरन्यायाधीश भूषण गवई यांनी महाविद्यालयीन जीवनातील अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशपदी विराजमान झाल्यानंतर ज्या महाविद्यालयाने आपल्याला घडविले, त्या महाविद्यालयाला भेट दिली. त्यांनी श्री शिवाजी शिक्षण संस्था व डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालयाचा सत्कार स्वीकारला. डॉ. पंजाबराव देशमुख महाविद्यालयाने दिलेली शिकवण माज्यासाठी महत्त्वाची आहे. महाविद्यालयात मिळालेल्या मार्गदर्शनामुळेच चांगल्या ठिकाणी पोहोचता आले. हे यश सर्वांचे असल्याचे नमूद करून भविष्यात महाविद्यालयाला अभिमान वाटेल, असे कार्य आपल्या हातून घडेल, अशी आशा व्यक्त करत त्यांनी उपस्थितांकडून आशीर्वाद घेतले.

या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड गजानन फुंडकर, ॲड. भैय्यासाहेब पाटील (पुसदेकर), कोषाध्यक्ष दिलीप इंगोले, हेमंत काळमेघ, प्रा. सुभाष बनसोड, वि. गो. ठाकरे, वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील देशमुख, प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, प्राचार्य डॉ. अमोल महल्ले, ॲड. प्रदीप महल्ले, ॲड. अमर देशमुख, डॉ. अंजली ठाकरे आदींसह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणातून संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी देखील सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या कार्याचा गौरव करून श्री शिवाजी शिक्षण संस्थेसाठी हा बहुमान असल्याचे सांगितले.

## खाजगी बस, ट्रक चालक १ जुलैपासून बेमुदत संपावर

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :**

ई-चलानद्वारे दंड वसूल करणे आणि इतर मागण्यांना विरोध करण्यासाठी महाराष्ट्रातील खाजगी बस आणि ट्रक ऑपरेटर्ससह वाहतूकदारांनी १ जुलैपासून बेमुदत संप पुकारला आहे. इतर मुद्द्यांमध्ये पायाभूत सुविधांमधील कमतरता आणि वाहतूक नियमांचे निराकरण न होणे यांचा समावेश आहे. एका निवेदनात म्हटले आहे की सर्व वाहतूकदार 'वाहतुकदार बचाव कृती समिती'च्या बॅनरखाली एकत्र आले आहेत आणि पुढील महिन्यापासून संप सुरू करण्याची घोषणा केली आहे. याशिवाय १६ जूनपासून मुंबईतील आझाद मैदानावरही बेमुदत धरणे सुरू आहे. तत्पूर्वी, महाराष्ट्राचे मंत्री उदय सामंत यांनी पोलिस आणि वाहतूक विभागाच्या प्रतिनिधींसोबत बैठक बोलावण्याचे आश्वासन दिल्यानंतर कार्यकारिणीने आपले बेमुदत धरणे संपवले. बस चालकांची संघटना असलेल्या मुंबई बस मालक संघटना (एमबीएमएस) ने दावा केला आहे की महाराष्ट्रातील अनेक वाहतूक संघटनांनी संपाला पाठिंबा दिला आहे आणि इशारा दिला आहे की जर त्यांच्या समस्या आणि चिंता सोडवल्या गेल्या नाहीत तर प्रवासी सेवा आणि मालवाहतूक दोन्हीमध्ये व्यत्यय येऊ शकतो.

जर सरकारने ३० जूननंतरही आमच्या प्रलंबित तक्रारींकडे दुर्लक्ष केले तर महाराष्ट्रातील विविध प्रवासी वाहतूक संघटनांनी १ जुलैपासून अनिश्चित काळासाठी 'सर्व वाहने बंद करा' असा निषेध करण्याचा निर्णय घेतला आहे असे एमबीएमएसने म्हटले आहे.

## मोर्चाच्या आधीच सरकारला नमते घ्यावे लागेल : रोहित पवार



**मुंबई :** राज्यातील शाळांमध्ये हिंदी भाषेच्या सक्तीविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं एकत्र येत विराट मराठी मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर ठाकरे बंधू झ्र उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे - हे एकत्र मोर्चात सहभागी होणार असल्याचे संकेत शिवसेना खासदार संजय राऊत यांनी ट्विटद्वारे दिले. यानंतर राजकीय वतुर्ळात नव्या समीकरणांची चर्चा रंगली असून, या निर्णयावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी सकारात्मक प्रतिक्रिया देत म्हटले की, "मराठीसाठी दोन्ही भाऊ एकत्र येत असतील, तर हे मराठी मनांसाठी अत्यंत आनंददायी आहे... आणि त्यामुळे मोर्चाच्या आधीच सरकारला नमते घ्यावे लागेल." या घटनेवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी प्रतिक्रिया देताना वर लिहिलं की, मराठीसाठी दोन्ही भाऊ एकत्र येत असतील, तर हे मराठी मनांसाठी अत्यंत आनंददायी आहे. मराठी माणूस जेव्हा अस्मितेसाठी एकत्र येतो, तेव्हा महाराष्ट्रद्रोह्यांना धडकी भरल्याशिवाय राहत नाही. त्यामुळे मोर्चाच्या आधीच सरकारला नमते घ्यावं लागेल. दरम्यान, राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी देखील या गोष्टीचे स्वागत करत म्हटले आहे की, कुटुंब एकत्र येत असेल, तर ते नक्कीच स्वागतार्ह आहे. हे संजय राऊत यांचे ट्विट पाहून महाराष्ट्रद्रोहींचा जळफळाट झाला असेल. शिवसेना आणि मनसेकडून यापूर्वी हिंदी सक्तीच्या विरोधात विराट मोर्चा काढण्याची घोषणा करण्यात आली होती.

# विदर्भातील अनेक जिल्ह्यांत मुसळधार

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :**

देशभरात मान्सूनचा कहर सुरूच आहे. पूर, पाऊस आणि भूस्खलनामुळे लोक त्रस्त आहेत, तर हिमाचलपासून गुजरातपर्यंत लोकांना पुराचा फटका बसत आहे. दरम्यान, आयएमडीने आजही अनेक राज्यांमध्ये पावसाचा इशारा जारी केला आहे. हवामान खात्यानुसार, हिमाचल आणि उत्तराखंडमध्ये आजही पूर आणि पावसाचा इशारा आहे, तर गुजरात आणि महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा आहे. महाराष्ट्रातील रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघरमध्ये पावसासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्याच वेळी, हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, राजस्थान, मध्य प्रदेश, केरळ, कर्नाटक, ओडिशा, बिहार आणि झारखंडमध्ये पावसाची पूर्ण शक्यता आहे. तथापि, यातून अद्याप कोणताही दिलासा मिळालेला नाही कारण आयएमडीने महाराष्ट्रातील रायगड, मुंबई, ठाणे आणि पालघर येथे पावसासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. याशिवाय मुंबईत मुसळधार पावसाचा इशारा जारी करण्यात आला आहे.

भारतीय हवामान खात्याच्या ताज्या अंदाजानुसार, मुंबई व परिसरात 27 जून रोजी पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. मुंबई शहरासह ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली आणि इतर उपनगरीय भागांमध्ये मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बुलढाणा येथे काही तासांपासून सुरू असलेल्या पावसामुळे कांचन गंगा नदी दुथडी भरून वाहत आहे, ज्यामुळे बुलढाणा जवळील मुंबई नागपूर महामार्गावरही परिणाम झाला आहे. या भागात रस्त्याव्यतिरिक्त, लोकांची घरे गुडघ्यापर्यंत पाण्याखाली गेली आहेत. गाड्या बुडाल्या आहेत, अनेक दुकाने बुडाली आहेत, विजेचे खांब बुडाले आहेत आणि लोकांना गुडघ्यापर्यंत पाण्यात प्रवास करावा लागत आहे. नद्यांच्या पूरमुळे महाराष्ट्रातील काही ग्रामीण भागातही पाणी साचले आहे.

बिहारमध्ये मान्सून सक्रिय झाल्याने पावसाची दाट शक्यता आहे. हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांमध्ये वादळासह मुसळधार पावसाचा इशारा जारी केला आहे. हवामान खात्याने पश्चिम चंपारण, खगरिया, बेगुसराय, मुंगेर, भागलपूर, बांका, किशनगंज, खगरिया, कटिहार, मधेपुरा, सहरसा, सुपौल, अररिया आणि पूर्णिया येथे पाऊस आणि विजांच्या कडकडाटासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. आज सकाळी राजस्थानमधील बिकानेर, जैसलमेर, बारमेर, जालोर, सिरोही, उदयपूर, दौसा, अजमेर, टोंक, सवाई माधोपूर, जिल्हे आणि लगतच्या भागात वेगवेगळ्या ठिकाणी वीज, मेघगर्जनेसह पाऊस सुरु झाला आहे.

## महानगर प्रमुख विलास शिंदे शिवसेना शिंदे गटात करणार प्रवेश

■ **महासागर प्रतिनिधी,**
**नाशिक, दि. २७ :**

शिवसेना ठाकरे गटामधून हकालपट्टी झालेले सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर आता नाशिकमधून ठाकरे गटाला आणखी एक मोठा झटका बसला आहे. ठाकरे गटाचे नाशिक महानगर प्रमुख विलास शिंदे हे रविवारी शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत. विशेष म्हणजे, त्यांच्या सोबत आठ माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्ते व समर्थक शिंदे गटात सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

मध्यंतरी संघटनात्मक बदल झाल्यानंतर विलास शिंदे यांच्यासह 10 ते 12 नेते नाराज असल्याचा खुलासा काही दिवसांपूर्वी सुधाकर बडगुजर यांनी केला होता. त्यानंतर शिंदे यांच्याविषयी नाराजीची चर्चा सुरू झाली होती. गेल्या काही दिवसांत विलास शिंदे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दोन वेळा भेट घेतली होती. आता त्यांनी ठाकरे गटाला जय महाराष्ट्र करत शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

यावर बोलताना विलास शिंदे म्हणाले, नवीन जिल्हाप्रमुख म्हणून ज्यांना नेमले, त्यांच्या मागे कार्यकर्ते नाहीत, तरीही त्यांची नियुक्ती करण्यात आली. विधानसभा निवडणुकीसाठीही मला उमेदवारी देण्यात आली नाही. माझी नाराजी मी खासदार संजय राऊत यांच्याकडे व्यक्त केली होती, मात्र त्यानंतर 15 दिवस उलटून गेले तरीही त्यावर काहीच हालचाल झाली नाही, अशा शब्दांत त्यांनी आपली नाराजी जाहीर केली आहे. दरम्यान, काही आठवड्यांपूर्वी विलास शिंदे यांच्या मुलीच्या विवाहसोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खास उपस्थिती दर्शवली होती.

## भूतबाधा झाल्याचे सांगत अल्पवयीन मुलाला चटके

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. २७ :**

भूतबाधा झाल्याचे सांगत एका दाम्पत्याने अडीच वर्षाच्या मुलाला चटके देऊन बेदम मारहाण केल्याची घटना भांडूप येथे घडली. याबाबत मुलाच्या आईने केलेल्या तक्रारीवरून भांडूप पोलिसांनी गुन्हा दाखल करून दाम्पत्याला अटक केली. भांडूपमधील जंगलमंगल रोड परिसरात आरोपी वैभव कोकरे (३५) याची बाटलीबंद पाणी विकण्याची एजन्सी आहे. याच एजन्सीमध्ये या पीडित मुलाची आई काम करीत होती. अनेकदा ती तिच्या अडीच वर्षांच्या मुलाला कामावर घेऊन येत होती. कामादरम्यान मुलगा वारंवार रडत होता. त्याला भूतबाधा झाल्याने तो रडत असल्याचे आरोपी वैभव आणि त्याची पत्नी हर्षदा यांनी त्याच्या आईला सांगितले. तसेच यावर आपल्याकडे उपाय असल्याचे सांगत, त्यांनी या मुलाला चटके दिले. तसेच त्याला लाकडी काठीने मारहाणही केली.

## मराठीवर अन्याय होता कामा नये ही आमची भावना : पृथ्वीराज चव्हाण



**मुंबई :** महाराष्ट्रात हिंदी सक्तीच्या मुद्यावरून चांगलेच राजकारण पेटले आहे. महायुती सरकारच्या हिंदी सक्तीच्या निर्णयाविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे तसेच शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे मोर्चा देखील काढणार आहेत. या मुद्द्यावर अनेकांच्या प्रतिक्रिया समोर येत आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी देखील यावर आपले मत व्यक्त केले आहे. मराठी अन्याय होता कामा नये ही आमची भावना आहे, असे चव्हाण यांनी म्हटले आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, सर्वांनी मोर्चात सहभागी व्हावे ही राज ठाकरे यांची पॉलिटिकल ॲक्शन आहे. कसा मोर्चा काढायचा हा त्यांचा भाग आहे. या मोर्चात सहभागी व्हायचे की नाही हे प्रदेशाध्यक्ष व नेते ठरवतील. पण मराठीवर अन्याय होता कामा नये ही आमची भावना आहे. ती कशाप्रकारे मांडायचे हे आम्ही ठरवू. मोचार्मुळे ते (राज आणि उद्धव) एकत्र येत आहेत असे काही नाही.

## सर्व विसरून कोणी एकत्र येत असेल तर केव्हाही चांगलेच
# राज-उद्धव ठाकरेंच्या युतीवर शरद पवारांची प्रतिक्रिया

■ **महासागर प्रतिनिधी,**
**कोल्हापूर, दि. २७ :**

सर्व विसरून कोणी एकत्र येत असेल तर केव्हाही चांगले आहे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार यांनी व्यक्त केले आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्यावर त्यांना पत्रकाराने प्रश्न विचारला होता. कोल्हापूर दौऱ्यावर असताना त्यांनी हे विधान केले आहे. राज्य सरकारच्या वतीने करण्यात येत असलेल्या हिंदी सक्तीला देखील त्यांनी विरोध दर्शवला.



शिवसेना आणि मनसे एकत्र आले तर चांगलेच आहे. मात्र येतील का नाही? हे सांगायला मी ज्योतिषी नाही, असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. आणि संजय राऊत एकत्र येण्याचे सांगत आहे. त्यामुळे आणखीन चांगले, असे खोचक उत्तर शरद पवार यांनी दिले आहे.

कोणी एकत्र येऊन, सर्व विसरून काही करत असतील, तर ती गोष्ट केव्हाही चांगली. दोन भावांमध्ये मतभेद असतील आणि मतभेद विसरून एकत्र काम करण्याचे त्यांनी ठरवले तर नाराज होण्याचे काही कारण नाही. असे देखील शरद पवार यांनी म्हटले आहे. काका-पुतण्याच्या प्रश्नावर मात्र, त्यांनी हसून उत्तर देणे टाळले आहे.

या वेळी हिंदी सक्तीच्या विरोधाला देखील त्यांनी पाठिंबा दिला. सरकारने पहिली ते चौथी पर्यंत हिंदी सक्तीची करण्याचा आग्रह सोडावा. पाचवीपासून हिंदी शिकवण्यास काहीही हरकत नसल्याचे ते म्हणाले. मात्र, या मुद्यावर राज ठाकरे यांच्या इशाऱ्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. कोण-कोण मोर्चाला येतो, हे मी बघतो, ही भाषा चांगली नाही, अशा शब्दात शरद पवार यांनी राज ठाकरे यांची कान टोचले आहे. सचिन तेंडुलकर यांचे क्रिकेटमध्ये योगदान आहे. क्रिकेट संबंधी काही निर्णय घ्यायचा असेल तर त्यांचे मत विचारात घेतले जावे. मात्र हा विषय त्यांचा नाही. त्यामुळे या विषयावर त्याचे मत विचारात घेतलेच पाहिजे, असे काही नाही. अशा शब्दात शरद पवार यांनी राज ठाकरे यांना सुनावले आहे.

पहिली ते चौथी प्राथमिक विभाग असतात. हिंदी सक्ती तिथे करणे योग्य नाही. पाचवी ते पुढील वर्गासाठी विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून हिंदी शिकवणे योग्य असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. आज देशात 55 टक्के लोक हिंदी बोलतात. दुसरी कोणतीच भाषा एवढ्या मोठ्या प्रमाणात बोलणारे नाहीत.

## स्वारगेट बलात्कार प्रकरणी
### आरोपीचा जामीन अर्ज अंतिम टप्प्यात

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. २७ :**

स्वारगेट बसस्थानकात फेब्रुवारी महिन्यात घडलेल्या धक्कादायक बलात्कार प्रकरणात आरोपी दत्ता गाडे याने दाखल केलेल्या जामीन अर्जावर गुरुवारी (दि. २६ जून) दोन्ही पक्षांचा युक्तिवाद पूर्ण झाला असून, शुक्रवारी (दि. २७ जून) न्यायालयाकडून निर्णय दिला जाण्याची शक्यता आहे.

या प्रकरणात विशेष सरकारी वकील ॲड. अजय मिसार आणि पीडितेच्या वतीने ॲड. श्रीया आवले यांनी जोरदार युक्तिवाद करताना म्हटले की, "पीडिता व आरोपी यांच्यात पूर्वी कोणताही संपर्क नव्हता, तसेच कोणताही आर्थिक व्यवहार झालेला नाही. आरोपीने यापूर्वी पीडितेची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्याला जामिनावर सोडल्यास पीडितेच्या जीविताला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो."दरम्यान, आरोपी दत्ता गाडे याने आपल्या वकिलांमार्फत जामिनासाठी अर्ज केला होता. या अर्जावर झालेल्या सुनावणीत आरोपीच्या वतीने पीडितेविषयी आक्षेपार्ह विधाने करण्यात आली. यामुळे न्यायप्रवेश प्रक्रियेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही घटना दिनांक २५ फेब्रुवारी रोजी पहाटेच्या सुमारास घडली होती. २६ वर्षीय पीडिता स्वारगेट बसस्थानकावर पोहोचली असताना आरोपीने तिला साताऱ्याकडे जाणारी बस लगेच लागणार असल्याचे सांगितले.

मात्र, तो तिला दिशाभूल करून बंद पडलेल्या शिवशाही बसमध्ये घेऊन गेला आणि तेथे तिच्यावर जबरदस्ती केली. आरोपीला पोलिसांनी त्याच्या गावातून अटक केली असून, तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे.

# सुमेधा चिथडे यांना सावित्री पुरस्कार
## लष्करासाठी ऑक्सिजन प्लांट उभारणाऱ्या महिलेचा सन्मान

■ **महासागर प्रतिनिधी**
**पुणे, दि. २७ :**

विना कष्टाचे आणि फुकट, ते सर्व निर्धारपूर्वक नाकारा. आपल्या कुठल्याही कृतीतून राष्ट्राचे नुकसान तर होत नाही ना, हा विचार प्रथम मनात आणा. पाठ्यपुस्तकाबाहेर डोकवा. समाजात, सभोवताली काय घडत आहे, याची नोंद घ्या. देशसेवा हा प्राधान्यक्रम ठेवा, असा सल्ला सियाचिन आणि कूपवाडा येथे लष्करासाठी ऑक्सिजन जनरेशन प्लांट आणि रिफिलिंग युनिट उभारणाऱ्या व सैनिकांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या सुमेधा चिथडे यांनी विद्यार्थिनींना दिला.



सावित्री फोरम आयोजित विद्यानिधी उपक्रम आणि सावित्री पुरस्कार प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. याप्रसंगी सावित्री फोरमतर्फे दरवर्षी दिला जाणारा सावित्री पुरस्कार सुमेधा चिथडे यांना राष्ट्रीय सर्वोत्तम शिक्षक पुरस्काराचे मानकरी, श्री विद्या विकास सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि नामवंत शैक्षणिक सल्लागार श्रीकांत सुतार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचप्रमाणे विद्यानिधी उपक्रमांतर्गत पुण्यातील व आसपासच्या ग्रामीण भागांतील इयत्ता आठवी ते दहावीच्या हुशार पण गरजू अशा ८० विद्यार्थिनींना दीड लाखाच्या शैक्षणिक मदतनिधीचे वाटप करण्यात आले.

सुमेधा चिथडे म्हणाल्या,पुरस्कार ज्या नावाने मिळतो, त्याचे मोल अधिक आहे. हा सावित्रीबाईंच्या नावाचा पुरस्कार आहे. आजच्या सर्व विद्यार्थिनींनी स्वतःमधील सावित्रीबाईंचा शोध घ्यायला हवा. स्वतःवरील विश्वास, परिश्रमांची तयारी, सातत्य, ध्येयाचा ध्यास आणि त्यासाठी आवश्यक ते कौशल्य प्राप्त करण्याची तयारी, यांच्या आधारे तुम्ही जीवनात यशस्वी व्हा. आयते, फुकटचे सर्व नाकारा.

कष्टाने मिळवलेल्या गोष्टींनाच मोल असते, हे लक्षात ठेवा. पारंपरिक विद्याशाखांप्रमाणेच लष्करी क्षेत्रातही अनेक संधी आहेत. त्या मिळवा. स्वतःला सिद्ध करून दाखवा. इतरांशी तुलना करू नका, स्पर्धा स्वतःशीच करा. मन. बुद्धी आणि शरीर, यांच्यात एकवाक्यता असू द्या. आपले सैनिक सर्व प्रकारच्या प्रतिकूलतांवर मात करत आपले संरक्षण करतात, याचे भान ठेवा. तक्रार, कारणे आणि अपेक्षांपासून दूर राहा, तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

सुतार म्हणाले, सुमेधाताईंचे कार्य हे देशसेवा आणि मानवसेवेचे आदर्श आणि उत्कृष्ट उदाहरण आहे. सावित्री फोरमच्या सर्व भगिनी सावित्रीबाईंच्या नावाचा वारसा आणि वसा जपत आहेत, हेही कौतुकास्पद आहे. विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती असते.

## मुंबईतून पिस्तुल आणि काडतुसांचा साठा जप्त
## उत्तर प्रदेशातील तरूणाला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :**

गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शिवडी परिसरात केलेल्या कारवाईत पिस्तुलांचा साठा जप्त केला. याप्रकरणी उत्तर प्रदेशमधील २४ वर्षीय तरूणाला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून तीन पिस्तुल, १० काडतुसे जप्त करण्यात आली. या मागे शस्त्रविक्री करणारी आंतरराज्यीय टोळी असल्याचा पोलिसांना संशय असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

अजयकुमार सर्वेशकुमार दिवाकर (२४) असे अटक आरोपीचे नाव आहे. तो मूळचा उत्तर प्रदेशमधील कानपूर येथील रहिवासी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शिवडीमधील डॉकयार्ड येथील बीपीटी परिसरातील निर्जनस्थळी संशयीत तरूण शस्त्रांसह येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे तेथील स्वयंभू इच्छापूर्ती गणेश मंदिरामागे पोलिसांनी सापळा रचला होता. पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, संशयीत तरूण गुरूवारी या परिसरात आला. पोलिसांनी त्याला तात्काळ ताब्यात घेतले. त्याची झडती घेतली असता त्यांच्याकडे तीन पिस्तुल, तीन मॅगझीन व १० जिवंत काडतुसे सापडली. शस्त्रांच्या कागदपत्रांबाबत विचारले असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. अखेर त्याला ताब्यात घेऊन पोलिसांनी गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणले. चौकशीत त्याने पिस्तुल विकण्यासाठी तेथे आल्याचे कबुल केले. त्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी शिवडी पोलीस ठाण्यात शस्त्रास्त्र प्रतिबंध कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केली. याप्रकरणी गुन्हे शाखा पुढील तपास करीत आहे.

आरोपीकड देशी बनावटीची चांगल्या दर्जाची पिस्तुले सापडली. आरोपीचा मोबाइलही जप्त करण्यात आला आहे. त्याद्वारे तो कोणाच्या संपर्कात होता. याबाबत तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले. उत्तर प्रदेश, बिहार व मध्य प्रदेशात अवैध शस्त्र निर्मिती करणाऱ्या अनेक टोळ्या आहेत. गेल्या काही वर्षांत अशा टोळ्यांवरही मोठ्या प्रमाणात कारवाई करण्यात आली आहे. मागील तीन वर्षांमध्ये उत्तर प्रदेश पोलिसांनी राज्यातील गुन्हेगारांकडून तब्बल एक लाखांहून अधिक अवैध शस्त्रे जप्त केली आहेत.

## त्रिभाषा अहवाल उद्धव ठाकरेंनी स्वीकारला
# मंत्री उदय सामंत यांचा पटलवार

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २७ :**

राज्यात हिंदी सक्तीवरून राजकारण करणाऱ्या शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी त्रिभाषेचा अहवाल २०२२ मध्ये स्विकारला होता, असा पलटवार उद्योग मंत्री उदय सामंत यांनी केला. आंदोलनाची भूमिका घेणाऱ्या उद्धव ठाकरेंचे मराठी प्रेम बेगडी असल्याची जोरदार टीका केली.



राज्यात हिंदी सक्तीचा मुद्दा तापला आहे. मनसे आणि शिवसेनेने (ठाकरे) यांनी हिंदी विरोधात आक्रमक भूमिका घेत, आंदोलनाचा इशारा दिला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी गुरुवारी बाळासाहेब भवन येथे पत्रकार परिषद घेऊन हिंदी सक्तीबाबतचे उद्धव ठाकरेंचे मुद्दे खोडून काढले.

महाविकास आघाडी सरकारमध्ये ठाकरे तत्कालीन मुख्यमंत्री होते. याकाळात डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी त्रिभाषीय अहवाल तयार केला होता. तो तत्कालीन कॅबिनेट बैठकीत ठाकरेंनी स्वीकारला. या अहवालात मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेचा उल्लेख होता. त्यामुळे मराठी भाषेवर प्रेम सांगणाऱ्यांनी तेव्हा हा त्रिभाषिक अहवाल का स्वीकारला? असा सवाल सामंत यांनी उपस्थित करत ठाकरे यांच्यावर टीका केली. मराठी आणि मराठी माणसाबद्दल त्यांच्या मनात प्रेम नाही. आगामी पालिका निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे हिंदी सक्तीचे आणि मराठीवरून राजकारण करत आहेत, असा आरोप केला.

राज्य सरकार हिंदी भाषेचा आग्रह किंवा अनिवार्य देखील केलेला नाही. परंतु दोन-तीन वर्षांपूर्वी आदित्य ठाकरे यांनीही मराठी, इंग्रजी आणि तिसऱ्या भाषेचा पर्यायाबदल भूमिका मांडतानाचा जुना व्हिडिओ पत्रकार परिषदेत दाखवला. तिसऱ्या भाषेबद्दल त्यांची तेव्हा भूमिका होती तर आता भूमिका का बदलली? की फक्त निवडणुकीच्या तोंडावर त्यांची भूमिका बदलली, अशी टीका सामंतांनी आदित्य यांच्यावर केली. मराठी माणसाबद्दल बोलत आहेत. पण त्यावेळी विरोध केला असता तर आज ही वेळ आली नसती, असेही त्यांनी सांगितले. सरकारने कुठेही हिंदी भाषा सक्ती आहे, असा उल्लेख केलेला नाही. उलट विरोधक संभ्रम निर्माण करत आहेत. मात्र मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक झाली असून साहित्यिक, लेखक, कवी मराठी भाषेची अभ्यासक, तज्ज्ञ जाणकार यांची मते घेऊन हिंदी भाषेबद्दल निर्णय घेण्यात येईल, असे सामंत म्हणाले.


शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन शासनाचे धोरण आणि भूमिका समजून सांगितली. परंतु सरकारचे धोरण अमान्य असल्याचे राज म्हटले. तसेच त्यांनी ६ जुलैला गिरगाव चौपाटी ते आझाद मैदानात मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली.

# साडेतीन लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास

## दोन ठिकाणी घरफोडी

■ महासागर प्रतिनिधी,

**मोताळा , दि. २७ :** शेलापूर येथे चोरट्यांनी एकाच रात्री दोन ठिकाणी घरफोडी करून ३ लाख ५५ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास केले सदर घटना २६ जून रोजी गुरुवारी पहाटे अडीच वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याप्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. तालुक्यातील शेलापूर खु. येथील सचिन सुधाकर पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, २५ जून रोजी बुधवारी रात्री दहा वाजेच्या सुमारास फिर्यादी जेवण आटोपून कुटुंबासह झोपले होते. दरम्यान, अडीच वाजेच्या सुमारास फिर्यादी लघुशंकेसाठी झोपेतून जागे झाले



असता त्यांना घरातील कपाट उघडे दिसले असता फिर्यादीने त्यांच्या पत्नीला जागे केले. आणि घरात जाऊन पाहीले असता कपाटातील लॉकरमधील सहा ग्रॅम सोन्याची अंगठी १८ हजार रुपये, पाच ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या तीन अंगठ्या ४५ हजार रुपये, वीस ग्रॅम वजनाची पदकासह सोन्याची पोत ६० हजार रुपये, सडा पोत सात ग्रॅम वजनाची २१ हजार, साडेतीन ग्रॅम वजनाचे कानातील १० हजार ५०० रुपये असा एकूण १ लाख ५४ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने कपाटातील लॉकर मध्ये ठेवलेले दागिने कोणीतरी चोरून नेल्याचे दिसून आले सदर घटना फिर्यादीने घराशेजारी असलेल्या त्यांच्या नातेवाइकांना सांगितली. दरम्यान, फिर्यादीच्या घरापासून काही अंतरावर असलेले विजय दामोदर पाटील हे दवाखान्याच्या कामानिमित्त पुणे येथे गेलेले होते. चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील वीस ग्रॅम सोन्याची गाहूपोत ६० हजार रुपये, ३६ ग्रॅम सोन्याची गठलेली सोन्याची पोत १ लाख ८ हजार ७ ग्रॅम सोन्याची अंगठी २१ हजार, चार ग्रॅम वजनाचे कानातले १२ हजार असा २ लाख एक हजारांचा माल चोरून नेला. असे दोन्ही घरातील ३ लाख ५५ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्यांनी लंपास केले.

# प्रतिबंधित प्लास्टिकचा साठा जप्त

## दुकानदारांना ५० हजार रुपयांचा दंड:मनपाकडून कारवाई

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. २७ :** केंद्रीय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त निर्देशानुसार,मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनील लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त गीता ठाकरे यांच्या मार्गदर्शनात २५ जून रोजी प्रतिबंधित प्लास्टिक कॅरीबॅग व इतर वस्तू वापरणाऱ्यावर व्यावसायिकांवर पूर्व, पश्चिम, उत्तर आणि दक्षिण झोनअंतर्गत असलेल्या दुकाने, फेरीवाले यांच्यावर एकुण ५० हजार ५०० रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. मनपा क्षेत्रातील पूर्व झोनअंतर्गत रामद्वार येथील दुकाने तपासणीदरम्यान



संगम एन.एक्स. संगम होजियारी, संगम गोडावून या तीन प्रतिष्ठानांमध्ये प्रतिबंधित कॅरीबॅग, प्रतिबंधित प्लास्टिक कोटेड द्रौण, ग्लास, ताट यांचा जवळपास ३०० किलो साठा आढळल्याने त्यांच्याकडील साठा जप्त करून त्यांच्याकडून दंड वसूल केला.

# रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले गीतांजली एक्स्प्रेसला ४ तास उशीर

■ महासागर प्रतिनिधी,

**अकोला , दि. २७ :** दोन दिवसांपासून पावसाळ्याला जेमतेम सुरुवात झाली आहे. मात्र, मुसळधार पावसापूर्वीच रेल्वेचे वेळापत्रक कोलमडल्याचे चित्र गुरुवारी सकाळी दिसून आले. अकोला रेल्वे स्थानकावरून जाणाऱ्या जवळपास प्रत्येक गाड्या विलंबाने धावत होत्या. यामुळे पावसामध्ये प्रवाशांनाही अडचणीचा सामना करावा लागला. गुरुवारी नागपूर स्पेशल गाडी तब्बल ७ तास विलंबाने स्थानकावर पोहोचली, तर गीतांजली एक्स्प्रेस जवळपास चार तास उशिराने आली.




गुरुवारी विविध मार्गावरील नागपूर, तसेच मुंबई मार्गे धावणाऱ्या अनेक गाड्या विलंबाने अकोला येथे पोहोचत होत्या. हे चित्र रात्रीपर्यंत कायम होते. यामुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले. मुसळधार पावसामुळे रेल्वे गाड्या उशिरा धावतात. दरवर्षी पावसाळ्यात हे प्रकार घडतात. मात्र, यंदा पावसाळ्याला जेमतेम प्रारंभ झाला असतानाच रेल्वे गाड्या विलंबाने धावण्याचा प्रकार सुरू झाला आहे.

वेगवेगळ्या ठिकाणाहून अकोलामार्गे धावणाऱ्या तब्बल १० रेल्वे गाड्या गुरुवारी लेट झाल्या. यामुळे या गाड्यांनी प्रवास करीत असलेल्या तसेच या गाड्यांनी अकोल्याहून पुढे प्रवास करण्याचे नियोजन करून असलेल्या प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. नागपूर स्पेशल गाडीचा अकोला येथून सुटण्याची वेळ रात्री १.४० मिनीट होता, ही गाडी गुरुवारी सकाळी ५.४७ मिनीटाने पोहचली. १२११३ नागपूर गरीब रथ सकाळी ४.३० वाजताची गाडी ५.१३ वाजता रेल्वे स्थानकावर आली. १२१२९ आझाद हिंद सकाळी वेळ ५.२० वाजता आहे. ही गाडी पुण्यातून चार तास विलंबाने सुटली. यामुळे अकोला रेल्वे स्थानकावर आणि पुढे उशिराने धावत होती. याशिवाय २२९७३ पुरी सुपरफास्ट दीड तास, ११०३९ महाराष्ट्र एक्सप्रेस ४५ मिनीट उशिराने अकोला रेल्वे स्थानकावर पोहचली. नागपूरमार्गे येणाऱ्या सर्व गाड्या सकाळपासून उशिराने धावत होत्या. अकोला रेल्वे स्थानकावर १२८६० गीतांजली एक्स्प्रेस दररोज सकाळी ११.२५ वाजता पोहोचते, ही गाडी दुपारी ३.५० वाजता आली. यामुळे नियमित प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा प्रचंड मनस्ताप झाला. ०१४६८ पुरी सुपरफास्ट ४ तास, १२८१० हावडा-मुंबई सायंकाळी ६.२५ वाजताची गाडी ९.५ रात्री, २२३५८ मुंबई एलटीटी सायंकाळी ०७.०८ वाजताची गाडी रात्री ९.२२ वाजता, तर १२१३० आझाद हिंद सायंकाळी ७.३७ वाजताची तीन तास विलंबाने धावत होती.

# प्रतीक्षेनंतर दमदार पावसाने लावली हजेरी

## कपाशी, सोयाबीन, तूर पेरणीलाही सुरुवात

**बाभुळगाव :** तालुक्यात अखेर १५ दिवसांच्या प्रतीक्षेनंतर दि. २५ जूनच्या सायंकाळ पासूनच दमदार पावसाची संततधार सुरू आहे. नाले दुथडी भरून वाहत असून परिसरातील जलसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. या पावसामुळे पेरणी झालेल्या पिकांना नवसंजीवनी मिळाली आहे, तर पेरणी रखडलेल्या शेतकऱ्यांसाठीही हा पाऊस वरदान ठरला आहे. सुरुवातीला काही शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केलेली आहे. तर येत्या काही दिवसात उर्वरित पेरणीची कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. काल सायंकाळपासून सुरू झालेल्या पावसाची आज सकाळी ११ वाजेपर्यंत २१ मिलिमीटर एवढी नोंद करण्यात आली असून यावर्षीची एकूण १२२ मिलिमीटर तर जून महिन्यातील सरासरी ७९ मिलिमीटर पावसाची नोंद आहे. यामुळे पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. तालुक्यात मागील गेल्या काही आठवड्यापासून ढगाळ वातावरण असून देखील पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे शेतकरी वर्ग पेरणीसाठी प्रतीक्षेत होता. मात्र सध्या सुरू असलेल्या समाधानकारक पावसामुळे शेतीच्या कामांना चागलाच वेग आला आहे. यामुळे शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. बाभुळगाव तालुक्यात यावर्षी सोयाबीन आणि



> तालुक्यात बऱ्यापैकी पाऊस झाला असून काही विभागात पाऊस अजूनही कमी आहे. तरी ज्या विभागात पाऊस किमान ७० ते १०० मिलिमीटर एवढा झाला आहे. तेथील शेतकऱ्यांनी पेरणी करावी. परंतु काही विभागात ७० मिलिमीटर पेक्षा कमी पाऊस पडला आहे, तेथे मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये व पुरेसा पाऊस झाल्यावरच पेरणीस सुरुवात करावी.
>
> **गोपाल जाधव , प्रभारी तालुका कृषी अधिकारी, बाभुळगाव.**

तुरीच्या पेरणीस सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांनी बैलजोडी आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने शिवारात उतरून पेरणीला सुरुवात केली आहे. अचानक मोठ्या प्रमाणात पेरणी सुरू झाल्यामुळे काही बियाण्यांच्या किमतीत रातोरात लक्षणीय वाढ झाली आहे. जास्त मागणी असलेल्या काही कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांच्या ३० किलोच्या पिशव्या २२०० रुपयांवरून थेट २६०० रुपयांवर पोहोचल्या आहेत.

# शहराची स्वच्छता उरली फक्त कागदावरच

**पुसद , दि. २७ :** पुसद न.प. च्या हद्दीतील बहुतांश भागातील नाल्या कचऱ्याने तुडुंब भरल्या आहेत. रस्त्याच्या कडेला देखील कचऱ्याचे ढीग साचलेले असल्याचे चित्र पहावयास मिळत असतात. घंटागाडी सेवेत अनियमितता असल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. आरोग्य विभागाशी निगडित समस्या सोडवण्याकरीता दैनिक दिव्य मराठीने वृत्त देखील प्रकाशित केले होते. नगरसेवकच ठेकेदार झाल्याने त्याचे कोणीही वाकडे करू शकत नाही किंवा कोणीही विरोध करणार नाही हा शहाणपणा भोवला आहे. त्या डमी ठेकेदारा विरोधात शहरातील नागरिक व भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते आक्रमक झाले असून कचऱ्याच्या ढिगाऱ्याजवळ मुख्याधिकाऱ्याला बोलवून दि. १७ जून रोजी निवेदन देण्यात आले आहे. भाजप पुसद जिल्हाध्यक्ष डॉ. आरती फुपाटे, शहराध्यक्ष निलेश पेन्शनवार, माजी शहर अध्यक्ष भारत पाटील, दिपक परीहार, माजी नगरसेवक डॉ. रुपाली जयस्वाल, शितल उतळे, निलकंठ पाटील यांनी निवेदन दिले आहे. आरोग्य विभागातील डमी ठेकेदाराकडून मुख्याधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे आक्रमक भाजपकडून स्वच्छतेचे धडे शिकवण्यासाठी मुख्याधिकारी डॉ. अभिजित वायकोस यांची भेट घेतली.


**MAHAGENCO** Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**e-TENDER NOTICE – 043 / 2025–26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0299 TM1 | 3000058821 | WORK OF ACID CLEANING OF CONDENSER TUBES USING INHIBITED SULPHAMIC ACID ALONG WITH HYDRO JETTING AND BULLET SHOT DURING CAPITAL OVERHAUL OF UNIT-4, KHAPERKHEDA TPS (4X210 MW). | 25.49 |
| TN0300 BM1 | 3000058824 | COMPLETE OVERHAULING OF XRP-883 COAL MILLS IN UNIT NO. 4 AOH. | 44.60 |
| TN0301 FF1 Refloated | 3000058830 | CONTRACT OF DEPLOYMENT OF TRAINED FIRE SERVICE MANPOWER FOR FIRE SERVICES AND TESTING / SERVICING / MAINTENANCE AND DAY TO DAY WORK OF FIRE SERVICES SECTION AT KHAPERKHEDA TPS. | 44.13 |
| TN0303 TM1 | 3000058848 | PROCUREMENT OF CAP NUT, STUDS, FITTED KEYS AND COUPLING BOLTS FOR COH OF UNIT 1 & 4. | 54.75 |
| TN0304 TM1 Refloated | 3000058860 | PROCUREMENT OF GAS VALVES FOR GENERATOR HYDROGEN SYSTEM. | 12.29 |
| TN0305 CHP2 Refloated | 3000058809 | WORK OF ESTABLISHMENT OF MONITERING / SURVEILLANCE SYSTEM FOR CONVEYOR SYSTEM AT CHP-II AT TPS KPKD. | 29.50 |
| TN0306 TM1 Refloated | 3000058874 | PROCUREMENT OF SPONGE BALLS FOR ONLINE CONDENSER TUBE CLEANING FOR UNIT 01 TO 04. | 7.64 |
| TN0313 TM1 | 3000058906 | PROCUREMENT OF VARIOUS LP BYPASS, EXCITER COUPLING AND MOP SPARES REQUIRED FOR CAPITAL OVERHAULING OF UNIT 1 AND 4. | 27.18 |
| TN0314 TM1 | 3000058909 | PROCUREMENT OF HIGH-PRESSURE CRITICAL BENDS FOR TURBINE AND ITS AUXILIARIES FOR COH 1 & 4 AT TPS KHAPERKHEDA. | 12.23 |
| TN0315 EM1 | 3000058912 | PROCUREMENT OF VARIOUS ELECTRICAL SPARES FOR HT/LT AUXILIARIES INCLUDING SILICON LEADS IN VIEW OF U#4 AOH AT EM-1 OF 210MW, KHAPERKHEDA TPS. | 40.52 |

**Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.**

**Sd/-**
**Chief Engineer (O&M)**
**MSPGCL, TPS Khaperkheda**



**कार्यालय**

ग्रामपंचायत मेटाउमरी

पंचायत समिती हिंगणा ,जिल्हा परिषद नागपूर

ग्रा.पं. मेटाउमरी अंतर्गत सन २०२५/२६ मध्ये विविध योजणे अंतर्गत होणाऱ्या बांधकामा करिता लागणारे बांधकाम साहित्य व पाणीपुरवठा योजणे (नळ योजना )करिता लागणारे साहित्य तसेच दिवाबत्ती करिता विविध प्रकारचे लागणारे साहित्य तसेच व इतर किरकोळ साहित्य ई –निविदा द्वारे सन २०२५/२६ करिता मांगविण्यात येत आहे

सूचना क्रमांक – ०१-२०२५/२६ (ई –निविदा)/(पहिली वेळ)

जिल्हा परिषद वेबसाईटवर http://www.mahatenders.gov.in या संकत स्थळावर ई –निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) दरपत्रकविक्रीचा दिनांक:- २७/०६/२०२५ ला सां. ६.०० वा प्रसिद्ध करण्यात येईल.

२) दरपत्रक स्वीकृतीचा अंतिम दिनांक :०३/०७/२०२४ ला सां. ६.०० वा पर्यंत उपलब्ध राहील .

३) दरपत्रक उघडण्याच्या दिनांक:-०४/०७/२०२५ ला सां. ६.०० वाजता किवा सोईनुसार उघडण्यात येईल.

-स्वा-

सरपंच/उपसरपंच / ग्रामपंचायत अधिकारी

ग्रामपंचायत मेटाउमरी

पं.स.हिंगणा जि.पं.नागपूर



**न्यायालय अतिरिक्त कमिश्नर जबलपुर संभाग**

**(पक्षकार को उपस्थित होने संबंधी आम सूचना)**

दिनांक 5.5.2025

प्रकरण क्रमांक – 0314/अपील/24–25

1. मकबूल खान पिता मरहूम रहीम खान, 2.बदरुन्निसा पिता मरहूम रहीम खान दोनों निवासी – वार्ड 15 पटेल टोला बरघाट तहसील बरघाट जिला सिवनी (म.प्र.)......अपीलार्थी **विरूद्ध** 1. आरेफा अंजुम खान पति मोहम्मद इल्यास खान निवासी – वार्ड 15 पटेल टोला बरघाट तहसील बरघाट जिला सिवनी, 2. महबूब खान पता मरहूम महफूज खान (मृत) द्वारा विधिक वारसान 2(क) साजेदा बी पति मरहूम महबूब खान निवासी फूटा बंगला परिसर चिखला तहसील तुमसर जिला भंडारा (महाराष्ट्र) 2(ख) शाहजहाँ खान पिता मरहूम महबूब खान पति माजिद निवासी योगेन्द्र नगर शारदा चौक आदिवासी झोपड़पट्टी नागपुर जिला नागपुर (महाराष्ट्र) 2(ग) इशरत पति फहीम खान पिता मरहूम खान निवासी बाम्हनवाडा पोस्ट छुई, तहसील व जिला सिवनी.....उत्तरवादीगण

**पेशी दिनांक : 30.06.2025**

**समय दोपहर 2.00 बजे, स्थान कमिश्नर कार्यालय जबलपुर, जबलपुर संभाग**

अपीलार्थी मकबूल खान वगैरह द्वारा न्यायालय अनुविभागीय अधिकारी बरघाट जिला सिवनी के राजस्व प्रकरण क्रमांक 32/अपील/23–24 में पारित आदेश दिनांक 17.05.2024 के विरुद्ध इस न्यायालय के समक्ष अपील प्रस्तुत की गई है। प्रकरण में आगामी तिथि दिनांक 30.06.2025 नियत की गई है। अत: प्रकरण में पक्षकारों को इस सूचना पेपर प्रकाशन के माध्यम से सूचित किया जाता है कि यदि वे प्रकरण में अपना पक्ष रखना चाहते है तो वे स्वयं अथवा अपने वैध प्रतिनिधि के माध्यम से निर्धारित तिथि 30.06.2025 पर इस न्यायालय के समक्ष उपस्थित होकर प्रस्तुत करे । निर्धारित तिथि के उपरांत प्राप्त दावा एवं आपत्तियों पर कोई विचार नहीं किया जावेगा । आज दिनांक .....को न्यायालय की पदमुद्रा एवं मेरे हस्ताक्षर से जारी किया गया। **(अमर बहादुर सिंह)**

**अतिरिक्त कमिश्नर**
**जबलपुर संभाग**



महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

**" भारतीय वन सेवा (UPSC) पुर्व परीक्षा- 2025 उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी महाज्योती मार्फत आर्थिक सहाय्य योजने" करीता नोंदणी अर्ज**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) मार्फत राज्यातील नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्ग, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील भारतीय वन सेवा (Indian Forest Services) पुर्व परीक्षा- 2025 उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेच्या तयारीसाठी आर्थिक सहाय्याचा लाभ देण्याकरिता इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांकडुन ऑनलाईन अर्ज मार्गविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी व ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी आवश्यक निकष, अटी- शर्ती बाबतची संपुर्ण माहिती महाज्योतीच्या संकेतस्थळावर परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेली आहे.

- **अर्ज करण्याकरिता लिंक** :- www.mahajyoti.org.in > सूचना फलक > "Application Invited For Financial Assistance to Those Who Have Qualified For UPSC - Indian Forest Services Mains - 2025" > Registration Link
- **ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिनांक :- दि.15/07/2025 रोजी दु. 5.00 वाजे पर्यंत**

**टिप:- सदर विषयी भविष्यात कोणतीही माहिती/ सूचना उपरोक्त लिंक वरच दिली जाईल. वृत्तपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. तसेच टपालद्वारे / प्रत्यक्ष किंवा मेल वर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही. इच्छुक विद्यार्थ्यांनी महाज्योती चे सुचनाफलक पहावे.**

प्रशांत वावने
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाज्योती महाराष्ट्र राज्य नागपूर

DGIPR-2025-26/No.-5/C1387



**MAHAGENCO**

**E-TENDER NOTICE**

**E-Tender Specification No:-** CE(C)-II/KRD/Tech/T-06/3000058836/2025-26.

**Name of work:** Work of decorative wall panelling of VIP entry of Shree Mahalaxmi Jagdamba Devi Mandir Sansthan at Koradi.

| | |
|---|---|
| **Estimated Cost :** Rs. 70,06,150.19 | **Time Limit:** 02 (Two) Months (Including monsoon period) |
| **Issue Period : -** 28.06.2025 to 05.07.2025 upto 17.30 Hrs. | **Last Date of Submission –** 06.07.2025 upto 15.00 Hrs. |
| **Tender Fee:** Rs. 1180.00 Rs. One Thousand One Hundred Eighty only. (By E-Payment) | **E.M.D.-** Rs. 70,200.00 (By E-Payment/RTGS/NEFT) |

**Contact Person:** Dy. Chief Engineer (Civil), O/o Chief Engineer (C)-II, M.S.P.G.C.L., Koradi. Mob. No.:- 8408889213, **E-mail :**cgmcivil2@mahagenco.in

For further details visit our website : **www.eprocurement.mahagenco.in.**
Agencies are requested to register themselves for Future E-Tender.



**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**

**NOTICE INVITING PROPOSALS**

The Nagpur Municipal Corporation, Nagpur Maharashtra hereby invites proposals from eligible agencies **for Expression of Interest for Appointment of Architectural & Project Management Consultant for Development of Zero Mile Precinct.**

**Eligibility Criteria:** The proposal can be submitted by. a) The details are stated in bid document. **Other conditions: a)** Consultancy Services/Design/Construction/ Heritage Services, etc. will be done as per Government/ PWD / Standards as specified by the Engineer- in-charge norms. Details of the project will be finalized in the DPR after discussion.

**Bidding Process Timelines**

The detailed RFP Document and other details are available in the office of Executive Engineer (Project 3)

| | |
|---|---|
| RFP Sale | 30/06/2025 to 07/07/2025 till 16:00 Hrs. |
| RFP Submission End Date | 07/07/2025 till 16:00 Hrs. |
| Proposal Opening Date | 08/07/2025 @ 16:00 Hrs. (If Possible) |
| Earnest Money Deposits (EMD) (Refundable) | Rs 50,000/- |
| RFP Document Cost through online mode (Non-Refundable) | Rs 10,000 + 1800 (GST)= 11,800/- |

**1.** NMC reserves the right to alter, modify any clause of the Bidding Documents including the Contract Agreement and also to annul the bidding process without assigning any reason whatsoever. **2.** Queries can be send by email- eeproject3nmc@gmail.com

**Executive Engineer (Project 3)**
**NMC, Nagpur**

**Advt No. 229 PR Date 27.06.2025**

PMC/25/229



**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, नागपूर

**जाहीर ई-निविदा सुचना क्र.२/२०२५-२६**

नागपूर जिल्हयातंर्गत ११४ ठिकाणी कामाची ई-निविदा क्र.०२/२०२५-२६ मंजूर कामे करण्याकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील दर्शविल्याप्रमाणे Online निविदा http://mahatenders.gov.in वर ई-टेंडरींग पध्दतीने मागवित आहे.

**ई-निविदा (प्रथम प्रसारण) कामांची संख्या- ११४**
**ऑनलाईन निविदा विक्री - दि.३०/०६/२०२५**

आरोग्य संस्थाची बांधकामे व दुरुस्तीचे खालीलप्रमाणे Online ई-निविदा महाराष्ट्र आरोग्य शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करता येईल. या निविदे संबधीची सर्व माहीती व अटी/शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. ही निविदा फक्त इंटरनेटवरुनच खरेदी करता येईल व इंटरनेटवरुनच भरता/दाखल करता येईल. कोणतेही कारण न देता निविदा स्विकारणे अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवण्यात आले आहेत.

सही/-
सचिव
जिल्हा एकात्मिक आरोग्य
व
कुटुंब कल्याण सोसायटी,
नागपूर



Backward Class Youth Relief Committee's

**Bhausaheb Mulak Ayurved Mahavidyalya**

Great Nag Road, Nandanvan, Nagpur - 440009
**Phone** - 0712-22712740, 2710727
**E- mail-** principalbmam@gmail.com
Affilated to Maharashtra University of Health Sciences

**WALK- IN- INTERVIEW**

**for following posts in the College office on 09/07/2025**

| Sr. No. | Dept/Subject | Vaccant Posts: Professor | Vaccant Posts: Associate Professor (Reader) | Vaccant Posts: Assistant Professor (Lecturer) |
|---|---|---|---|---|
| 1 | Samhita Siddhanta | 01 (SC) | 01 (SC) | 01 (SC), 1(VJ-A) |
| | Sanskrit | -------- | --------- | 01 (Open) |
| 2 | Rachana Sharir | 01 Open, 01 (SC) | 01 Open | 01 (SC) |
| 3 | Kriya Sharir | 01Open, 01 (SC) | 01 (SC) | 01 Open, 01 (SC) |
| 4 | Dravyaguna | 01 (SC) | 01 Open, 01 (SC) | 01 Open, 01 (SC) |
| 5 | Ras-shashtra & B.K. | 01 Open, 01 (SC) | 01 Open | 01 (SC) |
| 6 | Rognidan evum Vikriti Vigyana | - | 01 Open | 01 Open |
| 7 | Swasthvrutta & Yoga | 01 Open, 01(SC) | 01 (SC) | 01 Open, 01 (SC) |
| 8 | Agadtantra evam Vidhi Vaidyaka | 01 (SC) | 01 Open | 01 Open, 01 (SC) |
| 9 | Prasuti evam Striroga | 01 Open , | 01 Open | 01 Open |
| 10 | Kayachikitsa | 01 Open | 01 Open, 01 (SC), 01 (VJ –A) | 01 Open, 01 (SC), 01 (VJ- A) |
| 11 | Shalyatantra | ----- | ----- | 01 Open |
| 12 | Shalakyatantra | ---- | 01 Open | 01 Open, 01 (SC) |
| 13 | Kaumarbhrutya | 01 (SC) | 01 (SC) | 01 Open, 01 (SC),01 (VJ- A) |
| 14 | Panchkarma | ----- | 01 Open | 01 (SC) |

QUALIFICATION & EXPERIENCE FOR THE TEACHING STAFF (As per MUHS Nashik):-

Note : 1) Candidate should bring Application alongwith Attested Xerox copies of necessary documents with 3 passport size photo & all original documents on 09.07.2025 at 10am.
2) Selection criteria as per MUHS & UGC rule

Secretary
BCYRC ,
Nagpur

# शेख हसीना भारतातच सुरक्षित...!

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांचा मुक्काम भारतात नवी दिल्लीत असला तरी दिवसेंदिवस बांगलादेशचे सल्लागार मुहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारने हसीना यांना कायदेशीर कारवाईत अडकविण्यासाठी सर्व काही पणाला लावले आहे.

बांगलादेशच्या नॅशनल सेंट्रल ब्युरोने इंटरपोलला बारा जणांच्या विरोधात रेड नोटीस जारी करण्याची शिफारस केली आहे. उच्चपदस्थांच्या यादीत शेख हसीना यांचेही नाव आहे. बांगलादेशात गेल्यावर्षी सरकारविरोधात मोठा हिंसक उठाव झाल्यानंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी ७७ वर्षांच्या शेख हसीना यांना पंतप्रधानपदावरून पायउतार होऊन आश्रयासाठी भारतात यावे लागले होते. बांगलादेशात सरकारविरोधी असंतोषाचा स्फोट झाल्यावर देशावर तब्बल सोळा वर्षे असलेल्या अवाम लीग पक्षाचे वर्चस्व संपुष्टात आले आणि या पक्षाचे शासनही सत्तेवरून गेले.

गेल्या वर्षी जुलै-ऑगस्टमध्ये शेख हसीना यांच्या सरकारच्या विरोधात असंतोष शिगेला पोहोचला होता. ढाका व अन्य शहरात हिंसाचाराचे थैमान सुरू होते. आपला जीव वाचविण्यासाठी देश सोडणे त्यांना भाग पडले. त्या ढाक्यातून विमानाने भारताकडे निघाल्या आणि अवघ्या तीस मिनिटांत आंदोलकांनी ढाक्यातील त्यांच्या अधिकृत निवासस्थानाचा कब्जा घेतला व तेथे तोडफोड व जाळपोळ केली.

हसीना ढाक्यातून पलायन करण्याच्या तयारीत आहेत हे लष्करप्रमुख जनरल वकार उझ जमान यांनाही तेव्हा ठाऊक नसावे. हसीना पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याच्या तयारीत आहे, एवढीच माहिती त्यांच्याकडे होती. नंतर जनरल वकार यांनी दिलेल्या एका मुलाखतीत म्हटले की, परिस्थिती एवढी चिघळली होती की, शेख हसीना यांनी देशात राहणे हे त्यांच्या जीवाला धोकादायक होते.

अशा परिस्थितीत बांगलादेश हवाई दलाच्या विशेष विमानाने ढाक्यातील बंग बंधू विमानतळावरून दुपारी ३ वाजून ९ मिनिटांनी उड्डाण केले व हसीना यांना भारतातील उत्तर प्रदेशातील गजियाबादमधील हिंडन विमानतळावर पोहोचवले. हसीना यांची हिंसक आंदोलनातून कशी सुटका करण्यात आली याविषयी तेव्हा कमालीची गुप्तता पाळण्यात आली होती, त्याचा वृत्तांत डेली स्टार या ढाक्यातील वृत्तपत्राने प्रसिद्ध केला.

ढाक्यात सर्वोच्च पदावर वर्षानुवर्षे बसलेल्या शेख हसीना यांना देशातील प्रखर लोकक्षोभापुढे देश सोडून भारतात यावे लागले. बांगलादेशच्या हंगामी सरकारने भारताकडे अनेकदा शेख हसीना यांना आमच्या ताब्यात द्या अशी मागणीही केली. मात्र बांगलादेशच्या मागणीवर भारताने कधीही प्रतिक्रिया दिली नाही.

शेख हसीना सत्तेवर असताना भारत-बांगलादेश यांचे संबंध मैत्रीपूर्ण होते व दोन्ही देशांत डझनावारी द्विपक्षीय करारही झाले. शेख हसीना यांनी भारतात राजाश्रय घेतल्यापासून मोहमद युनूस यांच्या काळात दोन्ही देशातील संबंध बिघडले व कटुता निर्माण झाली. मुहम्मद युनूस यांच्या सरकारचा कल पाकिस्तान व चीनकडे झुकलेला आहे हे जाणवत आहे.

बांगलादेशच्या आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधिकरणात शेख हसीना व इतरांच्या विरोधात आरोपपत्र दाखल झाले आहे. हसीना यांच्याविरोधात १३४ पानी आरोपपत्र दाखल झाले आहे. जुलै २०२४ मध्ये देशात आंदोलनाचा वणवा पेटला असताना आंदोलकांना हसीना सरकारने क्रूरपणे वागवले, हसीना सरकारच्या काळात विरोधी पक्षाचे अनेक नेते बेपत्ता होते व अनेकांच्या हत्यांमध्ये सरकारमध्ये असलेल्यांचा सहभाग होता, असेही आरोपपत्रात म्हटले आहे.

जुलै-ऑगस्टमध्ये झालेल्या आंदोलनात १४०० पेक्षा जास्त लोकांची हत्या झाली, त्यालाही हसीना व त्यांचे सहकारी कारणीभूत असल्याचा आरोप आहे. एवढेच नव्हे तर शेख हसीना व तत्कालीन गृहमंत्री असदुज्जमां खान कलाम यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी करण्यात आले आहे.

माजी पोलीस महानिरीक्षक चौधरी अब्दुल्ला अल मामून यांना यापूर्वीच अटक झाली आहे. विदेशात असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी व त्यांना हुडकून काढण्यासाठी बांगलादेश नॅशनल ब्युरोने इंटरपोलची मदत घेतली आहे.

मुहम्मद युनूस हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार आहेत व गेल्या वर्षी ८ ऑगस्टपासून त्यांच्या नेतृत्वाखालील सरकार देशाचा कारभार पाहत आहे. मुहम्मद युनूस यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर आंतरराष्ट्रीय अपराध न्यायाधिकरणाने हसीना, त्यांच्या सरकारमधील मंत्री तसेच सल्लागार यांच्याविरोधात अटक वॉरंट जारी केले. सैन्य दल व नागरिकांना अमानवीय वागणूक दिली जात असल्याचा आरोप करण्यात आला होता.

एवढेच नव्हे हसीना सरकारने देशात नरसंहार घडविण्याचा गंभीर आरोप बांगलादेश सरकारने केला आहे. शेख हसीना यापुढेही भारतातच राहणार असतील तर त्यांना देशात परत आणण्यासाठी आंतरराष्ट्रीय हस्तक्षेप करण्याची विनंती आम्हाला करावी लागेल असा इशारा बांगलादेशने भारताला दिला आहेच.

रेड कॉर्नर नोटीस हे काही वॉरंट नसते. जरी इंटरपोलने शेख हसीना यांना रेड कॉर्नर नोटीस बजावली तरी त्यांना बांगलादेशात परत पाठवायचे की नाही हे भारत सरकारच्या मर्जीवर अवलंबून आहे. भारतीय कायद्यानुसार शेख हसीना यांना इंटरपोल थेट अटक करू शकणार नाही. बांगलादेशबरोबर भारताचा प्रत्यार्पण करार झालेला आहे का? शेख हसीना यांच्याविरोधात केवळ राजकीय दृष्टिकोनातून रेड कॉर्नर नोटीस बजावण्यात आलेली आहे का? शेख हसीना यांना बांगलादेशकडे सोपविणे म्हणजे नव्या राजकीय वादळाला ओढवून घेण्यासारखे आहे, असे भारताला वाटले तर भारत रेड कॉर्नर नोटिसीला प्रतिसादही देणार नाही.

बांगलादेशातील मुहम्मद युनूस यांच्या सरकारने शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षावर दहशतवाद विरोधी कायद्याचा बडगा दाखवून यापूर्वीच बंदी घातली आहे. आवामी लीग पक्षाने मात्र सरकारची कृती ही हुकूमशाही व लोकशाही विरोधी असल्याचे म्हटले आहे.

आवामी लीगवर बंदी घालून व नेत्यांवर खटले भरून युनूस सरकार बांगलादेशची ओळखच पुसून टाकत आहे, आवामी लीगच्या नेत्यांवर खटले भरण्यासाठी कायद्यात केलेली सुधारणा हा बांगलादेशच्या इतिहासातील काळा दिवस आहे असे, पक्षाने म्हटले आहे. एवढेच नव्हे तर बांगलादेशच्या चलनातील नव्या नोटांवरून देशाचे संस्थापक व निर्माते शेख मुजीबूर रहेमान यांचा फोटोही हटविण्यात आला आहे.

आवामी लीग हा बांगलादेशचा सर्वात जुना पक्ष आहे. बंगबंधू शेख मुजीबूर रहेमान यांच्या नेतृत्वाखाली बांगलादेशला पाकिस्तानमधून मुक्ती मिळाली व नवा स्वतंत्र देश उदयाला आला. बांगलादेशच्या निर्मितीत भारताचे योगदान फार मोठे आहे. पण मुहम्मद युनूस हे ते मान्य करायलाच तयार नाहीत.

गेल्यावर्षी २०२४ मध्ये शेख मुजीबूर यांच्या कन्या शेख हसीना यांनाच देश सोडून भारतात आश्रय घेण्यासाठी यावे लागले हे दुर्दैव आहे. बांगलादेश राष्ट्रीय परिचय पत्र नोंदणी महासंचालकांनी शेख हसीना व त्यांच्या परिवारातील दहा जणांचे राष्ट्रीय ओळखपत्रही रद्द केले आहे. शेख हसीना या फेसबुकवर सक्रिय असून मुहम्मद युनूस सरकारवर कठोर प्रहार करीत आहेत. युनूस यांच्यावर आरोप करताना त्या म्हणतात - त्यांनी दहशतवाद्यांच्या मदतीने सत्ता काबीज केली आहे.

शेख हसीना व त्यांच्या पक्षाला बांगलादेशच्या राजकारणात कोणतीही भूमिका बजावता येणार नाही, अशी कायदेशीर कोंडी मुहम्मद युनूस यांच्या हंगामी सरकारने केली आहे. मात्र मुहम्मद युनूस यांना कुठे अपयश आले तर शेख हसीनांवरील कारवाई त्यांच्यावर बूमरँग ठरू शकते. बांगलादेश नॅशनल पार्टीच्या प्रमुख खलिदा झिया या डिसेंबरपर्यंत देशात निवडणुका घ्या म्हणून आग्रही आहेत.

लष्करप्रमुख जनरल वकार उझ जमान यांनी म्हटले आहे की, केवळ निवडून आलेल्या सरकारमुळेच बांगलादेशात राजकीय स्थिरता येऊ शकते, अनिर्वाचित प्रशासनामुळे नाही. देशात राजकीय पक्षांशी सहमती होत नसल्याने मुहम्मद युनूस राजीनामा देण्याच्या तयारीत आहेत अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या.

शेख हसीना यांचे राजकीय भविष्य संपविणे व त्यांना कायमचे जेलमध्ये डांबणे हाच युनूस यांचा अजेंडा दिसतोय. बांगलादेशातील अस्थिर वातावरणात शेख हसीना भारतातच सुरक्षित आहेत.

■ ■ ■

# मद्याची दुकाने, बिअर बार यांवरील देवतांची नावे केव्हा बदलणार?

४ जून २०१९ या दिवशी महाराष्ट्र सरकारने मद्याची दुकाने, बियर बार आणि परमिट रूम्स यांना देण्यात आलेली देवीदेवता, राष्ट्रपुरुष, संत, गड-किल्ले यांची नावे बदलण्यात यावी असा शासन आदेश काढला.

या आदेशाला आज ६ वर्षे उलटली तरी राज्यातील अनेक बिअर बार आणि मद्याच्या दुकानांवरील श्रद्धास्थानांची नावे अद्याप पालटली गेली नसल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याऐवजी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सदर आदेशच मागे घेण्यासाठी शिफारस केल्याचा धक्कादायक प्रकार गतवर्षी एका माहितीच्या माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या माहितीद्वारेउघड झाला होता.

भाविक, राष्ट्रप्रेमी आणि शिवप्रेमी यांच्या श्रद्धेचा सन्मान राखण्याऐवजी बार मालकांची वकीली करणाऱ्या उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र शासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणीही हिंदुत्ववादी आणि राष्ट्रप्रेमी संघटनांनी त्यावेळी केली होती.

या गोष्टीला आता वर्ष उलटले तरीही परिस्थिती जैसे थे आहे. दुकाने आणि बार यांची नावे बदलण्यासाठी अनेक शासकीय विभागांकडे पत्रव्यवहार करावा लागतो. कमी कालावधीमध्ये हे करणे शक्य नाही. त्यामुळे हा आदेशच रद्द करण्यात यावा आणि नवीन नावे देतांना श्रद्धास्थानांची नावे न देण्याची सुधारणा विभागाने सुचवली आहे. मुळातच हा आदेश निघून आज सहा वर्षे उलटली असताना राज्य उत्पादन शुल्काला आणखी किती वेळ हवा आहे?

नियमाची अंमलबजावणी करणे हे अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. त्यामुळे उत्पादन शुल्क विभागाने शासनाजवळ बार मालकांची वकिली न करता शासनाच्या आदेशानुसार कठोर कार्यवाही करणे अपेक्षित असताना तसे काही घडताना दिसत नाही. वरील आदेश निघाल्यानंतर प्रशासनाकडून तत्परतेने कारवाईला सुरुवातही करण्यात आली होती.

या आदेशाचे पालन करताना राष्ट्रपुरुष म्हणून कोणती नावे ग्राह्य धरण्यात यावीत यासंबंधी विद्यमान पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्या नावासह ५६ नावांची जंत्री सोबत जोडण्यात आली होती, त्याचसोबत १०५ गड आणि दुर्गांची सूचीही देण्यात आली होती त्यामुळे कार्यवाही करण्याबाबत अधिकाऱ्यांमध्येसुद्धा स्पष्टता आली होती; मात्र देवता म्हणून कोणती नावे ग्राह्य धरावीत याबाबत कोणतीच सुस्पष्टता नसल्याने मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार यांना आजही देवतांची नावे दिलेली अनेक ठिकाणी दिसून येतात.

देवतांच्या नावाची सूची आदेशात देण्यात आली नसल्याने कारवाईसाठी गेलेल्या अधिकाऱ्यांना संबंधित आस्थापनांचे मालक दिलेली नावे ही त्यांच्या नातेवाईकांपैकी कुणाची तरी असल्याचे सांगतात. देवतांच्या नावांबाबत स्पष्टता नसल्याने अधिकाऱ्यांमध्येही संभ्रम निर्माण होतो. परिणामी कारवाई करण्यावर बंधने येतात. अशी कारणे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आली होती.

धर्मशास्त्रानुसार ज्या ठिकाणी देवतेचे नाव अथवा चित्र असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध आणि शक्ती कार्यरत असते. त्यामुळे मद्याची दुकाने, परमिट रूम्स आणि बिअर बार्स यांसारख्या आस्थापनांना त्यांची नावे दिल्याने देवतांचा अवमान होतो. हा अवमान थांबवण्यात यावा यासाठी धार्मिक असेच हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी अनेक वर्षे आंदोलने केल्यामुळेच सरकारला आदेश काढून यांवर कारवाई करणे भाग पडले होते; मात्र ही कारवाई तोंडदेखली होती आणि शासनाला या बाबीशी काही देणेघेणे नव्हते हे आज ६ वर्षांनंतर लक्षात येत आहे.

आजमितीला राज्यात सत्तेत असणाऱ्या ३ पक्षांपैकी दोन प्रमुख पक्ष हिंदुत्वनिष्ठ विचारांचे आहेत. त्यांनी याप्रकरणी तत्परतेने लक्ष घालून देवतांची नावे संकलित करून ती सुधारित आदेशात जोडावीत आणि देवतांचा होणारा अवमान थांबवावा!



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

■ ■ ■

# समाजाला घडवत असताना कवितेच्या दुनियेत रमणारी आदर्श शिक्षिका

सौ अनुपमा जाधव यांचा २७ जून हा वाढदिवस. त्यानिमित्त दोन शब्द लिहिण्याचे भाग्य मला प्राप्त झाले. डहाणू येथील उपक्रमशील आदर्श शिक्षिका कथाकार बालकवयित्री समाजसेविका, सामाजिक कार्यकर्त्या, पर्यावरण प्रेमी.

आपली नोकरी सांभाळून, घर संसार सांभाळून साहित्याच्या दुनियेत रमल्या आहेत. सौ. जाधव यांची लोकक्रांती सेना प्रणालीत लोक क्रांती शिक्षक सेनेच्या महाराष्ट्र प्रदेश संपर्कपदी त्यांची निवड झालेली आहे तसेच त्यांची चार पुस्तकं प्रकाशित झालेली आहे.

१. समुद्रसंगीत काव्यसंग्रह
२. वहिवाट कवितासंग्रह.
३. अनुबंध कथासंग्रह.
४. रानझरा हा मराठी व अहिराणी बोलीभाषेतील कविता संग्रह प्रकाशित झालेला आहे.



तसेच मुंबई, पुणे, नाशिक केंद्रावर त्यांचे कविता वाचन व मुलाखती प्रसारित झालेल्या आहेत. डहाणू नगरपालिकेसाठी स्वच्छ भारत अभियान प्रबोधन गीतांची त्यांची निर्मिती केली असून त्यांची गाणी नगरपालिकेच्या घंटागाडीवर वाजवली जातात.

सौ. अनुपमा जाधव या विद्यार्थी प्रेमी शिक्षिका असून त्यांनी शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. राष्ट्रीय हरितसेनेचे त्या कार्य करत आहे. उपक्रम राबवीत असताना शालेय विद्यार्थ्यांसाठी कविता फुलते.. कथाकथन कसे करावे, टाकाऊ वस्तुपासून टिकाऊ वस्तू कशी तयार करावी. एक विद्यार्थी एक झाड, राष्ट्रभाषा हिंदी परीक्षांचे आयोजन, गरजू विद्यार्थ्यांना शालेय ग्रंथालय वस्तू प्राप्त करुन देणे, अशा विविध कार्यक्रमातून त्या सतत झिजत असतात, कार्य करत असतात. त्या शिक्षिका मुलांची केवळ बाई नाही तर चिमुकल्यांची आई होऊन मायेची पाखरन करत असतात आणि त्या मायेच्या प्रेमाने त्या मुलं घडवत असतात.

मुलांशी असलेलं जीवाभावाचं हृदयाचं नात त्या शिक्षिकेचं वेगळं पण आधारित करत असतं. मुलांसाठी कविता गाणी गोष्टींचा भरपूर साठा आहे खाऊ आहे शिवाय कथाकथनाचे त्यांच्याकडे उपजत अंग आहे.

आकाशवाणी विविध शैक्षणिक सामाजिक साहित्यिक संस्थांमधून त्यांचे कथाकथन कार्यक्रम वाचन नियमित होत असतात. विविध उपक्रम राबवणाऱ्या या शिक्षिका कथा निवेदक अहिराणी आणि राष्ट्रभाषा हिंदी राष्ट्रभाषेच्या प्रचारक, प्रसारक आहेत.

त्यांच्या या अनुबंधनात ऋण बंधनाचे एक आगळे वेगळे नाते असून समाजाच्या प्रति असलेली त्यांची बांधिलकी मुलांना घडवण्याचे व्रत समाजासाठी जाणीव जागृत करत असते. त्यांच्या लेखणीतून विविध कंगोरे छटा त्यांच्या साहित्यात दिसून येतात, जाणवत आहे. जीवन फुलवण्यासाठी त्यांची धडपड विलक्षण अशी आहे.

धरी लाभ चित्ती वसा सदगुणांचा अशा विचारांवर रूढ श्रद्धा ठेवण्याचा त्यांचा स्वभाव गुण त्यांच्या अनेक कवितेचा आत्मा होऊन जातो. त्यांच्या संघर्षात पूर्वतेची ओढ आहे असे सहजगत्या वाचकांना सांगून जाते. त्यांची लढण्याची वृत्ती भावनेतून रचता येते.

सद्गुण सुलभता वास्तविकता शिकवण अवघड होऊन जातं मोठे होण्याची उर्मी आपलं वेगळं पण लोकांच्या मनावर घर करुन संवेदनशील कविता जन्माला येतात.

स्वतःचं दुःख हरवून अस्वस्थता त्यांना स्वस्त बसू देत नाही कवीची चळवळ हाच त्यांचा ध्यास आहे आणि यशस्वी माणूस तोच असतो जो स्वतःच्या यशात जो दुसऱ्याला उभा करतो आणि मार्गदर्शक होतो. अशा या हळव्या हिरव्यागार मनाच्या कवयित्री डहाणू येथील निसर्गाच्या सानिध्यात राहतात, समुद्र उशाशी घेऊन मुंबईची गर्दी पाहतात. आणि त्यांचं शब्दांचे पीक जोरात उगवू लागतं. उद्याच्या सूर्यनारायणाची किरण त्यांच्या अंगणात पडतील.

*पक्षांचे थव्यांचे मधुर गायन त्यांच्या*
*कानी नेहमी ऐकायला मिळो...*
*अंधकारातून उजेडाकडे घेऊन*
*जाणारी पायवाट अधिक बळकट*
*होओ...*
*त्यांच्या लेखणीला अजून बळ येवो*
*आणि असंच सातत्य त्यांच्यात कायम*
*राहो ......*
*फळांचा फुलांचा सुगंध घेऊन येणारी*
*हवेची पहिली लाट त्यांच्या अंगणात*
*दुर्मळो.....*
*त्यांना आरोग्यमय करुन जाओ आणि*
*दीघार्युष्य लाभो ही त्यांच्या*
*वाढदिवसानिमित्त लाख लाख*
*शुभेच्छा.....*

ईश्वर पाटील
आकाशवाणी खमण, सुरत.
९९९८५२५०७२

# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०४ वि जयंती.

आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला.

१९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली.

१९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली.



१९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सवार्नुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते.

त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले.

यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे.

नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली.

देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निधार्राचे दर्शन घडवले.

नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! ■ ■ ■



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

# हिंदी सक्तीचा विरोध आणि एकत्र मोर्चा

महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी सक्ती विरोधामध्ये राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी वेगवेगळे आंदोलन करण्याची घोषणा केली होती. मात्र आता महाराष्ट्रातील शाळांत हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी घोषणा उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे. त्यांच्या या पोस्टमुळे आता राज्यातील नव्या राजकीय समीकरणाची चर्चा सुरू झाली आहे.

महाराष्ट्रातील शाळांमध्ये हिंदी सक्ती विरोधामध्ये सर्वच विरोधी पक्ष एकत्र येणार असल्याचे संकेत मिळत होते. तेच आता स्पष्ट झाले आहे. काल राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी सात जुलै रोजी आझाद मैदानावर आंदोलन करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासूनच सर्व एकत्र का येत नाही? असे प्रश्न विचारले जात होते.

यावर आता अखेर तोडगा निघाला असून हिंदी सक्ती विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट संजय राऊत यांनी केली आहे. यासोबतच संजय राऊत यांनी राज आणि उद्धव ठाकरे यांचा एकत्रित फोटो देखील पोस्ट केला आहे.

राज्य सरकारच्या वतीने त्रिभाषा सूत्र स्वीकारण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकवली जाणार आहे. राज्य सरकारच्या निर्णयाच्या विरोधामध्ये ठाकरे बंधू एकत्र आले आहेत.

या आधी राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी तर उद्धव ठाकरे यांनी ७ जुलै रोजी मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली होती. दोन्ही ठाकरे बंधू जर मोर्चा काढणार असतील तर एकत्र का नाही? असा प्रश्न त्यामुळे राज्यात विचारला जात होता. त्यातच आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली आहे.



महाराष्ट्रातील शाळात हिंदी विरोधात एकच आणि एकत्र मोर्चा निघेल, अशी पोस्ट त्यांनी केली आहे. त्यामुळे हिंदी सक्ती विरोधात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार हे निश्चित झाले आहेत.

ठाकरे बंधू एकत्र आल्यास काही सत्ताधारी पक्षांना मोठा फटका बसू शकतो. बघुया, काय होते ते?

■ ■ ■

# केवळ दुध दहीमध्येच नव्हे तर शाकाहारी पदार्थांमध्येही आहे भरपूर कॅल्शियम




कॅल्शियम हे आपल्या शरीरासाठी एक आवश्यक खनिज आहे, जे आपल्या शरीरातील हाडे व दात मजबूत ठेवण्यास मदत करतात. तसेच मज्जासंस्थेसाठी, स्नायूंच्या आकुंचनासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी देखील महत्त्वाचे आहे. कॅल्शियमच्या कमतरतेमुळे हाडे कमकुवत होऊ शकतात. कॅल्शियम फक्त दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमधून मिळते असे नव्हे तर अनेक शाकाहारी पदार्थ आहेत जे कॅल्शियमने समृद्ध आहेत.

**तीळ :** तीळ कॅल्शियमचा एक उत्तम स्त्रोत आहे. १०० ग्रॅम पांढऱ्या तिळामध्ये सुमारे ९७५ मिलीग्राम कॅल्शियम असते. आहारात तीळाचा समावेश करा जेणेकरून हाडे मजबूत होतीलच, शिवाय त्वचा आणि हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरेल.

**हिरव्या पालेभाज्या :** पालक, मेथी यासारख्या हिरव्या भाज्या कॅल्शियमचे चांगले स्त्रोत आहेत. १०० ग्रॅम पालकामध्ये सुमारे ९९ मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यामुळे तुमच्या आहारात हिरव्या पालेभाज्यांचा समावेश करा.

**बदाम :** बदाम केवळ प्रथिने आणि व्हिटॅमिन ई ने समृद्ध नाही तर ते कॅल्शियमचा एक चांगला स्त्रोत देखील आहे. १०० ग्रॅम बदामात सुमारे २६० मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यामुळे नाष्ट्यामध्ये किंवा दिवसभरात केव्हाही बदामाचे सेवन करा.

**अंजीर :** सुक्या अंजीरमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते. २ सुक्या अंजीरमध्ये सुमारे ६५ मिलीग्राम कॅल्शियम आढळते. हे पचन सुधारण्यास तसेच हाडे मजबूत करण्यास मदत करते.

**सोया उत्पादने :** टोफू, सोया मिल्क आणि सोया चंक हे कॅल्शियमचे चांगले स्त्रोत आहेत. १०० ग्रॅम टोफूमध्ये सुमारे ३५० मिलीग्राम कॅल्शियम असते. याच्या नियमित सेवनाने हाडे मजबूत होतात.

**चिया बियाणे :** १०० ग्रॅम चिया बियांमध्ये ६३१ मिलीग्राम कॅल्शियम असते. त्यात ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि फायबर देखील भरपूर असते जे हाडांसाठी तसेच हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तुम्ही हे चिया बियाणे स्मूदी किंवा दह्यात मिक्स करून खाऊ शकता.

**राजमा आणि चणे :** राजमा, चणे आणि काळे वाटाणे यासारख्या कडधान्यांमध्ये आणि बीन्समध्ये कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. १०० ग्रॅम राजमामध्ये १०० मिलीग्राम कॅल्शियम असते आणि त्याहून अधिक म्हणजे १०० ग्रॅम हरभरामध्ये १०५ मिलीग्राम कॅल्शियम असते.

**दूध आणि दुग्धजन्य पदार्थ :** दूध, दही आणि चीज हे कॅल्शियमचे उत्तम स्त्रोत आहेत. १ ग्लास दुधात ३०० मिलीग्राम कॅल्शियम असते. सर्व सदस्यांनी रोज दुधाचे सेवन केले पाहिजे, जेणे करून कॅल्शियमची कमतरता भासणार नाही. ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### गड आला पण..!

ये रे ये रे पावसा म्हणून
केली पावसाची मनधरणी
विनवणीला तर पावला
म्हणून हर्ष जाहला मनी..

आला होता वाजत गाजत
पण .. जाता जाता
गेला ना नाचत
उभी पिके घेऊन सोबत..

नद्यांना आला महापूर
शेतात साचले पाणी
क्षणार्धात सारे हिरावले
म्हणून आसू आले नयनी ..

# ती आणीबाणी नव्हती, तर सत्तेवर बसलेल्या काँग्रेसचा अन्यायकाल होता : अमित शाह

**नवी दिल्ली, २७ जून :** भारताच्या घटनात्मक इतिहासात २५ जून १९७५ ही केवळ एक तारीख नाही, तर तो एक काळा दिवस आहे जेव्हा सत्तेच्या हव्यासाने लोकशाहीची आत्मा चिरडून टाकण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री तसेच भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते अमित शहा यांनी स्पष्टपणे म्हटले आहे की तो काळ केवळ 'आणीबाणी' नव्हता, तर सत्तेवर टिकून राहिलेल्या काँग्रेसची खुर्ची वाचवण्याची अखेरची धडपड होती तो 'अन्यायकाल' होता, जो देशाच्या सुरक्षेच्या नावाखाली देशावर लादण्यात आला होता.

या काळ्या अध्यायाने केवळ अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गळा दाबला नाही, तर न्यायपालिकेला बहिरे केले आणि प्रसारमाध्यमांची शाई आटवली. २१ महिने हा लोकशाहीविरोधी शांततेचा अंधार संपूर्ण देशावर पसरलेला होता, आणि भारताची जनता आपल्या देशातच कैदी बनली होती.

जेव्हा भारत सरकारने या दिवसाला संविधान हत्या दिवस म्हणून पाळण्याचा निर्णय घेतला, तेव्हा तो लोकशाहीच्या मूल्यांप्रती एक राष्ट्रीय नवचेतनेचा उद्घोष होता.

आणीबाणीच्या त्या अंधारमय काळात, जेव्हा संपूर्ण देश दडपशाही आणि भीतीच्या सावटाखाली होता, तेव्हा एक तरुण प्रचारक जो आज भारताचा पंतप्रधान आहे भूमिगत होऊन लोकशाहीचा दिवा पेटवत होता. कधी साधू तर कधी वृत्तपत्रविक्रेते अशा रूपात त्यांनी लोकजागृतीची मशाल पेटवली. आज तेच नेते १४० कोटी भारतीयांच्या विश्वास, आकांक्षा आणि आशांचा आधारस्तंभ आहेत. ही केवळ इतिहासाची विडंबना नाही, तर एक प्रतिशोध आहे अशा युगापासून जो मी सर्वोच्च या विचारसरणीने ग्रस्त होता, तेव्हा आता आपण अशा युगात प्रवेश करत आहोत जिथे राष्ट्र सर्वोपरि हा उद्घोष जनमानसाची जागृत चेतना बनलेला आहे.




पंतप्रधान मोदी जिथे जनभावनांचे प्रतीक आहेत, तिथे त्यांचे सर्वात विश्वासू रणनीतिक सहकारी, लोकशाहीचे दृढ सेनापती आणि आधुनिक भारताचे चाणक्य अमित शहा ते लोकशाहीचे सजग प्रहरी आहेत, जे लोकशाहीला केवळ एक व्यवस्था नाही, तर भारतीय जीवनशैलीचा अविभाज्य भाग मानतात.

संविधान हत्या दिवस या राष्ट्रीय कार्यक्रमात अमित शहा यांचे भाषण हे केवळ एक वक्तव्य नव्हते, तर लोकशाहीची पुनर्परिभाषा होती. त्यांनी आठवण करून दिली की २४ जून १९७५ ची रात्र ही भारताच्या इतिहासातील सर्वात अंधारी रात्र होती, ज्यात लोकशाहीचा सूर्य २१ महिन्यांसाठी मावळला. एका किचन कॅबिनेटच्या आदेशावर, संसद किंवा मंत्रीमंडळाच्या मान्यतेशिवाय, केवळ एका सहीने संविधानाला गप्प करण्यात आले. ज्याच्या निर्मितीस संविधान सभेला २ वर्षे, ११ महिने आणि १८ दिवस लागले, त्या संविधानाला केवळ एका निर्णयाने अपंग करून टाकले गेले. १.१० लाखांहून अधिक राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना तुरुंगात टाकण्यात आले, १ कोटीहून अधिक नागरिकांची जबरदस्तीने नसबंदी करण्यात आली आणि २५३ पत्रकारांना अटक करण्यात आली. प्रेसवर सेन्सॉरशिप इतकी कडक होती की वृत्तपत्रांचे संपादकीय पानं रिकामी छापून यायला लागली.

हे लक्षात घेण्यासारखं आहे की खरोखर देशाला कोणताही धोका होता का? की फक्त सत्ता हातातून जात होती? आता इतिहासच याचं उत्तर देतो आहे. हा धोका देशाचा नव्हता, तर एका कुटुंबाच्या सत्तेचा होता. आज जे काही पक्ष वारंवार संविधानाच्या रक्षणाची हाक देतात, त्यांनीच १९७५ मध्ये संविधानाची हत्या केली होती. संसद, न्यायपालिका, प्रेस सगळ्यांना अधीन करण्याचा प्रयत्न केला गेला. आज जे पक्ष लोकशाहीच्या नावाने गोडवे गात आहेत, त्या सगळ्याच त्या काळात सत्तेशी एकत्र उभ्या होत्या आणि सत्तेचा लाभ घेणाऱ्यांमध्येही होत्या. आणि हाच तो टप्पा आहे जिथून काँग्रेसच्या राजकीय अधोगतीची सुरुवात झाली जी आज राजकीय अप्रासंगिकतेच्या उंबरठ्यावर उभी आहे.

आणीबाणी हा केवळ इतिहासाचा एक भाग नाही, तर तो एक इशारा आहे की लोकशाहीला सदैव जागृत पहारेकरी लागतात. पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात भारताने गुलामीच्या मानसिकतेपासून मुक्तीचा जो निर्धार घेतला आहे, तो तेव्हाच पूर्ण होईल जेव्हा आपण भूतकाळाच्या चुकांना केवळ लक्षात ठेवणार नाही, तर त्यातून शिकणारही आहोत. आज भारत अशा युगात प्रवेश करत आहे जिथे मी नव्हे तर आपण ही भावना नेतृत्व करते. आणि हा बदल केवळ राजकीय नाही, तर सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चेतनेचा जागर आहे ज्याचे नेतृत्व पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा करत आहेत.



# अदानी फाउंडेशनने सुरबर्डी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले

**नागपूर, २७ जून :** अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्या वाढदिवसानिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या 'अदानी दिवसा'निमित्त, सुराबर्डी येथील इनक्लाइन साइटच्या व्हीटीसी रूममध्ये 'मेगा रक्तदान मोहीम २०२५' आयोजित करण्यात आली होती. या शिबिरात रक्त संकलन जीवन ज्योती रक्तपेढीने केले.

या उपक्रमात एकूण ३७ जणांनी रक्तदान केले, ज्यात अदानी ग्रुपचे २७, डीसीएस लिमिटेडचे ६ आणि इतर ४ कर्मचारी होते. या कार्यक्रमाचा उद्देश लोकांमध्ये रक्तदानाविषयी जागरूकता पसरवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत प्रभावित झालेल्यांना महत्त्वाची मदत पुरवणे आहे.

# लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने त्यांचा सर्वात महत्त्वाकांक्षी उत्पादन पोर्टफोलिओ लाँच केला

**नवी दिल्ली, २७ जून :** देशातील प्रमुख औद्योगिक क्लस्टर्स आणि ग्रोथ कॉरिडॉरना पाठबळ देण्याच्या उद्देशाने भारतीय इलेक्ट्रिकल आणि ऑटोमेशन क्षेत्रातील आघाडीची कंपनी लॉरिट्झ नूडसन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनने आज त्यांच्या आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या उत्पादन पोर्टफोलिओचे अनावरण केले. या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा एक भाग म्हणून, ब्रँड देशातील ३० औद्योगिक शहरांमध्ये फिरून भारतातील उत्पादन आणि पायाभूत सुविधा केंद्रांच्या मध्यभागी तंत्रज्ञानाचा अवलंब वाढविण्यासाठी स्थानिक नेते, भागधारक आणि इकोसिस्टम भागीदारांशी संवाद साधत आहे.

कमी-व्होल्टेज, औद्योगिक ऑटोमेशन आणि नवीन ऊर्जा लँडस्केपसाठी आवश्यक उपायांवर लक्ष केंद्रित करून, लॉरिट्झ नूडसेन तंत्रज्ञानावर आधारित परिवर्तन घडवत आहे जे भारताच्या औद्योगिक केंद्रांपर्यंत पोहोचते. ही ऐतिहासिक मोहीम सरकारच्या विकसित भारत २०४७च्या दृष्टिकोनाशी सुसंगत असून, तंत्रज्ञानदृष्ट्या प्रगत, आर्थिकदृष्ट्या लवचिक आणि एनर्जी-स्मार्ट भारत निर्माण करण्याच्या कंपनीच्या वचनबद्धतेला अधोरेखित करते.

ग्राहकांना सुरक्षित, जलद आणि स्मार्ट काम करण्यास सक्षम बनवणाऱ्या स्मार्ट तंत्रज्ञानाचा पुरवठा करणे हा आमचा उद्देश आहे. या पोर्टफोलिओद्वारे, आम्ही नव्याने सुरू केलेले उपक्रम हा भारतातील प्रत्येकासाठी सुलभ आणि त्यांच्याशी जोडलेले असले पाहिजेत, याची काळजी घेतो. रायपूरमधील भात गिरणीचे स्वयंचलितकरण असो, कोइम्बतूरमधील कापड गिरणीला वीजपुरवठा असो किंवा पुण्यातील प्लांटचे आधुनिकीकरण असो, आमचा पोर्टफोलिओ प्रभावासाठी डिझाइन केलेला आहे, असे लॉरिट्झ नूडसेन इलेक्ट्रिकल अँड ऑटोमेशनचे सीओओ नरेश कुमार म्हणाले.

२०२९ पर्यंत भारतातील विद्युत उपकरण क्षेत्र ९५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त वाढेल आणि २०३३पर्यंत औद्योगिक ऑटोमेशन ३९.६५ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा आहे. १. भारतीय उत्पादक आधीच त्यांच्या ऑपरेटिंग बजेटपैकी ३५% टेक्नॉलॉजी मॉडर्नायझेशनमध्ये गुंतवत आहेत - हे जागतिक सरासरीपेक्षा जास्त आहे. हे बदल केवळ संख्यात्मक नाहीत; तर ते अधिक स्मार्ट, अधिक कार्यक्षम प्रणालींसाठी देशव्यापी मोहिमेचे प्रतिबिंब आहेत. २०४७च्या विकसित भारत दृष्टिकोनाशी जुळवून घेत, आम्ही केवळ उत्पादने लाँच करत नाही - तर स्मार्ट, स्वच्छ आणि भविष्यासाठी भारताला संक्रमण सक्षम करत आहोत, असे ते पुढे म्हणाले.

# जयपूर ते नागपूर, सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोने देशभरात समस्या-निवारक घडवण्याला चालना दिली

**गुरूग्राम, २७ जून :** जयपूरमधील पुरेसा प्रकाश असलेल्या क्लासरूम्सपासून नागपूरमधील गजबजलेल्या व्याख्यानगृहांपर्यंत कॅम्पसेसमध्ये प्रश्न विचारण्यात आला: 'तुम्ही भारतासाठी कोणत्या समस्येचे निराकरण कराल?'.

हा प्रश्न राष्ट्रीय इनोव्हेशन चॅलेंज 'सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो'चा मुख्य पैलू आहे. हे चॅलेंज उज्ज्वल भविष्यासाठी विद्यार्थ्यांना चेंजमकर्समध्ये आणि कॅम्पसेसना लाँचपॅड्समध्ये बदलत आहे.

२९ एप्रिल रोजी लाँचनंतर डिझाइन थिंकिंग वर्कशॉप्स आणि कॉलेज ओपन हाऊसेस संपूर्ण भारतात पसरले प्रमुख महानगरांसह ईशान्येकडील प्रमुख स्थळांपर्यंत देखील पोहोचले.

सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो २०२५ अव्वल चार विजेत्या टीम्सना त्यांच्या प्रकल्पांच्या इन्क्यूबेशनला पाठिंबा देण्यासाठी १ कोटी रुपये देईल, तसेच प्रत्यक्ष प्रोटोटाइपिंग, गुंतवणूकदारांशी संपर्क आणि सॅमसंग प्रमुख व आयआयटी दिल्ली प्राध्यापकांकडून तज्ञ मार्गदर्शन प्रदान करेल.

जयपूरमधील नीरजा मोदी स्कूलमध्ये १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी सभागृहात त्यांच्या संकल्पना, महत्त्वाकांक्षा आणि स्वप्नांना सादर केले. त्यांच्यापैकी नमन लखानीने पाठ्यपुस्तकांपलीकडील त्याच्या विचारसरणीला व्यक्त केले.

''माझी नेहमी असे काहीतरी घडवण्याची इच्छा होती, ज्यामुळे वास्तविक विश्वातील समस्यांचे निराकरण करता येईल. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोने मला दाखवून दिले की, कोणीतरी खरेच आमचे ऐकत आहे आणि संकल्पनांना वास्तविकतेत आणण्यास मदत करत आहे.''




आणखी एक विद्यार्थीनी अंशिका गुप्ता म्हणाली, ''मला उत्साहपूर्ण वाटले. हा उपक्रम इनोव्हेशनसह सर्वसमावेशकतेबाबत आहे. यामुळे मला शाळेमध्ये असताना देखील भारताचे उज्ज्वल भविष्य घडवण्याचा भाग असल्यासारखे वाटले.''

हा प्रवास जयपूरमधील महाराजा सवाई भवानी सिंग स्कूलमध्ये देखील सुरू राहिला, जेथे उपस्थित ८५० विद्यार्थ्यांपैकी एक ईशान शर्माचा दृष्टिकोन बदलला.

''मला समस्यांचे निराकरण करण्यासाठी पदवीधर किंवा प्रौढ व्यक्ती बनण्याची वाट पाहण्याची गरज नाही हे जाणवले. आपल्याकडे उत्तम संकल्पना असतील तर सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो त्या संकल्पना जाणून घेते. हे अत्यंत सक्षम करणारे आहे.''

नागपूरमध्ये रामदेवबाबा युनिव्हर्सिटीमधील उत्साहपूर्ण समुदायाने खुल्या मनाने व स्वत:चे मत व्यक्त करत या मोहिमेचे स्वागत केले. ६४० सहभागींपैकी मान्याने सार्वजनिक आरोग्यासाठी एआय-संचालित सोल्यूशन्स निर्माण करण्याचे तिचे स्वप्न व्यक्त केले.

''असे पहिल्यांदा घडले आहे की, प्लॅटफॉर्म आमच्या शहरातील आमच्या कॅम्पसमध्ये आमच्याकडे आला आहे आणि म्हणाला, 'चला काहीतरी महत्त्वपूर्ण असे घडवूया'. ही फक्त स्पर्धा नाही, हे एक लाँचपॅड आहे.''

''क्रिएटर्सचा राष्ट्रीय स्तरावरील वर्ग असल्यासारखे वाटले,'' असे चॅटिंगमध्ये एका विद्यार्थ्यानी शेअर केले. ''आम्ही एकमेकांपासून अनेक मैल अंतर दूर होतो, पण आमच्या संकल्पना एकमेकांशी जुडल्या.''

भोपाळमध्ये ओरिएण्टल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (ओआयएसटी)ने स्थानिक समस्या सोडवण्यासाठी विद्यार्थी तंत्रज्ञानाचा वापर कसा करू शकतात या विषयावर चर्चा सुरू केली. २९० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसह या इव्हेण्टमध्ये शांतमय, निश्चयी ऊर्जा दिसण्यात आली.

सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारो भारतभरात विस्तारित होण्यासह एक पैलू स्पष्ट करत आहे: इनोव्हेशन फक्त प्रयोगशाळा किंवा मोठ्या शहरांपर्यंत मर्यादित नाही, तर प्रश्न विचारण्याचे आणि त्याचे निराकरण करण्याचे साहस असलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याचे आहे.

तुम्ही विद्यार्थी असण्यासोबत तुमच्याकडे वास्तविक समस्येचे निराकरण करू शकणारी संकल्पना असेल तर हा उपक्रम तुमच्यासाठी आहे. सॅमसंग सॉल्व्ह फॉर टूमारोसाठी आत्ताच अर्ज करा. तुमचा क्लासरूम या प्रवासामधील पुढील थांबा असेल. आणि तुमची संकल्पना? हे सर्वकाही बदलू शकते.

# नागपूरमध्ये जेएसडब्ल्यू स्टीलने यशस्वीपणे बनावटी विरोधी छापा

**नागपूर, २७ जून :** ब्रँड ओळख आणि ग्राहकांच्या सुरक्षिततेचे रक्षण करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, जेएसडब्ल्यू स्टीलने २५ जून २०२५ रोजी यशस्वीरित्या छापा टाकला. रुद्र एंटरप्रायझेस नागपूर येथे स्थानिक कायदा अंमलबजावणीच्या सहकार्याने टाकलेल्या छाप्यात बनावट जेएसडब्ल्यू कलर कोटेड शीट्स जप्त करण्यात आल्या

छापानंतर, कायदेशीर कारवाई जलदगतीने सुरू करण्यात आली. कॉपीराइट कायद्याच्या कलम ५१ आणि ६३ अंतर्गत उल्लंघनांसह आरोपांसह एफआयआर दाखल करण्यात आला. हे कायदेशीर पाऊल गुन्ह्यांची गांभीर्य आणि बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जेएसडब्ल्यू स्टीलची वचनबद्धता अधोरेखित करते.

या कारवाईचे यश मुख्यत्वे जेएसडब्ल्यू स्टील आणि स्थानिक कायदा अंमलबजावणी मधील निर्बाध सहकार्यामुळे झाले. ही भागीदारी बनावटी उत्पादनांचा सामना करण्यासाठी कॉर्पोरेट संस्था आणि कायदा अंमलबजावणीमधील प्रभावी समन्वय दर्शवते.

सुरुवातीच्या तपासात असे आढळून आले की काही व्यक्ती जेएसडब्ल्यू स्टीलच्या खऱ्या उत्पादनांसारखेच बनावट ब्रँडिंग असलेल्या बनावट कोटेड शीट्सचे बेकायदेशीर उत्पादन, विक्री आणि प्रोफाइलिंगमध्ये सहभागी होत्या. या बनावट वस्तू मूळ जेएसडब्ल्यू स्टील उत्पादनांसारखे विकल्या जात होत्या.

**५९,१२७ रुपये किमतीची बनावटी उत्पादने जप्त केली**




जेएसडब्ल्यू स्टील त्यांच्या ट्रेडमार्क, लोगो आणि इतर बौद्धिक मालमत्तेच्या अनधिकृत वापराचा तीव्र निषेध करते. त्यांच्या ब्रँड प्रतिष्ठेचे आणि सद्भावनाचे रक्षण करण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये, जेएसडब्ल्यू स्टील बनावटी आणि कंपनीच्या बौद्धिक संपदा हक्कांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही घटकांवर कठोरपणे लक्ष ठेवते आणि कारवाई करते.

जेएसडब्ल्यू स्टीलची उत्पादने आणि उपायांनी गेल्या काही वर्षांत एक मजबूत प्रतिष्ठा निर्माण केली आहे, त्यांच्या उत्कृष्ट गुणवत्तेसाठी आणि नाविन्यपूर्ण दृष्टिकोनासाठी विश्वास ठेवला आहे. कंपनी सर्वोच्च मानके राखण्यासाठी वचनबद्ध आहे आणि तिच्या ब्रँड आणि मालमत्तेला धोका निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर क्रियाकलापांवर लक्ष ठेवण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी तिचे प्रयत्न सुरू ठेवेल. पुढे जाऊन, जेएसडब्ल्यू स्टील बनावट उत्पादनांविरुद्ध तिची सतर्क भूमिका कायम ठेवण्याची योजना आखत आहे. कंपनी तिच्या बौद्धिक संपदा हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि ग्राहकांना तिच्या उत्पादनांच्या प्रामाणिकपणा आणि गुणवत्तेवर विश्वास ठेवता येईल याची खात्री करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांसोबत जवळून काम करत राहील.

# कलाकारांनी सांगितले त्यांच्या वैश्विक श्रद्धेबाबत!

**मुंबई, २७ जून :** सकाळी चहाचा आस्वाद घेत राशीभविष्य वाचण्यापासून ते अंकांमधून मार्गदर्शन मिळवण्यापर्यंत ज्योतिष आणि अंकशास्त्र उत्सुकता आणि आनंद निर्माण करतात. काहींसाठी या जुन्या पद्धती आध्यात्मिक संकेत आहेत, तर काहींसाठी त्या दैनंदिन जीवनात उत्तम अनुभव देणाऱ्या आहेत. या वैश्विक संकेतांच्या माध्यमातून खास काहीतरी शोधणाऱ्यांमध्ये एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय कलाकार देखील आहेत, जसे हिमानी शिवपुरी (कटोरी अम्मा, 'हप्पू की उलटन पलटन') आणि रोहिताश्व गौड (मनमोहन तिवारी, 'भाबीजी घर पर है'). त्यांनी ज्योतिष आणि अंकशास्त्र त्यांची विचारसरणी, दिनचर्या व दृष्टिकोनाला कसे आकार देतात, याबद्दल सांगितले. मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये कटोरी अम्माची भूमिका साकारणाऱ्या हिमानी शिवपुरी आनंद व्यक्त करत म्हणाल्या, ''माझा ज्योतिषशास्त्रावर फारसा विश्वास नाही, पण ते वर्षानुवर्षे माझ्या आयुष्याचा एक भाग आहे. दररोज सकाळी बाहेर पडण्यापूर्वी मी वर्तमानपत्रातील दिवसाचे राशीभविष्य पाहते. भविष्य जाणून घेण्यासाठी नाही तर दिवसाची सुरुवात सकारात्मकतेने करण्यासाठी करते. काही चांगल्या ओळी तुमचा मूड चांगला करू शकतात. मजेदार गोष्ट म्हणजे, दिवसाच्या शेवटी मी अनेकदा त्यात काय म्हटले आहे ते विसरून जाते, पण आशावाद कायम राहतो.'' त्या पुढे म्हणाल्या, ''मंदिरांना भेट देताना किंवा मित्रांसोबत प्रवास करताना बहुतेकदा असाच किंवा एखाद्याच्या आग्रहास्तव मी काही वेळा माझा तळहात वाचायला दिला आहे आणि प्रत्येक ज्योतिषाने काहीतरी वेगळे म्हटले, पण ते सर्व सकारात्मक होते. त्यावेळी मला जाणवले की ज्योतिषशास्त्र मनोरंजक आहे, पण जीवनासाठी मार्गदर्शक नाही. मी कर्मावर आणि माझ्या मानसिकतेवर अधिक अवलंबून आहे. तुम्ही तुमचे काम प्रामाणिकपणे केले आणि दयाळू व सकारात्मक राहिले तर मार्ग नक्की सापडतो असा माझा विश्वास आहे. कदाचित राशीभविष्य नेहमीच अचूक नसते, पण तोच तुमचा दृष्टिकोन आहे का? हे जाणून घेणे महत्वाचे आहे.''

रोहिताश्व गौड ऊर्फ मनमोहन तिवारी म्हणाले, ''माझ्यासाठी अंकशास्त्र नेहमी लक्षवेधक राहिले आहे. फक्त भाग्यवान अंक शोधणे नाही तर निर्णय व घटनांमागील ऊर्जा समजून घेणे महत्त्वाचे आहे. जीवनात कोणतेही मोठे पाऊल उचलण्यापूर्वी मी अंकशास्त्राचा सल्ला घेतो. यामुळे मला आधार मिळाल्यासारखे वाटते आणि स्पष्टता मिळते. लोक अनेकदा ते अंधश्रद्धा समजून त्याकडे दुर्लक्ष करतात, पण माझ्यासाठी ते उपयुक्त आहे. या अंकांमध्ये लय असते आणि त्यांचे वाचन करायला शिकल्यानंतर मार्गदर्शकासारखे वाटते. गोंधळलेल्या किंवा आव्हानात्मक काळामध्ये मला समजले आहे की, अंकशास्त्रामधून कम्फर्ट व मार्गदर्शन मिळते. हे आधारस्तंभ नाही तर साधन आहे. आणि तुम्हाला संतुलित व आत्मविश्वासू राहण्यास मदत करणाऱ्या गोष्टीचा अवलंब का करू नये? जीवन अनपेक्षित आहे आणि कधी-कधी, थोडेसे मार्गदर्शन देखील खूप उपयुक्त ठरते.''

## आज का अंदाज

शनिवार २८ जून २०२५

**पत्थर फोड एकच**

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | १ | ५ | ७ | ८ |
| ३४५ | १२० | १७८ | १३५ | १३७ | २३० | १६० | २२४ |
| ४८० | ३०० | ३५८ | ३६० | ४७० | ३५७ | २२३ | ४६८ |
| ५७० | २२९ | २२७ | ५६८ | ३४४ | ७८० | ७०० | ३५० |
| २१ | ३१ | ६४ | ९४ | १० | ५२ | ७३ | ८५ |
| २० | ३० | ६८ | ९८ | १३ | ५४ | ७८ | ८७ |
| २७ | ३७ | ६५ | ९५ | १६ | ५६ | ७९ | ८९ |

**२८ जून : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | ४२ | ७० | ८० |
| १२ | ४३ | ७५ | ८५ |
| १६ | ४६ | ७९ | ८९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

# सॅमसंग न्यूयॉर्कमध्ये ९ जुलै रोजी नवीन फोल्डेबल्स लाँच करणार

**गुरूग्राम, २७ जून :** वर्षानुवर्षे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने लोकांना गरजेची वैशिष्ट्ये जसे सर्वोत्तम कार्यक्षमता, आकर्षक कॅमेरे आणि कनेक्टेड राहण्याच्या स्मार्टर पद्धती यांना अनुसरून डिवाईसेस डिझाइन केले आहेत. आणि गॅलेक्सी एआयसह डिवाईसेसच्या क्षमतांमध्ये अधिक वाढ केली आहे. तसेच व्यक्तींच्या संवाद साधण्याच्या पद्धतीमध्ये देखील बदल केला आहे.

एआय नवीन युजर इंटरफेस बनत असताना तंत्रज्ञानासोबत आपल्या संबंधाला नव्या उंचीवर घेऊन जात आहे. ॲप्स व टूल्सचे कलेक्शन असलेला स्मार्टफोन आता स्मार्ट सोबती बनत आहे, जो वापरकर्त्यांच्या उद्देशाला समजून घेतो आणि रिअल टाइममध्ये प्रतिसाद देतो. हे परिवर्तन प्रतिक्रियेवरून अपेक्षेपर्यंत झाले आहे, जेथे एआय यूआय बनले आहे आणि टास्क्स त्वरित पूर्ण होतात.

नेक्स्ट-जनरेशन गॅलॅक्सी डिवाईसेस नवीन एआय-पॉवर्ड इंटरफेससह बदलण्यात आले आहेत, ज्यांना त्यांच्या संपूर्ण क्षमता अनलॉक करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या सर्वोत्तम हार्डवेअरचे पाठबळ आहे. हे भविष्य आधीच घडण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि सर्वोत्तम गॅलॅक्सी एआय व सॅमसंग कारागिरीचा उलगडा होणार आहे.

९ जुलै रोजी सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स त्यांचे आगामी फोल्डेबल्स लाँच करण्यासाठी ब्रूकलिन, न्यूयॉर्क येथे गॅलॅक्सी अनपॅकचे आयोजन करणार आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज आनंद आणि सौहार्द वाढेल. व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील. तुम्हाला नवीन कपडे मिळतील. नोकरीत पदोन्नतीसोबतच बदलही होतील. काही महत्त्वाच्या कामात यश मिळण्याची चिन्हे आहेत.

**वृषभ :** तुमचा गोड आवाज आणि साधे वर्तन लोकांना तुमच्याकडे आकर्षित करेल. राजकारणात तुमच्या उत्कट आणि प्रभावी भाषणाबद्दल उच्चपदस्थ लोकांकडून तुमचे कौतुक होईल.

**मिथुन :** आज तुम्हाला परीक्षेत किंवा स्पर्धेत चांगलं यश मिळेल. पत्रकारिता क्षेत्राशी संबंधित लोकांचं त्यांच्या लेखन किंवा कामाबद्दल बॉसकडून कौतुक होईल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल.

**कर्क :** अत्यंत महत्त्वाच्या कामात उशीर झाल्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. राजकारणात तुम्हाला जनतेचा पाठिंबा मिळेल. तुम्ही राजकीय क्षेत्रात वर्चस्व प्रस्थापित कराल. अपेक्षित सहकार्य न मिळाल्याने काम थांबेल.

**सिंह :** व्यवसाय योजना यशस्वी होण्याची शक्यता आहे. नोकरीतील तुमच्या कामामुळे बॉसचे लक्ष तुमच्याकडे आकर्षित होईल. एखाद्या प्रिय व्यक्तीमुळे समाजात तुमचा आदर आणि प्रतिष्ठा वाढेल.

**कन्या :** आज दिवसाची सुरुवात तणावाने होईल. कामाच्या ठिकाणी तुम्ही करत असलेल्या चांगल्या कामाचे श्रेय दुसरे कोणीतरी घेईल. कामासाठी घरच्या व्यक्तींपासून दूर जावे लागू शकते.

**तुळ :** आज दिवसाची सुरुवात निरुपयोगी धावपळीने होईल. काहीतरी अनुचित घडण्याची भीती असेल. अभ्यासात अडथळे आल्याने मन अस्वस्थ असेल. नोकरीसाठी खूप भटकंती करूनही निराश व्हाल.

**वृश्चिक :** आज तुम्ही तुमच्या कामाच्या क्षेत्रात अत्यंत व्यस्त राहाल. राजकारणात पक्ष बदलण्यापूर्वी, विचार आणि परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करा. त्यानंतरच निर्णय घ्या. वाहन खरेदी करण्याची इच्छा पूर्ण होईल.


**धनु :** आज तुम्हाला नोकरीच्या मुलाखतीत किंवा स्पर्धा परीक्षेत यश मिळेल. नोकरी मिळवण्याची तुमची जुनी इच्छा पूर्ण होईल. मनासारखं यश मिळेल. कामाच्या ठिकाणी अनावश्यक संघर्ष होऊ शकतो.

**मकर :** आज व्यवसायातील अडथळे सरकारी मदतीमुळे दूर होतील. तुम्हाला सरकारी सत्तेचा लाभ मिळेल. नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. कुटुंबात नवीन पाहुणा येऊ शकतो.

**कुंभ :** आज नोकरदार वर्गाला काम मिळेल. विद्यार्थ्यांना अभ्यासात रस वाटेल. सरकारी मदतीने व्यावसायिक कामातील अडथळे दूर होतील. आज तुम्ही नवीन काम किंवा व्यवसाय सुरू करू शकता.

**मीन :** तुमचा दिवस उत्तम राहील. तुम्हाला प्रत्येक कामात यश मिळेल. तुमचे आरोग्य ठीक असेल. व्यवसायात तुम्ही एखादे मोठे काम भागीदारीत सुरु करू शकता. उत्पन्नाचे नवे स्रोत निर्माण होतील.

## शब्दकोडे क्रमांक २१४८



**आडवे शब्द :-**

१) सतत, खंड न पडता
४) चाकर
६) बाण
८) सावकार
१०) त्वरित, लवकर
११) घागरा
१४) तरुण(हिं.)
१६) न स्वीकारणे
१७) मदत करणारा
१९) बंधन
२०) वेगळा
२१) अनेक प्रकार
२३) होडी चालविणारा
२६) सेवक
२७) गळ्याच्या मागचा अवयव, प्रतिष्ठा
२८) नूतन
२९) राजबिंडा, सुकुमार
३१) माया, ममत्व
३४) सिंह
३५) लोखंडाला चढलेला गंज
३६) अंधारात शोधणे,
३८) ** सदाशिव, भोळा
३९) हिंदीत सर्व
४०) मिठाई तयार करणारा
४२) रक्तवाहिनी
४४) डावरा
४६) स्वर्गंगा एका हिंदी नटीचे नाव
४८) शेकडा प्रमाण
४९) साय
५०) चंद्र
५२) नवेच्या विरुद्ध
५३) वर्ष, साल
५४) घोडा
५५) श्रेष्ठ पुरुष
५७) कडक
५९) अजगर, एक इंग्रजी आद्याक्षर
६१) मातीचा कण
६२) धनुष्याच्या ताणलेल्या दोरीचा आवाज
६३) दुर्दशा
६५) पाणी
६६) साडेसातीचा ग्रह
६७) जाणकार
६९) केस
७०) छोटा
७१) मयूर
७२) निमग्न
७३) फणीने केस मोकळे करण्याची क्रिया
७४) पाणी उकळताना होणारा आवाज

**उभे शब्द :-**

१) वकिलाचे कूळ
२) वाघोबा
३) तप करणारा
४) नोकराशी केलेला करार
५) हात
७) रात्र
८) द्रव्य, पैसा
९) आवळा देऊन घेण्याचे फळ
१२) कप्पा, खण
१३) मोठी नदी
१५) वाईट इच्छा
१६) जेऊ घालणारा
१७) पुष्परस
१८) तरतूद
१९) ध्वनी
२२) विनंती करणे
२४) वाईट, नासलेले
२५) यज्ञ
२७) अत्यंत नीच
३०) पाहुणचार
३२) मोठे घर, राजवाडा
३३) नृत्य
३५) लाल
३६) डोक्यावरचे केस ज्याने झडतात तो रोग
३७) पटल
३९) खोलवर, खोल
४०) उपस्थित
४१) वाचण्यास योग्य असे साहित्य
४२) मालक
४३) व्यवस्थित, यथायोग्य
४५) उलटी, वांती
४६) घुसळणे, चर्चा
४७) खेळण्याच्या पत्त्यातील एक काळे पान
५१ विष
५३) स्सरसकट
५६) रात्री फिरणारा, (चोर, घुबड इ.)
५८) टोळीचा प्रमुख
५९) नाविक दल
६०) गाईची एक जंगली जात
६३) प्रतिष्ठा अब्रू
६४) नवरदेव
६६) काया, देह
६८) कल्याण
६९) ** देवयानी
७१) बैलाच्या सहाय्याने विहिरीतून पाणी काढण्याचे साधन

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# पातूर, मूर्तिजापूर तालुक्यात अतिवृष्टी, नदीनाले तुडुंब

■ महासागर प्रतिनिधी,
अकोला , दि. २७ :

जिल्ह्यात सर्वत्र संततधार पावसाने हजेरी लावली. दुपारी दोननंतर जोरदार पावसाने जोर धरला. पातूर तसेच बार्शीटाकळी तालुक्यात दुपारी १ ते ३ च्या सुमारास झालेल्या मुसळधार पावसाने शेतशिवारात पाणी साचले. नुकतेच अंकुरलेले पिके पाण्याखाली गेली. नदी नाले दुथडी भरून वाहिले. नदी-नाल्यांनापूर आल्याने काही गावांना पुराच्या पाण्याचा वेढा बसल्याने काही गावांचा संपर्क तुटला होता. पुलावरून पाणी वाहत असल्याने पिंजर-अकोला, पिंजर-महान मार्ग बऱ्याच वेळ बंद होता. जिल्ह्यात गुरुवारी एकाच दिवशी सर्वात जास्त ६८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. त्या खालोखाल बार्शीटाकळी आणि मूर्तिजापूर तालुक्यात अनुक्रमे २६.४ आणि २५.४ मिलीमीटर पाऊस झाला. अकोला शहरासह तालुक्यातही सकाळपासून सायंकाळपर्यंत संततधार जोरदार पाऊस झाला. अकोट, तेल्हारा, बाळापूर तालुक्यातही सर्वत्र संततधार पाऊस बरसला. जिल्ह्यात चार मंडळात अतिवृष्टीची नोंद आलेगाव (ता. पातूर) १४५.३० चित्री(ता. पातूर)- ६६.५०मिमी सिरसी(ता. पातूर)- ६६.५० मिमी निंबा(ता. मूर्तिजापूर)- ६६.३० तालुका आज आजपर्यंत अकोट ४.० १३६.८ तेल्हारा ६.२ १३६.८ बाळापूर ९.१ ९४.४ पातूर ६८.० १३२.९ अकोला १४.५ ८८.१ बार्शीटाकळी २६.४ ९६.७ मूर्तिजापूर २५.४ ८८.३ बार्शीटाकळी : बुधवारपासून पाऊस सुरू आहे.





गुरुवारी जोर आणखी वाढला. त्यामुळे दुपारी दीड वाजता पुलावरून पाणी जात असल्याने पिंजर- महान व पिंजर-अकोला या दोन्ही मार्गावरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. तालुक्यातील पिंजर गावाजवळील आणि खेर्डा-भागाई मंडळातील भेंडी महाल येथील मालाबाई देशमुख यांच्या भेंडी महाल ते भेंडी सुत्रक मार्गावरील नाला जोरदार पावसामुळे फुटल्याने त्यांच्या शेतात पाणी घुसले शेताला तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. पावसाने हळद, मिरची, संत्रा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे. पिंजर : पिंजर येथे गुरुवारी आठवडी बाजार भरत असतो. गुरुवारी पावसाने जबरदस्त हजेरी लावली. त्यामुळे पिंजर येथील आठवडी बाजाराच्या पुलावरून पाणी वाहू लागल्याने लोकांची फार मोठी पंचायत झाली होती. बाजार करू आणि व्यापाऱ्यांना जाण्यासाठी दुसरा मार्ग आहे परंतु त्याही रस्त्याने पाणी वाहत असल्यामुळे दोन्ही मार्ग बंद झाले होते. त्यामुळे लोकांनी पाऊस कमी झाल्यानंतर सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला आणि आपल्या घरचा रस्ता धरला. गुरुवारी पावसाने सर्वदूर हजेरी लावली. यामुळे नदी, नाले दुथडी भरून वाहत होते.

पिंपरडोळी येथील नाल्याला पूर आल्याने पुलावरून पाणी वाहत होते. चोंढी (ता.पातूर) येथील रुग्णाला आलेगाव येथील रुग्णालयात उपचारासाठी जीव धोक्यात घालून दुचाकीवरून न्यावे लागले.

अंधारसावंगी, आलेगाव, झरंडीला पाण्याचा वेढा

पातूर : तालुक्यात गुरुवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे झरंडी, आलेगाव, अंधारसावंगी परिसरात जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. तहसीलदार डॉ. राहुल वानखेडे यांनाही झरंडी गावात पोहोचता आले नाही, इतकी गंभीर परिस्थिती आहे. जनावरांचे गोठे वाहून गेले, घरात पाणी घुसले, शेती पाण्याखाली गेल्याने नुकतेच पेरणी केलेले बियाणे सडण्याच्या मार्गावर आहे. २५ जूनच्या रात्रीपासून पातूर तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने २६ जून रोजी सकाळपासून रौद्ररूप धारण केले होते.

**आठवडे बाजाराच्या पुलावरून वाहिले पाणी**

मूर्तिजापूर तालुक्यात २० दिवसानंतर हजेरी मूर्तिजापूर : पावसाळा सुरू होऊन तब्बल वीस दिवस उलटून गेल्यानंतर गुरुवारी मुसळधार पाऊस झाला. दिवसभरात २५.४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. पावसाचे आगमन लांबल्याने फक्त २८ टक्के पेरण्या झालेल्या आहेत. पाऊस नसल्याने दुबार पेरणीचे संकट ओढवणार काय या विवंचनेत शेतकरी असल्याचे दिसून येत होते.

परंतु २५ आणि २६ जून रोजी झालेल्या पावसामुळे हे संकट टाळले असून पाऊस झाल्याने शेतकरी सुखावला आहे. आजच्या पावसामुळे नदी नाल्यांची पाण्याच्या पातळीत वाढ होऊन अनेक नाले वाहू लागल्याचे दिसून येत होते.

तालुक्यात आतापर्यंत जून महिन्याच्या सरासरीच्या ५० टक्के पाऊस झाल्याचे कृषी विभागाकडून सांगण्यात आले. तालुक्यातील कुरूम ,जामठी, माना, हातगाव, लाखपुरी, मूर्तिजापूर, सेलू बाजार, निंबा सर्कल मिळून जून महिन्याचे सरासरीच्या ५० टक्के पाऊस झालेला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा चिखलीत उभारणार



**चिखली:** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराज यांचा भव्य अश्वारूढ पुतळा लवकरच चिखली शहराच्या मध्यवर्ती चौकात उभारण्यात येणार आहे. सध्या या जागेवर असलेला १९८५ साली स्थापन करण्यात आलेला पूर्णाकृती पुतळा हटवून त्याजागी नव्या पुतळ्याची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर बुधवार, २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता पुतळा हलवण्याच्या कार्यवाहीला विधिवत प्रारंभ होणार आहे. यावेळी तहसीलदार संतोष काकडे, नगरपालिका मुख्याधिकारी प्रशांत बिडगर, चिखली पोलिस स्टेशनचे ठाणेदार संग्राम पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता दीपक चिंचोले तसेच विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत. नवीन अश्वारूढ पुतळ्याची उंची १५ फूट असून वजन अंदाजे २२०० ते २३०० किलोग्रॅम इतके आहे. संपूर्ण पुतळा ब्राँझ धातूपासून बनवण्यात आला आहे. प्रसिद्ध शिल्पकार ललित धनवे यांच्या संकल्पनेतून व शिल्पकार प्रसाद मोडक यांच्या निर्मितीत हा पुतळा साकारण्यात आला आहे. पुतळ्यावरील चित्रकाम चित्रकार कविता देशमुख यांनी साकारले आहे. या प्रकल्पासाठी लागणाऱ्या सर्व प्रशासकीय परवानग्या चिखलीच्या आमदार श्वेता महाले यांनी राज्य शासनाकडून मिळवून दिल्या असून, त्यांनी या पुतळ्यासाठी तब्बल ५० लाख रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हास्तरीय पुतळा समितीचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यवाही झाली.

# पं.स.च्या आवारात कर्चऱ्याच्या ढिगाऱ्यात विदेशी दारूच्या खाली शिश्या

■ महासागर प्रतिनिधी,
कारंजा ( घा ) , दि. २७ :

तहसीलस्थळी असलेलं मिनी मंत्रालय पंचायत समितीच्या आवारात विदेशी दारूच्या शिश्या चक्क कर्चऱ्याच्या ढिगाऱ्यत दिसून आल्याने शासकीय कार्यालयात दारू ढोकतोय कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. वर्धा जिल्हा तसा दारूबंदी जिल्हा आहे.मात्र जिल्ह्यात दारूबंदी ही नावालाच असली तरी शासकीय कार्यलयात दारूचा महापूर वाहत असल्याचे दिसत आहे.कारंजा पंचायत समिती इमारत टुमदार दिसून येत असली तरी त्याच्या सभोवताल घाणीचे साम्राज्य पसरले आहे.गवत वाढले असून त्याची कटाई केली जात नाही आहे.सोबतच गट विकास अधिकारी यांच्या कार्यालयाच्या पाठीमागे बाजूला असलेल्या कर्चऱ्याच्या ढिगाऱ्यात विदेशी दारूच्या खाली शिश्या आढळून आल्याने ही दारू नेमकी कोण ढोसतोय असा प्रश्न उपस्थित होत आहे. ग्राम अधिकाऱ्यांना नियम बाह्य साज्या गटविकास अधिकारी ग्राम अधिकाऱ्यांवर मेहरबान असल्याचे दिसून येत आहे. पंचायत समिती अंतर्गत ५९ ग्राम पंचायत आहे.यातून काही ग्राम अधिकाऱ्यांना नियमबाह्य गाव जोडले आहे.यातून काही आर्थिक देवाणघेवाण असल्याची चर्चा आहे.





७ किलोमीटर अंतराच्या आत गाव देण्यात यायला पाहिजे मात्र नियमाला बगल देत .७ किलोमीटर अंतरा पेक्षा दूर चे गाव ग्राम अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यातून कुठंतरी पाणी मुरत असल्याची चर्चा आहे. गट विकास अधिकाऱ्यांनी एक वर्षाचा कालावधी घेतला वाढून कारंजा पंचायत समिती अंतर्गत गावातील नागरिक हे अत्यन्त जिवलग मनमिळाऊ असल्याने या परिसरात कोणताही नागरिक तक्रारीला पुढे धास्तावात नाही. त्यामुळे आपली कारकीर्द आणि आर्थिक फायदा करण्यासाठी एक वर्ष कार्यकाळ वाढून घेतल्याची जोरदार चर्च आहे. लक्ष्मी दर्शनासाठी जाहिरातीवर डल्ला पंचायत समिती अंतर्गत अनेक विकास कामे मंजूर होतात.त्यासाठी निविदा काढली जाते.

मात्र या निवेदेची रक्कम ग्राम पंचायत स्तरावरून देण्याचे नियम असताना सुद्धा त्यावर डल्ला मारण्यासाठी 'लक्ष्मी ची कात टाकली जात आहे.यातून मोठ्या प्रमाणात भोंगळ कारभार झालेला आहे.काही बोटावर मोजणारे कंत्राटदार हाताशी घेऊन बिडीओ आणि ग्राम अधिकारी मलिदा खाण्याचे प्रकार केले जात आहे.

अनेक ग्रामपंचायत चौकशी केल्यानंतर हा सर्व भोंगळ कारभार समोर येणार आहे.ज्या ज्या गावात विकास कामे मंजूर झाले त्या गावातील निविदा जर बघितले तर सामान्य फंडातून मोठ्या प्रमाणात पैश्याची उधळण केली असल्याची तालुक्यात चर्चा आहे.

# सहा महिन्यापूर्वी अल्पवयीन मुलीस पळून नेलेल्या आरोपीस अटक

## अल्पवयीन मुलीस घेतले ताब्यात

■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा, दि. २७ :

सहा महिन्यांपूर्वी अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेलेल्या आरोपीस अटक करण्यात आली आहे. यातील अल्पवयीन मुलीस पो.स्टे.खरांगणा यांच्याकडे देण्यात आले आहे. सविस्तर असे की, फिर्यादीने दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी पोलीस स्टेशन खरांगना त्यांची अल्पवयीन मुलगी वय अंदाजे १६ वर्षे हिला अज्ञात आरोपीने फूस लावुन पळवून नेल्याची तक्रार खरांगणा पो.स्टेला दिली होती. फिर्यादीच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन खरांगणा येथे अप क्र. ९९२/२०२४ कलम १३७(२) बीएनएस प्रमाणे गुन्हा



नोंद करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, वर्धा तथा स्थानिक गुन्हे शाखा वर्धा यांचे मार्फतीने करीत असताना पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांनी दिलेल्या विशेष सूचना व निर्देशाप्रमाणे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा तथा अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षयांचे मार्गदर्शक पथक तयार करण्यात आले. गुन्ह्यात मुखबिर लावून व तांत्रिक तपास करून यातील आरोपी आकाश अनिल येडमे, वय (२४) रा. कामठी, ता. वर्धा हा येथे असल्याची खात्री झाल्याने पथक रवाना करून आरोपी आकाश व पीडित अल्पवयीन मुलीस ताब्यात घेण्यात आले. आरोपीस कायद्याप्रमाणे अटक करण्यात आली असून पुढील तपास पो स्टे खरांगणा करीत आहे यातील अल्पवयीन मुलीस पो. स्टे. खरांगणा यांच्याकडे देण्यात आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अपर पोलीस अधीक्षक डॉ.सागर कवडे यांचे निर्देशाप्रमाणे स्था. गु. शा. पोलीस निरीक्षक विनोद चौधरी यांचे मार्गदर्शनात पोलिस उपनिरीक्षक बालाजी लालपालवाले यांचेसह सुभाष राऊत, खुशाल राठोड, संजय राठोड, नितेश मेश्राम, अर्चना जाधव, नवनाथ मुंडे ,सायबर सेल वर्धा येथील दिनेश बोथकर, अक्षय राऊत, गोविंद मुंडे, स्मिता महाजन यांनी केली.

# जिल्हा व सत्र न्यायालय हिंगणघाट येथे योग शिबिर

**वर्धा:** तालुका विधी सेवा समिती हिंगणघाटच्या वतीने जिल्हा व सत्र न्यायालय येथे तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश -१ अतिरिक्त सत्र न्यायाधीश वर्षा बा. पारगावकर यांच्या मार्गदर्शनात योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा न्यायाधीश -२ डी. वाय.काळे, दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर डी.एम.जज, योग प्रशिक्षक व्ही.यु.धात्रक, पोर्णिमा धात्रक, राहुल वंजारी, यांची उपस्थिती होती. आरोग्य हा मानवी जीवनातील महत्वाचा घटक असुन उत्तम आरोग्य हे प्रत्येकाचे लक्ष बनले आहे. हे उत्तम आरोग्य मानवाला योग साधनेमुळे प्राप्त होते.

# रक्तदात्यांना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप



**खामगाव :** खामगाव येथील तहसील कार्यालय व महाराष्ट्र राज्य रक्त संकलन परिषद, सामान्य रुग्णालय खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे औचित्य साधून २३ जून रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन तहसील कार्यालयात करण्यात आले. या शिबिरात २७रक्तदात्यांनी रक्तदान केले. या शिबिराचे उद्घाटन कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ.रामेश्वर पुरी,तहसीलदार सुनील पाटील, निवासी नायब तहसीलदार सोनाली भाजीभाकरे, नायब तहसीलदार निखिल पाटील, नायब तहसीलदार अभिजीत जोशी, नायब तहसीलदार विजय पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबिरात २७ रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सर्व रक्तदात्यांना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते रक्त दाता प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. रक्तदान शिबिरात उपस्थित कामगार मंत्री आकाश फुंडकर, एसडीओ रामेश्वर पुरी,तहसीलदार सुनील पाटील व इतर मान्यवर. तहसील कार्यालयात आयोजित रक्तदान शिबिरात तहसीलदार सुनील पाटील यांच्यासह बलदेव मोरे, कार्तिक जाधव,गौरव इंगळे, नागेश बोराडे, सुधीर राजपूत, शुभम राजपूत ,महेश मुंडे, मनीष इंगळे, महेंद्र परिहार, पवन भागवत, शानदास ठोंबरे, विठ्ठलसिंग तोमर, महादेव हटकर, गणेश ठोसरे ,अमित अमृतकर, बळीराम शेळके, प्रतीक साटोटे,सतीश मेसरे,आनंद वानखेडे, ज्योती वनारे,गोपाल घाटे ,शिवाजी नेमाडे ,राहुल दांडगे, प्रसाद ठाकरे, प्रीती पाटील, संतोष काळबागे या रक्तदात्यांनी रक्तदान केले.

# सामाजिक न्यायभवन येथे सामाजिक न्याय दिन साजरा

## समता दिंडीचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा, दि. २७ :

राजर्षी शाहू महाराज यांचा २६ जुन हा दिवस सामाजिक न्याय दिन म्हणुन दरवर्षी साजरा करण्यात येतो या दिनाचे औचित्य अध्यक्षस्थानी



अतिरिक्त जिल्हाधिकारी निवडश्रेणी तथा जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे दत्तप्रसाद नडे होते तर अनिकेत समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद पाटील, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त अंकेश केदार, जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कर्मविर संस्थांमध्ये वंचित घटकांकरीता लोककल्याणांच्या विविध योजना राबविल्या. त्यांनी त्यांच्या समतेच्या विचारांची पेरणी संस्थांमध्ये केली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी भारताच्या संविधानामध्ये सर्व घटकांना समानतेचा अधिकार प्राप्त करुन दिला. या अधिकाराचे रक्षण करणे तसेच लोककल्याण व लोकहिताचे महाराजांचे विचार पुढे नेण्याची महत्वपुर्ण जबाबदारी समाजातील व्यक्तींची आहे. असे विचार जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष दत्तप्रसाद नडे यांनी व्यक्त केले. यावेळी अरविंद पाटील यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाप्रसंगी वर्ग १० मध्ये वर्धा जिल्ह्यातून प्रथम आलेल्या त्रिशा वाकडे या विद्यार्थीनीला २५ हजार रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेमधून प्रथम आलेल्या रिया भगत, प्रशांत तामगाडगे यांचा सुध्दा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे लाभार्थी ऋषभ भोंगाडे यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तत्पुर्वी सकाळी सामाजिक न्याय दिनानिमित्त समता दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करुन समता दिंडीला सुरवात करण्यात आली. दिंडी शहरातील प्रमुख मार्गाने मार्गक्रमण करुन सामाजिक न्यायभवन येथे दिंडीचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकेश केदार यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शरद निबुदे यांनी तर आभार प्रतिभा भागवतकर यांनी मानले. कार्यक्रमाला शहरातील विविध नर्सींग कॉलेजचे विद्यार्थी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालय, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय, जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, दिव्यांग कल्याण विभाग, बहुजन कल्याण विभाग, विविध महामंडळे, शासकीय निवासी शाळा, शासकीय वसतीगृहे येथील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

**Change Of Name**

MY OLD NAME WAS **CHIRYU S/O RAJEEV JAISWAL.** NOW MY NEW NAME IS **CHIRAYU S/O RAJEEV JAISWAL.**
**ADD :** PLOT NO. 21, KESHAV, NAV-JEEVAN COLONY, WARDHA ROAD, NAGPUR-440015.

MY OLD NAME WAS **DAMYANTI BHAGWANDAS PATEL.** NOW MY NEW NAME IS **DEEPAL W/O JITENDRA PATEL.**
**ADD :** V V TRADERS, PLOT NO. 21, SARDAR PATEL TIMBER MARKET, GHAT ROAD, NAGPUR- 440003.

MY OLD NAME WAS **SHAIKH NAZEER.** NOW MY NEW NAME IS **SHAIKH NAJIR KURESHI DADU** AND SURNAME IS **KURESHI.**
**ADD :** NEW BUS STOP BHOI GALLI KALAMNURI HINGOLI -431702 AND MY OLD PASSPORT NO IS **H9407841.**

MYSELF **BATOOL TARANNUM ALI,** MY GIVEN NAME IS **BATOOL TARANNUM** AND MY SURNAME IS **ALI** .I AM RESIDING AT 23, QUTBI COLONY, SHANTI NAGAR, NAGPUR - 440002

MY OLD NAME WAS **RIJAWANA DUMBA.** NOW MY NEW NAME IS **RIZWANA MOHD SALIM DUMBA.**
**ADD :** T B DAWAKHANA JAWAL JAGNATH BUDHWARI NAGPUR 440002

MY OLD NAME WAS **GANESHKUMAR SHANKARRAO JIDDEWAR.** NOW MY NEW NAME IS **GANESH SHANKAR JIDDEWAR.**
**ADD :** 604 RACHANA NAKSHATRA ASHWINI APARTMENT JAGDISH NAGAR NAGPUR - 440013

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक मंडळाच्या अटी रद्द करा : ॲड. शेळके



■ महासागर प्रतिनिधी,
बुलडाणा , दि. २७ :

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांवरील जाचक अटी त्वरित रद्द कराव्यात, अशी मागणी उबाठा शिवसेना प्रवक्त्या ॲड.जयश्री शेळके यांनी समाजकल्याण विभागाकडे केली आहे. समाजाच्या वंचित घटकांसाठी सुरू करण्यात आलेल्या या योजनांचा उद्देशच शासनाच्या कठोर अटींमुळे अयशस्वी ठरत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या माध्यमातून मातंग समाजातील तरुण, बेरोजगार, महिला व उद्योजक यांना स्वावलंबनासाठी शासकीय कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र प्रत्यक्षात जामीनदारांची सक्ती, तीन हमीदारांचे हमीपत्र, सातबाऱ्यावर बोजा नोंद, ७०० पेक्षा जास्त क्रेडिट स्कोअरची अपेक्षा, बँकेकडून प्राथमिक मंजुरी आणि ऑनलाइन अर्ज प्रक्रियेतील अडचणी यांसारख्या अटी लाभार्थींना आर्थिक व मानसिक त्रासदायक ठरत आहेत. शासनाने एक हजार कोटींचे भांडवली अनुदान दिले असले, तरी अशा अटींमुळे लाभार्थी योजनांपासून दूर राहतात. ग्रामीण भागातील गरजू, होतकरू तरुण व महिलांना या अटी पार पाडणे शक्य नसते, असेही शेळके यांनी सांगितले. त्यामुळे, महामंडळाच्या उद्दिष्टांची पूर्तता व्हावी आणि लाभार्थींना सुलभतेने कर्ज मिळावे यासाठी शासनाने या अटी तात्काळ रद्द करून एक सुलभ आणि व्यवहार्य प्रक्रिया लागू करावी, अशी मागणी शिवसेना शेळके यांनी समाजकल्याण विभागाकडे केली आहे. यावेळी मेहकर विधानसभा मतदार संघांचे आमदार सिद्धार्थ खरात, जिल्हाप्रमुख वसंत भोजने, उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, सह संपर्कप्रमुख दत्ता पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे, युवासेना शहर प्रमुख अनिकेत गवळी उपस्थित होते.

# आठवडी बाजारामध्ये घाणीचे साम्राज्य

## दुर्गंधीने नागरिक त्रस्त

■ महासागर प्रतिनिधी,
सुलतानपूर , दि. २७ :

येथील आठवडी बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्यामुळे बाजारकरू व व्यावसायिक कमालीचे त्रस्त झाले आहे. बाजारकरुंचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने आठवडी बाजारात स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी होत आहे.

लोणार तालुक्यातील सर्वात मोठी सुलतानपूर ही बाजारपेठ आहे. या ठिकाणी मंगळवारच्या दिवशी बाजार भरत असतो. पंधरा ते वीस खेड्यांतून नागरिक व व्यावसायिक बाजारात येतात. बाजारपेठेच्या



माध्यमातुन ग्रामपंचायतीला मोठे उत्पन्न मिळते. परंतु त्या तुलनेत ग्रामपंचायत प्रशासन बाजारातील साफ सफाईकडे दुर्लक्ष करत असल्याने बाजार परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे साचलेल्या घाणीमुळे सर्वत्र दुर्गंधी सुटत आहे. त्यामुळे आठवडी बाजारात ये जा करणारे व बाजार परिसरात काही नागरिक, गाळे धारक कमालीचे त्रस्त झाले आहेत. ग्रामपंचायत प्रशासनाकडून अधुन मधुन बाजाराची नावाला साफसफाई होत असल्यामुळे नियमित साफसफाईची मागणी नागरिक करत आहेत.येथील आठवडी बाजारात परिसरातील अनेक खेडे गावातील नागरिक व भाजीपाला उत्पादक शेतकरी येतात. अनेक शेतकरी उरलेला भाजीपाला तेथेच टाकून देतात. सडलेला भाजीपाला खाण्यासाठी डुकराच्या झुंडीच्या झुंडी येतात. त्यामुळे आठवडी बाजारात डुकरांचा मुक्त संचार असल्याचे दिसून येत आहे.

# रस्त्याच्या फटीतील कापलेल्या केबलमुळे जीवितहानीची शक्यता



**मेहकर :** रस्त्याच्या फटीमधून टाकण्यात आलेल्या अवैध वीज जोडणीमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. रस्त्याच्या फटीतून या विद्युत केबलवर पडणारे पाणी रस्त्यावरून वाहत आहे. त्यामुळे या फटीतून टाकलेल्या व कटलेल्या केबलवर एखाद्या व्यक्तीचा पाय पडल्यास जीवितहानी होण्याची भीती निर्माण झाली आहे. जानेफळ रोड परिसरात मेहकर नगर पालिकेचे एक हजार ५८४ घरकुल आहेत. या घरकुलांमध्ये नागरिक अवैधरीत्या राहत असून, यामध्ये रस्त्याच्या फटीतील केबल कापून अनेकांनी अवैधरीत्या वीजजोडणी घेतली आहे. अशा प्रकारामुळे महावितरणने यापूर्वी २०० व्यक्तींवर पोलिसांत एफआयआर दाखल केला आहे.

परंतु, पोलिसांनी कोणत्याही प्रकारची कारवाई न केल्याने अवैधरीत्या राहणारे नागरिक वारंवार रस्त्याच्या फटीमधून वायर टाकून अवैधरीत्या वीजजोडणी घेत आहेत. दरम्यान, या कापण्यात आलेल्या केबलवर पावसाचे पाणी पडत असून, त्यावर पाय पडून जीवितहानी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे पोलिस प्रशासन, महावितरण व नगर पालिकेने संयुक्तरीत्या कारवाई करावी, अशी मागणी केली जात आहे.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# बालांगण

## असे साजरे होतात उत्सव





दोस्तांनो, आपल्याकडे सणांच्या निमित्ताने घराघरांमध्ये रोषणाई केली जाते. पणत्या लावल्या जातात. पण आपल्याप्रमाणे इतर देशांमध्येही प्रकाशाचा उत्सव साजरा केला जातो. हा उत्सव साजरा करण्याच्या पद्धती वेगळ्या असल्या तरी त्याचा उद्देश जवळपास सारखाच असतो.

* जपानामध्ये ओनियो फायर फेस्टिवलचं आयोजन केलं जातं. हा सोहळा जानेवारी महिन्यात रंगतो. जपानमधल्या फुफुओकामध्ये लोक मेणबत्त्या आणि मशाली पेटवून संपूर्ण शहर उजळवून टाकतात. मशाली पेटवल्यामुळे संकटं दूर होतील, असं इथले लोक मानतात.

**भन्नाट**

* थायलंडमध्ये लाम क्रयोंघ नावाचा उत्सव असतो. या उत्सवादरम्यान थाई लोक रात्रीच्या वेळी केळ्याच्या पानांपासून तयार केलेले दिवे लावतात. प्रार्थना करतात आणि हे दिवे वाहत्या पाण्यात सोडून दिले जातात.

* फ्लोरिडातल्या अल्टूना शहरात सॅमहेन फेस्टिवलचं आयोजन होतं. हा सुद्धा प्रकाशाचा उत्सव आहे. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात हा उत्सव साजरा होतो.

* स्कॉटलंडमध्ये अप हेली नावाचा सण साजरा होतो. जानेवारी महिन्यातल्या शेवटच्या मंगळवारी हा सण साजरा होतो. या दिवशी इथले लोक प्राचीन काळातल्या योद्धयांप्रमाणे पेहराव करून मशाल घेऊन पदयात्रा काढतात.

## फरक माहिती आहे?




बाजारातून कोणताही अन्नपदार्थ खरेदी करताना तुम्हाला मागच्या बाजूला एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेट असे लिहिलेली दिसते. पण मित्रांनो, याचा अर्थ माहिती आहे का? बरेच लोक या दोन्ही तारखा सारख्याच मानतात. पण त्या पूर्णपणे भिन्न आहेत आणि त्यांचा अर्थ देखील वेगळा आहे. तेव्हा आज एक्सपायरी डेट आणि बेस्ट बिफोर डेट मध्ये काय फरक आहे ते जाणून घेऊ या.


एक्सपायरी डेट म्हणजे ज्या दिवसानंतर उत्पादन वापरण्यास सुरक्षित मानले जात नाही अशी तारीख. ही तारीख प्रामुख्याने औषधे आणि अन्नपदार्थांवर लिहिलेली असते. याचा अर्थ असा की, या तारखेनंतर हे उत्पादन वापरणे आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. जसे की, एक्सपायरी डेटनंतर ब्रेडसारख्या अन्नपदार्थांमध्ये बुरशी वाढू शकते. यामुळे अन्न विषबाधा होऊ शकते.

**काळजी घ्या**

बेस्ट बिफोर डेट म्हणजे ज्या तारखेनंतर उत्पादनाची सर्वोत्तम चव किंवा गुणवत्ता कमी होऊ शकते ती तारीख. अर्थात या तारखेनंतर चव उतरत असली तरी तो पदार्थ खराब होत नाही. ही तारीख बहुतेकदा कोरडे अन्न, पॅक केलेल्या वस्तू आणि सौंदर्यप्रसाधनांवर लिहिलेली असते. यावरुन एवढेच समजते की, या तारखेनंतर संबंधित उत्पादनाच्या चव, पोत, रंग किंवा वासात काही बदल होऊ शकतो, परंतु उत्पादनात असा कोणताही बदल झाला नाही तर ते वापरले जाऊ शकते.

म्हणजेच बेस्ट बिफोर डेट नंतर देखील आपण उत्पादन वापरु शकतो. परंतु त्यातून विचित्र वास येत असेल, रंग बदलला असेल तर वापर करु नये. उत्पादनाची चव किंवा रंग बदलला असेल तर ते फेकून द्यावे. उत्पादन योग्यरित्या साठवले गेले असेल आणि ते बराच काळ टिकू शकते. सहाजिकच ते वापरले जाऊ शकते. तथापि उत्पादनाच्या एक्सपायरी डेट किंवा बेस्ट बिफोर डेटबद्दल काही शंका असेल तर ते न वापरणे चांगले.

## हे लक्षात आले?




मुलांनो, तुम्ही बातम्या वाचायच्या, सामान्य ज्ञान वाढवायचं तर पेपर वाचायलाच हवा. पण निरखून पाहिले तर पेपरच्या खालच्या बाजूला तुम्हाला चार रंगीत गोल दिसतील. ते तुमच्या लक्षात आले नसतील तर आता बघा. या रंगीत गोलांचा काय अर्थ असावा, हे गोल का बरं दिले जात असावेत, असे प्रश्न तुम्हाला पडले असतील. याच प्रश्नांची उत्तरं जाणून घेऊ.

पूर्वीच्या काळी वर्तपानपत्रं कृष्णधवल म्हणजे ब्लॅक अँड व्हाईट असायची. काळानुरुप त्यात बदल झाले आणि रंगीत फोटो, अक्षरं छापली जाऊ लागली. लाल, पिवळा आणि निळा असे तीन प्रमुख रंग असल्याचं तुम्हाला माहीत असेल. पेपर प्रिंट करण्यासाठी प्रिंटरचा वापर होतो. प्रिंटरमध्येही रंगांचं हेच तंत्र वापरलं जातं. प्रिंटरमध्ये या तीन रंगांसह काळ्या रंगाचा समावेश होतो. हे चार गोलांचा सीएमव्हायके हा क्रम

**असं का असतं?**

असतो. यात सी म्हणजे सियान (निळा), एम म्हणजे मजेंटा (गुलाबी), वाय म्हणजे येलो (पिवळा) आणि के म्हणजे ब्लॅक (काळा) हे रंग असतात. या रंगांना योग्य क्रमाने जोडलं तर दुसरा कोणताही रंग मिळवता येतो. सीएमव्हायकेमुळे छपाईदरम्यान इतर रंग वृत्तपत्राच्या पानावर दिसू शकतात. वृत्तपत्र हातात घेतल्यानंतर काही फोटो धुरकट दिसत असतील किंवा रंग एकमेकांमध्ये मिसळले असतील तर सीएमव्हायकेचं तंत्र बिघडल्याचं समजावं.

## मोड वापरा, फोटो खुलवा



दोस्तांनो, आता फोटो काढण्यासाठी स्मार्टफोन वापरला जातो. स्मार्टफोनने फोटो काढण्याचं वेगळंच तंत्र आहे. फोनमध्ये वेगवेगळे मोड असतात. या मोड्सचा वापर करून तुम्ही छान छान फोटो काढू शकता. हे फोटो सोशल साईट्सवर पोस्ट करायचे असतात. त्यामुळे तुमचे फोटो छानच असले पाहिजेत. मग आता स्मार्टफोनच्या कॅमेऱ्याने फोटो काढण्याचं तंत्र जाणून घेऊ.

* दोस्तांनो, तुमच्या फोनमध्ये बोकेह नावाचा मोड असतो. या मोडमध्ये फोटोची पार्श्वभूमी फिकट म्हणजे ब्लर करता येते. म्हणजे या फोटोत व्यक्ती अगदी स्पष्ट दिसते. तुम्ही या मोडचा वापर करू शकता. बोकेह मोडचा कौशल्याने वापर करून छान फोटो काढता येतील.

**टेक्नो टिप्स**

* रात्रीच्या वेळी फोटो काढायचे असतील तर नाईट स्केप मोड वापरा. या मोडमुळे रात्रीच्या अंधूक प्रकाशात तुम्ही छान फोटो काढू शकाल.

* काही स्मार्टफोनमध्ये अल्ट्रा वाइड अँगल कॅमेरा असतो. यामुळे सगळ्या ग्रूपचा फोटो येऊ शकतो. तुमच्या स्मार्टफोनमध्ये असा अँगल असेल तर त्याचा वापर करा.

## नाव घेताना बायका लाजतात



छोट्या दोस्तांनो, उत्तर प्रदेशातील अनेक गावे प्रसिद्ध आहेत. यातील अर्ध्याहून अधिक गावे तर शहरांशी स्पर्धा करू शकण्याजोगी आहेत. या राज्यामध्ये तुम्हाला विविध संस्कृतींचे मिश्रण तसेच एकता पाहायला मिळेल. येथे प्रत्येक धर्माचे लोक राहतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे येथील लोक आजही आपल्या संस्कृतीशी, मातीशी जोडलेले आहेत.

तेथील अनेक गावांमध्ये संध्याकाळी घराबाहेर मुले खेळताना दिसतील. महिला विहिरीतून पाणी भरताना दिसतील. पुरुषांचा एक गट गप्पा मारताना, कामे करताना दिसेल. हे दृश्य आता शहरात दिसत नाही. असे असतानाच गावांची अशीही नावे आहेत जी ऐकून तुम्हाला नक्कीच हसायला येईल. कदाचित ती तुम्ही आधी कधीच ऐकलीही नसतील. चला तर, आज अशाच एका गावाविषयी जाणून घेऊ या.

**अजबगजब**

यूपीमधील या गावाचे नाव घेण्यास महिलांना लाज वाटते तर दुसरीकडे पुरुष नाव घेताना हसतात. त्याच वेळी काही लोकांना मात्र त्याचा अभिमान आहे. हे गाव सुलतानपूर जिल्ह्यात असून भदैया ब्लॉकमधील बालमपूर असे त्याचे नाव आहे. हे गाव केवळ त्याच्या नावामुळेच चर्चेत नाही तर त्यात काही खासियत देखील आहे. गावाचे नाव बालमपूर असण्याचे एक खास कारण आहे. ते म्हणजे ते तीन भावांच्या नावावरुन पडले आहे.

## आता ई ब्लँकेटचा जमाना



दोस्तांनो, थंडीत जाड पांघरूण किंवा ब्लँकेट घेऊन झोपावंसं वाटतं. अंगावरचं ब्लँकेट बाजूलाही करावंसं वाटत नाही. परदेशात तर थंडीसाठीचं ब्लँकेट लोकर किंवा जाड कापडापासून तयार केलं जातं. मात्र आता आपण ई ब्लँकेट अंगावर घेऊ शकतो. मध्यंतरी श्याओमी या कंपनीने ई ब्लँकेट सादर केलं आहे. या ब्लँकेटचा वापर सहजपणे करता यावा यासाठी कंपनीने अॅपही तयार केलं आहे. आता हे ई ब्लँकेट अंगावर कसं घ्यायचं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. पण कंपनीने ग्राहकांच्या सुरक्षेची पूर्ण काळजी घेतली आहे. यात स्मार्ट स्लीप मोड आहे. त्यामुळे ब्लँकेट घेतल्यावर शांत झोप लागेल. या अनोख्या ब्लँकेटमुळे शरीराचं

**नवं काही**

तापमान नियंत्रणात रहातं. पुरेशी ऊब देण्याचं काम हे ब्लँकेट करतं. ब्लँकेटमध्ये व्हॉईस असिस्टंटचीही सोय आहे. व्हॉईस असिस्टंटमुळे ब्लँकेटला तोंडी सूचनाही देता येतील. तेव्हा थंड प्रदेशात जायचं असेल तर हे घेऊन जायलाच हवं.

## बाबा, माझे बाबा!



दोस्तांनो, वडील हा शब्द ऐकताच मनात एका अशा व्यक्तीची प्रतिमा उभी राहते, जो जास्त बोलत नाही पण ज्याच्या खांद्यावर आपण नेहमीच निश्चितपणे विसावतो. आई आपल्याला प्रेमाने आणि काळजीने वाढवते तर वडील जीवनातील प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहण्यास शिकवतात. अनेकदा आपण त्यांचा सल्ला, शिकवण ऐकत नाही. परंतु त्यांच्या प्रत्येक कामातून, प्रत्येक निर्णयातून आपण त्या स्वीकारत राहतो. हे मौल्यवान धडे आपल्याला जीवनाच्या कोणत्याही शर्यतीत मागे राहू देत नाहीत.

**कसे वागाल?**

आपण बाबांना घर आणि कुटुंबाच्या सर्व जबाबदाऱ्या घेताना पाहतो. बिल भरणे असो, दुरुस्तीचे काम असो किंवा घरासाठी आवश्यक वस्तू आणणे असो... वडील नेहमीच आघाडीवर असतात. ते आपल्याला समजावून सांगत नाहीत तर जबाबदार असण्याचा अर्थ काय आहे हे कृतीतून दाखवतात. ते त्यांची झोप, आराम आणि कधीकधी मनातील इच्छाही बाजूला ठेवून कुटुंबासाठी कष्ट करतात. जबाबदारीची ही भावना पाहूनच तुम्ही मुले जीवनात आपली कर्तव्ये कशी पार पाडायची हे शिकता. हा धडा भविष्यात करिअरसाठी, नातेसंबंधांसाठी आणि समाजासाठी आपल्याला जबाबदार बनवतो.

बाबा काम करताना कधी अपयशीही ठरतात. पण ते हार मानत नाहीत. आपण नेहमीच त्यांना यशस्वी होईपर्यंत प्रयत्न करताना पाहतो. बाबा त्यांच्या अपयशांबद्दल उघडपणे क्वचितच चर्चा करतात, परंतु त्यांची चिकाटी आणि कधीही न हार मानण्याची वृत्ती आपल्याला खूप काही शिकवते. आपल्याला शिकायला मिळते की, अपयश हा आयुष्याचा शेवट नाही तर काहीतरी नवीन शिकण्याची आणि चांगल्या प्रकारे प्रयत्न करण्याची संधी आहे. ही मानसिक शक्ती सर्वात मोठ्या आव्हानाला तोंड देताना उपयोगी पडते. तीच संकटकाळात खंबीरपणे उभे राहण्याचे धैर्य देते.

## चित्र रंगवा



## साखरेचे खाणार त्याला...




छोट्या दोस्तांनो, आज आपण 'साखरमुक्त' आणि 'नो-अ‍ॅडेड शुगर' यातील फरक जाणून घेऊ या. एखाद्या उत्पादनावर नो-अ‍ॅडेड शुगर लिहिलेले असते, तेव्हा त्याचा अर्थ असा होतो की, त्यात अतिरिक्त साखर टाकलेली नाही. तथापि, याचा अर्थ असा नाही की त्या उत्पादनात अजिबात साखर नसते. त्या उत्पादनात नैसर्गिकरित्या असणारी साखर असते. फळांच्या रसात फ्रुक्टोज किंवा दह्यात लैक्टोज सारखी नैसर्गिक साखर असतेच. म्हणून तुम्हाला एखाद्या उत्पादनावर 'साखरेशिवाय' असे लिहिलेले लेबल दिसले तर समजून घ्या की त्यात कृत्रिम साखर मिसळलेली नाही. केवळ नैसर्गिक साखर आहे.


'साखरमुक्त' असे लेबल असणाऱ्या उत्पादनांमध्ये साखरेचे प्रमाण नगण्य असते. अशा उत्पादनांमध्ये गोडपणासाठी साखरेऐवजी कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात. उदाहरणार्थ, मधुमेहाच्या रुग्णांसाठी कोणताही गोड पदार्थ तयार करताना त्यात साखर नसते तर स्टीव्हियासारखे कृत्रिम गोड पदार्थ वापरले जातात.

आता तुमच्या मनात प्रश्न असेल की या दोघांपैकी कोणते चांगले आहे. तर उत्तर असे की, अतिरिक्त साखरेचे प्रमाण कमी

**जाणून घ्या**

करायचे असेल तर साखरेशिवाय तयार केलेली उत्पादने वापरणे चांगले असते. पण कोणी साखर खाणे पूर्णपणे थांबवू इच्छित असेल तर त्यांनी साखरमुक्त उत्पादने निवडणे चांगले.

## ठिपके जुळवा



### स्मार्ट टिप्स

#### असा सुरू करा अभ्यास



छोट्या दोस्तांनो, सुट्टी संपल्यावर तुम्ही पुन्हा अभ्यासाला लागला असाल. सुट्टीमुळे अभ्यासाचा थोडा कंटाळा आलेला असतो. पण तुम्हाला पुन्हा एकदा रिचार्ज व्हायला हवं. अभ्यासाला लागायला हवं. यासाठी तुमच्या आवडत्या विषयाचा अभ्यास करायला सुरूवात करा. गणिताचा कंटाळा येत नाही.

### खादाडी

#### मेक्सिकन कॉर्न



काही चटपटीत खायचं असेल तर तुम्ही मेक्सिकन कॉर्न हा पदार्थ बनवू शकता. यासाठी मक्याची दोन कणसं उकडून घ्या. तीन चमचे मेयोनीज, दोन चमचे क्रीम, एक चमचा लाल तिखट, लिंबाचा रस, पाव कप किसलेलं चीझ, चिरलेली कोथिंबिर आणि मीठ असे पदार्थ घ्या. आता एका बाउलमध्ये मेयोनीज, क्रीम, मीठ आणि लाल तिखट घालून नीट हलवून घ्या. आता मेयोनिजचं हे मिश्रण उकडलेल्या मक्याच्या कणसांवर नीट लावून घ्या. त्यावर लिंबाचा रस लावून वरून किसलेलं चीझ आणि कोथिंबिर घाला. मस्तपैकी मेक्सिकन कॉर्न खा.

### दोस्त हे मस्त

#### असे हे सी ऑटर



सी ऑटर हा प्राणी बराच वेळ पाण्यात रहातो. ऑटर हा प्राणी ऑस्ट्रेलिया खंड सोडून इतर प्रत्येक खंडात आढळतो. ऑटरचे दात अणकुचीदार असतात. तो पटकन शिकार करतो. ते पोहण्यासाठी शेपटीचा वापर करतात. त्यांचे पाय खूप छोटे असतात. म्हणूनच त्यांना पोहायला आवडत असावं.

### योगा टाईम

#### महत्त्व सूर्यनमस्कारांचं




मुलांनो, दररोज सूर्यनमस्कार घालायला हवेत. सूर्यनमस्कार हा संपूर्ण व्यायाम आहे. या व्यायामामुळे तुमचा आजारांपासून बचाव होईल. सर्दी, खोकला, ताप असे आजार फार त्रास देणार नाहीत. तुमचं लक्षही केंद्रित व्हायला मदत होईल. सूर्यनमस्काराची गोडी लागली की तुम्ही हा व्यायाम नियमितपणे कराल.

## सरन्यायाधीश भूषण गवई यांचे विमानतळावर स्वागत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :



सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषण गवई यांचे सलग तीन दिवस नागपूर येथे भरगच्च कार्यक्रम असून, शुक्रवारी त्यांच नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले.

सरन्यायाधीश यांच्या स्वागतासाठी विमानतळावर सर्वच प्रशासकीय अधिकाऱ्यांची गर्दी बघायला मिळाली. यावेळी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, ज्येष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल,विशेष पोलीस महानिरीक्षक संदीप पाटील, विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. दिलीप भुजबळ, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार तसेच राष्ट्रीय विधी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजेंद्र कुमार, कुलसचिव डॉ. रागिणी खुबालकर आणि उच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अतुल पांडे यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांचे स्वागत केले.

शनिवारी हायकोर्ट बार असोसिएशन नागपूरच्या वतीने सायंकाळी ६.३० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. माजी सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या हस्ते न्या. गवईंचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमापूर्वी दुपारी ४.३० वाजता नागपूर खंडपीठ येथील नवनिर्मित वकील कक्षाचे सरन्यायाधीश गवई यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात येईल.

# रोजगाराभिमूख कौशल्य विकासाला प्राधान्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

सर्वप्रकारच्या सोयीसुविधा उपलब्ध झाल्या तरीही प्रशिक्षित मनुष्यबळ ही काळाची गरज असणार आहे. हे मनुष्यबळ शैक्षणिक धोरणांमधील बदलांच्या माध्यमातून उपलब्ध होऊ शकते. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणात व्यवसायाभिमूख तांत्रिक शिक्षण, रोजगाराभिमूख कौशल्य विकास यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

मंथनच्या वतीने रेशीमबाग येथील कवीवर्य सुरेश भट सभागृहात शिक्षक परिसंवाद आयोजित करण्यात आला. त्यावेळी ना. श्री. गडकरी बोलत होते. या कार्यक्रमाला भाजपचे नागपूर शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, आमदार प्रवीण दटके, भाजपचे ज्येष्ठ नेते संजय भेंडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरू सुभाष कोंडावार, डॉ. शैलेंद्र देवरणकर, डॉ. श्रीपाद ढेकणे, माजी आमदार नागो गाणार, मोहित शाह, विष्णू चांगदे यांची प्रमुख उपस्थिती होती.




केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन : मंथनच्या वतीने शिक्षक परिसंवादाचे आयोजन

गडकरी म्हणाले, २०२० मध्ये आपण शैक्षणिक धोरण स्वीकारले. त्या धोरणाचे उद्दिष्ट्य समजून घेण्याची गरज आहे. आपल्या देशात अनेक क्षेत्रात अनेक लोक उत्तम काम करतात. परंतु, भविष्यातील माणूस घडविण्यासाठी जे आवश्यक आहे, त्यानुसार उद्दिष्ट्य निश्चित करण्याची गरज आहे. जगात समाजिक, आर्थिक, शैक्षणिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. आपल्याला विश्वगुरू व्हायचे आहे, जगातील तिसरी अर्थव्यवस्था व्हायचे आहे आणि आत्मनिर्भर भारत निर्माण करायचा आहे, असे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बघितले आहे.

विश्वगुरू म्हणून मान्यता प्राप्त करायची असेल तर फक्त आर्थिक आधारावर ते शक्य नाही. त्यासाठी आपली संस्कृती, परंपरा, मूल्याधिष्ठित जीवन पद्धती याचा देखील विचार करावा लागेल. त्याचेही वेगळेपण समजून घ्यावे लागेल. भविष्यातील पिढी तयार करण्यासाठी ते अधिक महत्त्वाचे आहे, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

शिक्षण म्हणजे गुणांची शर्यत समजली जाते. पण शिक्षण म्हणजे ज्ञान, कौशल्य आणि संस्कार होय. या तिन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आपल्याला जो भविष्यातील माणूस उभा करायचा आहे, त्यासाठी प्रबोधन, प्रशिक्षण आणि संशोधन यावर जोर द्यावा लागेल. आपल्याच देशात सगळं ज्ञान आहे, असे नाही.

जगातील अनेक देशांमधून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत, असेही गडकरी म्हणाले. एखादे कौशल्य विकसित केले तर त्यातून रोजगार निर्माण करता येतो. त्यामुळे जगाची आणि आपली काय गरज आहे, आपल्याकडे असलेल्या मनुष्यबळाला कोणते प्रशिक्षण-शिक्षण दिले पाहिजे, याचा विचार करावा लागेल. तंत्रज्ञानाचा उपयोग करून डिजीटल शिक्षण कसे देता येईल, यासाठी प्रयत्न करावा लागेल, अशी अपेक्षाही गडकरी यांनी व्यक्त केली.

## समृद्धी महामार्गालगत मेहकरजवळ रस्ता पाण्यात

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २७ :

जिल्ह्यातील मेहकर परिसरात २५ जून च्या संध्याकाळ पासून सुरु झालेल्या पावसाचा फटका समृद्धी महामार्गालाही बसला.

मेहकर जवळून जाणाऱ्या समृद्धीच्या पुलाखाली राष्ट्रीय महामार्गावर पाणी साचल्याने व रस्त्यावरून नदी सारखा प्रवाह वाहत असल्याने वाहतूक विस्कळीत झाली. २५ जून रोजी रात्रीपासून २६ जूनच्या रात्रीपर्यंत येथे अतिवृष्टी झाली. या काळात येथे साधारणतः १०७ मीमी (अंदाजे) पाऊस झाल्याची नोंद आहे. त्यामुळे खामगावकडून मेहकरकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरची साधारणतः २०० मीटर लांबी १ ते दीड तास पाण्याखाली होती.

राष्ट्रीय महामार्गाकडून समृध्दी महामार्गास जोडणाऱ्या रॅम्पवर पाणी आलेले होते. त्यामुळे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक एक ते दीड तास प्रवाश्यांच्या सुरक्षेसाठी बंद करण्यात आलेली होती. त्यानंतर प्रशासनाकडून राष्ट्रीय महामार्गावरील मेहकर इंटरचेंज येथील पाणी निचरा होण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या. त्यामुळेच एक ते दीड तासातच या राष्ट्रीय महामार्गावरील वाहतुक सुरळीत झाली.

## सुधारित जनसुरक्षा विधेयक तयार

### १३ हजार सूचनांचा समावेश : पावसाळी अधिवेशनात होणार सादर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



राष्ट्र विघातक डाव्या कडव्या विचारांनी तरुणाई प्रभावित होऊन ती नक्षलवादाकडे वळण्याचा धोका रोखण्यासाठी, देशाच्या संविधानाला झुगारणाऱ्या घातक नक्षल विचारांना पायबंद बसावा म्हणून महाराष्ट्र सरकारचे विशेष जनसुरक्षा विधेयक हे एक महत्वाचे पाऊल ठरणार असल्याचे मत विशेष जनसुरक्षा विधेयक समितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

विधेयकासंदर्भात अंतिम विचार विनिमय करण्यासाठी विधानभवनात समितीची पाचवी बैठक शुक्रवारी विधानभवनात झाली. महाराष्ट्रातील सुजाण नागरिकांनी या विधेयकाच्या बाजूने सकारात्मक मत व्यक्त केले असून, तब्बल तेरा हजार सूचना, सुधारणांचा समावेश, उद्दिष्ट्य व उद्देशांवर अभ्यास करून विधेयक तयार झाल्याचे बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

सुधारणांसह विधेयक अंतिम करण्यात आले असून, पावसाळी अधिवेशनात ते मंजूरीसाठी ठेवले जाईल. सर्व सदस्य या विधेयकाला पाठिंबा देतील आणि चांगले तरुण पिढील नक्षलवादापासून रोखण्यासाठी मदत करतील असा विश्वास आहे.

**नव्याने करण्यात आलेल्या सुधारणा**

१) कडव्या डाव्या विचारसरणीच्या संघटनांच्या किंवा यासारख्या संघटनांच्या विवक्षित बेकायदेशीर कृत्यांचा प्रभावीपणे प्रतिबंध करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी नवीन कायदा अधिनियमित करणे इष्ट आहे. त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे. अशी सुधारणा प्रस्तावित करुन सुधारणा करण्यात आली आहे.

२) सल्लागार मंडळाच्या रचनेमध्ये काही बदल करण्यात आला असून उच्च न्यायालयाचे न्यायाधीश किंवा सेवानिवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालयाचे सरकारी वकील हे त्या समितीचे सदस्य असतील तसेच उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, निवृत्त न्यायाधीश हे त्या समितीचे अध्यक्ष असतील अशी सुधारणा प्रस्तावित केली आहे.

३) खंड १५ मध्ये या अधिनियमान्वये केलेल्या सर्व अपराधांचे अन्वेषण पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याऐवजी पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याकडे देण्यात यावा अशी सुधारणा करण्यात आली आहे.

# मराठी कलाकारांचाही हिंदी सक्तीला विरोध

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २७ :

महाराष्ट्रात शैक्षणिक धोरणात इयत्ता पहिली ते पाचवी हिंदी भाषेची सक्ती केली जात असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. याच्या विरोधात ठाकरे बंधू मैदानात उतरणार आहेत. आता मराठी अभिनेते देखील आपले मत व्यक्त करताना दिसत आहेत. अभिनेते वैभव मांगले यांनी सोशल मीडियावर आपले विचार व्यक्त केले आहेत.

वैभव मांगले यांनी फेसबुकवर मोठी पोस्ट करत हिंदी भाषेच्या सक्तीला आपला विरोध दर्शवला आहे. ते म्हणाले, उर्वरीत महाराष्ट्रचे मला माहीत नाही. पण मुंबईत मराठी माणसाच्या मराठीची वाट लागलेली आहे. कामाच्या ठिकाणी सतत हिंदी किंवा इंग्रजी बोलाव लागते हा एक भाग. दुसरे म्हणजे आपल्या आपल्यात सुद्धा त्यांना मराठी बोलायची लाज वाटते.

आपली मुलं चांगल मराठी बोलायचे विसरून गेली आहेत. त्यात हिंदीची सक्ती केली तर संपलेच सगळे, मातृभाषेची (मुळात आई मराठी बोलत असेल तर) भिकारणीची अवस्था होईल.

आपण आपल्या भाषेची कमालीची भीषण अवस्था केली आहे. तिच्याबद्दल कमालीचा अनादर आहे. आम्हाला तर सिरियलला स्क्रिप्ट सुद्धा मराठीत देत नाहीत (अनेक ठिकाणी) तर इतर ठिकाणी जिथे हिंदी भाषिक इंग्रजाळलेले लोक आपली काय पत्रास ठेवतात ते आपण पाहतो आहोत, असे वैभव मांगले म्हणाले.

**सयाजी शिंदेंचे परखड भाष्य**

घटनेनुसार हिंदी भाषा राष्ट्रभाषा नाही. एखाद्या पक्षाचा तो अजेंडा असू शकतो. घटनेनुसार मुख्य १८ भाषा या राष्ट्रभाषा आहेत. ज्याने त्याने आपल्या राज्यभाषेला आदर द्यायला हवा, पण तो लादायला नको. मुख्यमंत्री नेमके कोणत्या भाषेत शिकलेत? मराठीतच शिकलेत ना? असा सवाल सयाजी शिंदे यांनी उपस्थित केला.

## महाविद्यालयीन विद्यार्थिनीचा ट्रकखाली सापडून मृत्यू

■ वृत्तसंस्था, पुणे, दि. २७ :

पुण्यातील सिंहगड रस्त्यावरील तुकाईनगर परिसरात भरधाव ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने १९ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थिनी सई श्रीकांत भागवत हिचा जागीच मृत्यू झाला. सई सर परशुराम महाविद्यालयात कला शाखेत द्वितीय वर्षात शिक्षण घेत होती.

घटनेच्या वेळी सई महाविद्यालयातून दुचाकीवरून घरी परतत होती. तुकाईनगर परिसरात भरधाव ट्रकने तिच्या दुचाकीला धडक दिली. अपघातात तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात दीपश्री श्रीकांत भागवत यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी ट्रक चालकाविरुद्ध हलगर्जीपणा आणि बेदरकारपणे वाहन चालवल्याचा गुन्हा दाखल केला आहे. अपघातानंतर आरोपी ट्रक चालक फरार झाला असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. पुणे पोलिस आयुक्तांनी शहरातील प्रमुख रस्त्यांवर डंपर, सिमेंट मिक्सर, ट्रक यांसारख्या अवजड वाहनांना बंदी घातली असतानाही अवजड वाहने धावत आहेत.

**: साप्ताहिक संवाद :**

## एसीच्या तापमानावर मर्यादा आवश्यक

लोकरंग

जागतिक तापमान वाढीचे परिणाम गेल्या आठ दहा वर्षांच्या कालावधीत प्रकर्षाने जाणवू लागलेले आहेत. जागतिक तापमान वाढीसाठीची जी काही प्रमुख कारण आहेत त्यामध्ये वातावरणात मोठ्या प्रमाणात होणारे कार्बन वायूचे उत्सर्जन हे अत्यंत महत्वाचे असे कारण आहे. अर्थात जगभरात वातानुकूलित यंत्रणेचा (एसी) होत असलेला अतिरेकी वापर आणि त्या माध्यमातून होणारे कार्बन वायूचे उत्सर्जन हे मानवी आरोग्याच्या आणि म्हटलं तर अस्तित्वाच्या दृष्टिकोनातून देखील अत्यंत गंभीर आहे. म्हणूनच वातावरण कमीत कमी कार्बनमुक्त होण्यासाठी एसीच्या तापमानावर मयार्दा आवश्यक आहे. याच संधर्भात पर्यावरण अभ्यासक डॉ. मेघश्री दळवी यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

○ एसीच्या तापमानामुळे होणाऱ्या कार्बन उत्सर्जनाची सद्यःस्थिती नेमकी काय आहे?

एसी च्या तापमान वाढीचे प्रमाण हे प्रत्येक वर्षी वाढतेच आहे अर्थात त्या मध्यमातूनच वातावरणात कार्बन सारख्या घातक वायूचे उत्सर्जन देखील वाढतेय. युरोपमध्ये २०१८ च्या उन्हाळ्यात इलेक्ट्रिक पंख्यांची मागणी इतकी वाढली कि आयात करून देखील पुरवठा कमी पडू लागला.

आपल्याकडे मागील वर्षीच्या उन्हाळ्यात बंगळुरूमध्ये एसीची मागणी ५० टक्क्यांनी वाढली. आज जागतिक पातळीवरील ऊर्जेच्या वापरापैकी ७ टक्के एसीसाठी होतो. आणि तो २०५० पर्यंत अधिकच वर जाईल.

अस्थिर हवामान आणि बदलते ऋतुचक्र यामुळे एसीचा वापर वाढतो. त्यासाठी लागणारी अधिकची ऊर्जा निर्माण करताना कार्बन उत्सर्जनात भर पडते. मग पुन्हा तापमानात वाढ आणि पयार्याने एसीसाठी लागणाऱ्या ऊर्जेत वाढ असे दुष्टचक्र सुरु आहे. या कार्बन उत्सर्जनाचे धोके तितकेच गंभीर होत आहेत.

○ तापमान वाढीमुळे शहरी भागांमध्ये उष्णतेची बेट तयार होत आहेत म्हणजे नेमकं काय?

एसीच्या बाह्य यंत्रणेमुळे परिसरातील तापमान झपाट्याने वाढते. शहरामध्ये मोकळ्या मैदानात किंवा झाडांच्या सावलीत थोडा थंडावा वाटतो. पण रस्त्यावर किंवा इमारतीजवळ प्रचंड उष्णता जाणवते. बांधकामात वापरलेले सिमेंट काँक्रीट,डांबर आणि लोखंड दिवसभर उष्मा शोषून ठेवतात आणि तापमान वाढते. इमारतींच्या गर्दीत वाऱ्याला अडथळे आल्याने या उष्णतेला बाहेर पडायला वाव नसतो. त्यामुळे रात्री देखील तापमान फारसे घटत नाही. याचा परिणाम म्हणून शहरातील काही भागात मोकळ्या परिसराच्या तुलनेत २ ते ५ अंश सेल्सिअस जास्त तापमान असते. यालाच उष्णतेचे बेट अर्थात हिट आयलंड म्हणतात. एसीचा वापर वाढल्याने शहरातील उष्णतेची बेटे अधिकच दाहक होऊन नागरी जीवनावर अनेक दुष्परिणाम जाणवत आहेत.

○ एसीच्या तापमानवाढीवर नियंत्रणाचा जो तोडगा सरकारने काढलेला आहे तो काय आहे?

एसीच्या अतिरेकी वापराचा धोका लक्षात घेऊनच भारत सरकारने यावर एसीचे तापमान २० ते २८ अंश सेल्सिअस मर्यादित ठेवण्याचा प्रस्ताव मांडलेला आहे. म्हणजेच २० अंश सेल्सिअसच्या खाली जात येणार नाही. आणि बाहेर अति थंडी असली तरीही हीटिंग २८ अंशाच्या वर नेता येणार नाही. या प्रस्तावाचे मुख्य उद्दिष्ट हे ऊर्जा बचत हे आहे. हा नियम सध्या प्रस्ताव म्हणून सार्वजनिक तसेच व्यावसायिक ठिकाणांसाठी तसेच खाजगी जागांसाठी देखील लागू असेल. भविष्यात या प्रस्तावाचे कायद्यात रूपांतरण होईल.

■ ■ ■

## अल्पवयीन मुलीचे दोन वर्ष शोषण

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २७ :

जिल्ह्यातील पिंजर येथील एका अल्पवयीन मुलीला अश्लील छायाचित्र प्रसारित करण्याची धमकी देऊन नराधमाने तब्बल दोन वर्ष वारंवार अत्याचार केला.

अखेर पीडित मुलीला सहन न झाल्याने तिने पोलीस ठाणे गाठून तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार कथन केला. पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. पिंजर आणि चान्नी पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत आरोपीला गजाआड केले.

पातूर तालुक्यातील अंधारसांगवी सुनील गजानन देवकर (२५) हा २०२२ च्या डिसेंबरपासून अल्पवयीन मुलीचा पाठलाग करत होता. त्याने एक दिवस दुचाकीवरून मुलीला जबरदस्तीने महान धरणाजवळील वाघागड येथील जंगलात नेले आणि शारीरिक अत्याचार केला. त्यानंतर आरोपीने तिला गावात सोडले. घडलेल्या प्रकारासंदर्भात कुणाला काही सांगितले, तर काढलेले अश्लील छायाचित्र समाज माध्यमांवर टाकून बदनामी करेल, अशी धमकी आरोपीने पीडितेला दिली. त्यामुळे पीडिता घाबरुन गप्प राहिली.

आरोपी मित्रांसह पीडितेच्या शाळेजवळ येत होता आणि तिचे अश्लील छायाचित्र प्रसारित करण्याची धमकी देत तिच्यावर सातत्याने शारीरिक अत्याचार करीत होता. अखेर आरोपीचे अत्याचार सहन न झाल्याने अल्पवयीन पीडित मुलीने घडलेल्या संपूर्ण प्रकाराची माहिती पोलिसांना दिली. मुलीच्या तक्रारीवरून पिंजर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करीत पिंजर व चान्नी पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करून नराधम आरोपीला बेड्या ठोकल्या. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## शक्तिपीठ महामार्गाविरोधात १ जुलैला चक्काजाम

■ वृत्तसंस्था, कोल्हापूर, दि. २७ :

गरज नसलेल्या शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात येत्या १ जुलै रोजी १२ जिल्ह्यांमध्ये 'महामार्ग रोको' आंदोलन करण्यात येणार आहे. याबाबतची माहिती काँग्रेस नेते सतेज पाटील यांनी दिली आहे.

शक्तीपीठ महामागासंदर्भात राज्य शासनाच्या भूमिकेनंतर बाधित शेतकऱ्यांची एक राज्यव्यापी ऑनलाइन बैठक पार पडली. या बैठकीत खासदार विशाल पाटील, आमदार विश्वजीत कदम, आमदार कैलास पाटील, माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह शिवसेनेचे विजयराव देवणे, कॉ. गिरीश फोंडे आणि १२ जिल्ह्यांमधील अनेक बाधित शेतकरी सहभागी झाले होते. कृषी दिनी म्हणजेच मंगळवार, १ जुलै रोजी बाधित शेतकरी १२ जिल्ह्यांमध्ये महामार्ग रोको आंदोलन करणार आहेत.

## इइपिसी इंडियाची सरकारला अमेरिकेसोबतच्या BTAमध्ये क्षेत्रीय दरांचा समावेश करण्याची विनंती




इइपिसी इंडियाचे अध्यक्ष पंकज चड्ढा यांनी अलिकडेच अमेरिकेने स्टील, ॲल्युमिनियम आणि संबंधित उत्पादनांवरील कलम २३२ शुल्क २५% वरून ५०% पर्यंत वाढवण्याच्या निर्णयाबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, इतकी तीव्र वाढ आमच्या निर्यातदारांसाठी एक धक्का आहे. आमच्या ऑटो क्षेत्रावरही परिणाम झाला आहे, त्याच कायद्यांतर्गत २५% शुल्क आकारले जात आहे.

या शुल्कांचा परिणाम भारताच्या अमेरिकेला होणाऱ्या अभियांत्रिकी नियार्तीवर होतो, ज्यांचे मूल्य दरवर्षी २० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. आम्हाला आशा आहे की द्विपक्षीय व्यापार करार (BTA) मध्ये या क्षेत्रीय दरांना योग्यरित्या संबोधित केले जाईल. चड्ढा यांनी आशा व्यक्त केली की युरोपियन युनियन सोबत मुक्त व्यापार करार या वर्षाच्या सुरुवातीलाच स्वाक्षरी केला जाऊ शकतो, कारण यूके सोबतचा व्यापार करार आधीच अंतिम झाला आहे आणि तो प्रमुख विकसित देशांसोबतच्या FTA साठी एक नमुना म्हणून पाहिला जातो.

चड्ढा यांनी नमूद केले की भारत-यूके FTA अंतिम झाला असला तरी, त्याच्या अंमलबजावणीसाठी सुमारे एक वर्ष लागू शकते. चड्ढा यांनी कार्बन बॉर्डर ॲडजस्टमेंट मेकॅनिझम अंतर्गत प्रस्तावित केलेल्या कार्बन करापासून भारतीय एमएसएमइ साठी तीन वर्षांची स्थगिती सुचवली, जी जानेवारी २०२६ मध्ये लागू होईल. त्यांनी B'fb च्या काही स्टील उत्पादनांवर सेफगार्ड ड्यूटी वाढवण्याच्या प्रक्रियेलाही हिरवा झेंडा दाखवला आणि इयु सोबत व्यापार करार अंतिम करताना त्यावर उपाय शोधण्याची विनंती सरकारला केली.

विकास आयुक्त (उद्योग) दीपेंद्र सिंग कुशवाह म्हणाले, आम्ही महाराष्ट्रातील निर्यातीला पाठिंबा देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहोत आणि ते आमचे कर्तव्य आहे. परंतु मुख्य भूमिका तुमच्याकडून (निर्यात करणाऱ्या समुदायाकडून) येते. आम्ही फक्त सुविधा आणि पाठिंबा देतो. वास्तविक निर्यात तुमच्याकडून केली जाते आणि म्हणूनच महाराष्ट्र हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे निर्यातदार राज्य आहे. महाराष्ट्रातील निर्यातीत अभियांत्रिकी क्षेत्र खूप महत्त्वाची भूमिका बजावते.



## आंध्र प्रदेशातील गांडीकोटा प्रसिद्ध पर्यटन स्थळ

गांडीकोटा हे भारतातील ग्रँड कॅनियन म्हणूनही ओळखले जाणारे हे आंध्र प्रदेशातील एक छोटेसे गाव आहे. हे बेलम लेण्यांपासून थोड्या अंतरावर वसलेले आहे आणि तिथून पेन्ना नदी वाहते. शहरात वसलेला गांडीकोटा किल्ला हे एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे कारण ते भूतकाळातील अप्रतिम वास्तुकलेवर प्रकाश टाकते. हे आंध्र प्रदेश प्रसिद्ध ठिकाण आंध्र प्रदेशच्या हृदयापासून फक्त ५ तासांच्या अंतरावर आहे, परंतु सार्वजनिक वाहतुकीद्वारे देखील या ठिकाणी पोहोचता येते. तिरुपती या भगवान व्यंकटेश्वराच्या मंदिराबद्दल कोणी ऐकले नाही. हे हिंदूंसाठी सर्वात प्रसिद्ध तीर्थक्षेत्रांपैकी एक आहे आणि आंध्र प्रदेशातील सर्वोत्तम पर्यटन स्थळ आहे. हे तिरुमाला येथे आहे, तिरुपतीच्या सात टेकड्यांपैकी एक. स्थापत्य आणि पायवाट या दोन्ही बाबतीत हे मंदिर भव्य आहे. मंदिराला दररोज ५०,००० यात्रेकरू भेट देतात आणि दररोज लाखो देणगी प्राप्त करतात. हिंदू संस्कृतीची भव्यता जाणून घेण्यासाठी या मंदिराला भेट द्यायलाच हवी.

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## ओडिशा पत्रकारांच्या पेन्शनची जबाबदारी

# व्हॉईस ऑफ मीडियाचीच

संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांचे प्रतिपादन

ओडिशामध्ये राज्य अधिवेशन

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. २७ :

ओडिशामधील व्हॉईस ऑफ मीडियाच्या राज्य अधिवेशनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पत्रकारांच्या सशक्त आणि सुरक्षित भवितव्याच्या दृष्टीने आयोजित या ऐतिहासिक अधिवेशनात अनेक ठोस निर्णय घेण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ओडिशामधील पत्रकारांच्या पेन्शनची जबाबदारी व्हॉईस ऑफ मीडिया घेणार असल्याचे स्पष्ट शब्दांत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी जाहीर केले.



ओडिशामध्ये व्हॉईस ऑफ मीडियाचे ५,५०० हून अधिक सदस्य असून, त्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आणि त्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरले. खुर्दा येथे पार पडलेल्या या अधिवेशनात संस्थेचे सर्व पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते.

प्रत्येक पत्रकारासाठी १० लाख रुपयांचा विमा, गरजू पत्रकारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत, सेवानिवृत्त पत्रकारांसाठी पेन्शन योजना, पत्रकारांच्या घरकुल योजनांसाठी पुढाकार, स्किलिंग व रिस्किलिंगसाठी प्रशिक्षण उपक्रम आदि निर्णय या अधिवेशनात घेण्यात आले. या सर्व मुद्द्यांवर ठराव मंजूर करण्यात आले असून, त्या संदभार्तील अधिकृत मागण्या लवकरच शासनाकडे सादर केल्या जाणार आहेत.

संदीप काळे म्हणाले, ओडिशातील पत्रकार आणि त्यांचे कुटुंबीय यांचं भविष्य सुरक्षित करण्यासाठी व्हॉईस ऑफ मीडिया पुढे सरसावलं आहे. ही चळवळ फक्त हक्कांची नाही, तर जबाबदारीची आहे. आम्ही वचनबद्ध आहोत.ह्व अधिवेशनात नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, तसेच ज्येष्ठ कार्यकर्त्यांची पदोन्नती करून त्यांचा केंद्रीय कार्यकारिणीत समावेश करण्यात आला. कार्यक्रमात प्रबीणा म्हचदेव, सुधीर मानसिंग, संजय अग्रवाल, सुरेंद्रनाथ पाढी, प्रभात मिश्रा, सुखांत परिदा, धनेश्वर बिदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनाचा दर्जा अधिकच उंचावला.

अधिवेशनात राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. पत्रकारांच्या व्यावसायिक, सामाजिक, कौटुंबिक सुरक्षिततेसाठी ह्वव्हॉईस ऑफ मीडियाह्ण उभ्या करीत असलेल्या या विश्वासाच्या व्यासपीठास एक नवी दिशा मिळाली आहे.

पत्रकार हा देशाचा चौथा स्तंभ आहे. जर समाजाने पत्रकाराच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतली नाही, तर व्हॉईस ऑफ मीडिया ती पूर्ण करेल, असे ठाम शब्दांत सांगत संदीप काळे यांनी अधिवेशनात उपस्थित सर्वांना प्रेरणा दिली.

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ शनिवार, दि. २८, जून २०२५ ■

# पिस्तूलसह दोन काडतुसे जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

परिसरात दहशत निर्माण करून वर्चस्व स्थापित करण्यासाठी त्याने पिस्तूलसह दोन काडतुसे मागविली. परंतु, त्यापूर्वीच पोलिसांनी भरपावसात पाठलाग करून त्याच्या मुसक्या आवळल्या. पंचांसमक्ष पिस्तूलसह दोन काडतुसे जप्त केली. सोनू ऊर्फ सागर त्रिवेदी (30) रा. धरमनगर, कळमना, सहदेव शाहू (38) रा. डिप्टी सिग्नल अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

त्यांचा तिसरा साथीदार फरार असून, पोलिस त्याचा शोध घेत आहेत. पिस्तूल दाखवून तो काय साध्य करणार होता, ही माहिती पोलिस तपासानंतर पुढे येईल. सोनू हा आधी एका संघटनेत काम करायचा. त्यामुळे समाजात त्याची पकड आहे. तसेच मित्रपरिवारही मोठा आहे. वादग्रस्त भूमिकेमुळे अलीकडेच त्याला संघटनेतून काढण्यात आले. त्याची समाजातील पकड सैल झाली. त्यामुळे त्याला काहीतरी नवीन करायचे होते. त्यासाठी त्याने फरार झालेल्या मित्राकडे पिस्तूलची मागणी केली. कारण तो पोलिस अभिलेखावर आहे. तसेच त्याची इतर गुन्हेगारांशी ओळख असल्याने पिस्तूल कुठून मिळू शकेल, याबाबत त्याला माहित होते. त्याने परप्रांतात संपर्क साधून पिस्तूल मागवली. 25 जूनच्या रात्री पिस्तूलसह काडतुसे येणार असल्याची गोपनीय माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रवीण काळे यांना मिळाली. खात्रीलायक माहिती असल्याने काळे यांच्यासह पथकाने नवीन आरटीओ परिसरात सापळा रचला. त्याच वेळी मुसळधार पाऊस सुरू झाला. मात्र, पोलिस दबा धरून बसले होते. मध्यरात्री 3 इसम एका मोटारसायकलवरून संशयास्पदरित्या जाताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबण्याचा इशारा दिला. मात्र त्यांनी पळ काढला.

# वैद्यकीय क्षेत्रातील नव्या संशोधनांचे रुग्णसेवेत मोठे योगदान : नितीन गडकरी




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

कुठल्याही क्षेत्रात एकात्मिक विकास अत्यंत महत्त्वाचा आहे आणि त्यासाठी त्या क्षेत्रात नवनवे संशोधन खूप आवश्यक आहे. वैद्यकीय क्षेत्रात देखील नव्या संशोधनांनी रुग्णसेवेत मोठे योगदान दिले आहे, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज (शुक्रवार, दि. २७ जून २०२५) केले.

महाराष्ट्र अकेडेमी ऑफ पीडियाट्रिक न्यूरॉलॉजी व इंडियन एपिलेप्सी सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नॅशनल पीडियाट्रिक एपिलेप्सी कॉनक्लेवचे उद्घाटन नितीन गडकरी यांच्या हस्ते

## नॅशनल पीडियाट्रिक एपिलेप्सी कॉनक्लेव उद्घाटन

झाले. त्यावेळी ते बोलत होते. रामदासपेठ येथील हॉटेल सेंटर पॉईंटमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला डॉ. प्रमोद गिरी, डॉ. लोकेंद्र सिंग, डॉ. अमरजित वाघ, डॉ. वानखेडे, डॉ. विनयन, डॉ. विलास जाधव आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

नितीन गडकरी म्हणाले, नागपूर हे देशाच्या हृदयस्थानी आहे आणि नागपुरात पीडियाट्रिक न्यूरॉलॉजी या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर कॉन्कक्लेव होत आहे, याचा मनापासून आनंद आहे. अद्ययावत तंत्रज्ञान-विज्ञानाचा वापर वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वाचा ठरत आहे.

वैद्यकीय विज्ञानात होत असलेले नवनवे संशोधन आणि डॉक्टरांचा अनुभव यांचे अनेक असाध्य आजारांवरील उपचारात मोठे योगदान ठरत आहे.

नागपूरसारख्या ठिकाणी अत्यंत महत्त्वाच्या विषयावर कॉन्फरन्स आयोजित करणे कौतुकास्पद आहे. कारण नागपूर आता हेल्थ हबच्या दिशेने वाटचाल करीत आहे. देशाच्या हृदयस्थानी असल्यामुळे शेजारच्या राज्यांमधील रुग्ण देखील याठिकाणी उपचारासाठी मोठ्या प्रमाणात येतात, याचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केला.

भविष्याचा वेध घेऊन केलेले संशोधन कुठल्याही क्षेत्रात महत्त्वाचे ठरते. वैद्यकीय क्षेत्रातही याचीच गरज आहे आणि त्यादृष्टीनेच देशात काम सुरू आहे, असे सांगतानाच अमेरिका आणि युरोपमध्ये भारतीय डॉक्टरांनी खूप नाव कमावल्याचा अभिमान असल्याचेही नितीन गडकरी म्हणाले.

# आदिवासी भागातील शिक्षण दर्जेदार असावे : राज्यमंत्री आशिष जयस्वाल

## बेलदा येथे पालक-विद्यार्थी मेळावा संपन्न




■ महासागर प्रतिनिधी, रामटेक, दि. २७ :

दिनांक २७ जून २९२५ रोजी शासकीय माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय,बेलदा येथे शाळा प्रवेशोत्सव व पालक - बालक मेळाव्यास राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी उपस्थित राहून बालमित्रांना शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना राज्यमंत्री जयस्वाल म्हणाले,"नवीन इमारतीच्या चांगल्या कामाचे कौतुक केले व काही सूचनाही केल्या. सरकारी बांधकामांचा दर्जा उत्तम व्हावा यासाठी आपण कायम आग्रही असतो आणि त्यामुळेच रामटेकमधील सर्व सार्वजनिक बांधकामे व रस्ते यांचा दर्जा उत्तम आहे. या आश्रमशाळेला निधीची तरतूद कमी पडू देणार नाही. शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करायला हवेत. संगणकीय शिक्षणासारख्या आधुनिक कौशल्यांचा दर्जेदार पुरवठा होणे अत्यावश्यक आहे. आपल्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उद्या शहरात गेले, तरी ते कुठेही कमी पडता कामा नये, यासाठी योग्य मार्गदर्शन आणि कौशल्यांची गरज आहे.

रामटेक व परिसरातील पर्यटन वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करतो आहे. विद्यार्थ्यांनी देशाचे भविष्य म्हणून महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. समाजासाठी सकारात्मक कार्य करण्याची प्रेरणा शिक्षणातून घ्यावी. ज्ञान, संस्कार आणि सेवाभाव यांची सांगड घालणाऱ्या शिक्षणपद्धतीची गरज आज अधिक भासते असे राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाला सरपंच स्नेहा उमेश भांडारकर, माजी जिल्हा परिषद सदस्या शांताताई कुमरे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेश भांडारकर, आकाश पंधरे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक सतिश छपाणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अंमली पदार्थाविरोधात समाजाने एकत्र यावे : न्यायमूर्ती ए.एम.सईद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

अंमली पदार्थ विकणाऱ्यांवर कारवाई करण्यासोबतच त्याच्या व्यसनामुळे उद्धवस्त झालेल्या लोकांच्या पुनर्वसनावरही लक्ष केंद्रित करणे महत्त्वाचे आहे. एनडीपीएस प्रकरणांमध्ये न्यायपालिकेलाही संवेदनशील राहावे लागेल. हा समाजासाठी मोठा धोका आहे आणि प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन कायदेशीर कारवाई करावी, असे प्रतिपादन राज्य मानवाधिकार आयोगाचे माजी अध्यक्ष आणि न्यायमूर्ती ए.एम.सईद यांनी केले. आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त शहर पोलिसांकडून राबविण्यात येणाऱ्या ऑपरेशन थंडर आणि जनजागृती सप्ताह कार्यक्रमाचा गुरूवारी समारोप झाला. शेवटच्या दिवशी कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रात ते बोलत होते. या चर्चासत्रात न्या. सईद यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेतला होता. सर्वांनी समाजाने अंमली पदार्थाविरुद्ध एकजूट होण्यावर भर दिला. चर्चासत्रादरम्यान माजी महासंचालक भूषण कुमार उपाध्याय म्हणाले की, ही मोहीम येथेच थांबणार नाही याची काळजी घ्या. पहिल्यांदाच अंमली पदार्थाविरुद्ध इतका मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सभागृहातील लोकांची उपस्थिती ही मोहीम अर्थपूर्ण असल्याचे दर्शवित आहे. यासाठी पोलिस आयुक्त सिंगल यांचे अभिनंदन केले पाहिजे. जेव्हा प्रमुख एखाद्या कारवाईत भाग घेतात तेव्हा सैन्याचे मनोबल वाढते आणि कारवाई यशस्वी होते. केवळ ड्रग्ज विकणाऱ्यांवर कारवाई करून ही समस्या सुटणार नाही. आता पोलिसांनी ड्रग्ज पुरवठा साखळी थांबवण्यासाठी सज्ज व्हावे. हे व्यसन समाजापासून दूर ठेवणे ही सर्व नागरिकांची जबाबदारी आहे. जनजागृती करूनच समाजाला याच्याशी जोडता येईल.

अँटी ड्रग्ज टास्क फोर्सचे प्रमुख आयपीएस अधिकारी शारदा राऊत, एनडीआरएफ अकादमीचे संचालक हरिओम गांधी, एसीबीचे अतिरिक्त संचालक शशांक शेवहरे, एडीजी कारागृह सुहास वारके, जिल्हा अधिकारी विपिन इटनकर, एम्सचे सीईओ प्रशांत जोशी, व्यसनमुक्ती योद्धा नितीन घोरपडे, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. सुधीर भावे, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित देओल, महापालिका आयुक्त अभिजित चौधरी, माजी क्रिकेटपटू प्रशांत वैद्य, सामाजिक कार्यकर्ते वासंती देशमुख, जिल्हा परिषदेचे सीईओ विनायक महामुनी, आयजी एएनओ संदीप पाटील, आयजी रेंज दिलीप भुजबळ पाटील आणि इतर वक्त्यांनी ड्रग्जच्या समस्येशी संबंधित विविध मुद्द्यांवर आपले विचार व्यक्त केले.

# एपीआय विदर्भ चॅप्टर तर्फे भव्य प्रतिष्ठापना समारंभ आणि वैज्ञानिक कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

असोसिएशन ऑफ फिजिशियन्स ऑफ इंडिया (एपीआय) विदर्भ शाखेतर्फे रविवार दिनांक २९ जून रोजी संस्थेचा प्रतिष्ठापना दिन साजरा केला जात आहे. यानिमित्त शैक्षणिक उत्कृष्टता, अंतर्दृष्टीपूर्ण चर्चा आणि समुदाय पोहोच या उद्देश्याने काही वैज्ञानिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ए.पी.आय., मुंबईचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद नाडकर, जे.ए.पी.आय., मुंबईचे मुख्य संपादक डॉ. मंगेश तिवस्कर, महा-आर.एस.एस.डी. आय., नाशिकचे माजी अध्यक्ष डॉ. नारायण देवगावकर यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच राष्ट्रीय ए.पी.आय., मुंबईचे सरचिटणीस डॉ. आगम व्होरा, कन्सल्टंट पल्मोनोलॉजिस्ट डॉ. समीर चंद्रात्रे, डॉ. अमित सराफ, डॉ. राकेश भदाडे, डॉ. चरण बढे यांची सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रम सकाळी ८:३० वाजता नोंदणी आणि नाश्त्याने सुरू होईल, त्यानंतर वैज्ञानिक कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप खारकर यांच्या नेतृत्वाखाली एक समृद्ध वैज्ञानिक कार्यक्रम आयोजित केला जाईल, उच्च रक्त शर्करा व्यवस्थापन या विषयावरील अतिथी व्याख्याने, डॉ. मिलिंद नाडकर, डॉ. अगम व्होरा आणि इतरांसारख्या प्रख्यात पॅनेलच्या सदस्यांसह नवीनतम अमेरिकन मधुमेह संघटना एडीएफ मार्गदर्शक तत्त्वांवर पॅनेल चर्चा होईल.



**नागपूर :** भगवान जगन्नाथाची रथयात्रा आजपासून सुरू झाली असून, देशाच्या विविध भागात विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. नागपूर येथेही रथयात्रा काढण्यात आली होती. शेकडोच्या संख्येने भाविक या रथयात्रेत सहभागी झाले होते.

# मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के अनुदानावर ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांचा पुरवठा करण्याची योजना सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येते. अटी व शर्तीप्रमाणे मिनी ट्रॅक्टर योजनेसाठी पात्र ठरलेल्या बचत गटांना वाटप करण्यात येणार आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटातील सदस्य हे महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत. स्वयंसहाय्यता बचत गटातील किमान ८० टक्के सदस्य हे अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील असावेत. मिनी व त्याची उपसाधने यांच्या खरेदीची कमाल मर्यादा ३.५० लाख रुपये इतकी राहील. स्वयंसहायता बचत गटांनी वरील कमाल मर्यादेच्या रक्कमेच्या १० टक्के स्वहिस्सा भरल्यानंतर ९० टक्के (कमाल ३.१५ लाख रुपये) शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील बचत गटांची निवड केल्यानंतर लाभार्थी बचत गटाने किमान ९ ते १८ अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करावी. परंतु जे लाभार्थी बचत गट मंजूर अनुदानाव्यतिरिक्त अधिक अश्वशक्तीचा मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने यांची खरेदी करु इच्छित असतील, अशा पात्र ठरलेल्या बचत गटांना ते खरेदी करता येतील. या योजनेअंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने त्यांना देण्यात आलेला मिनी ट्रॅक्टर इतर शेतकऱ्यांना भाडेतत्वावर देऊ शकेल.

# गोवंशाने भरलेला ट्रक पकडला

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

हिंगणा पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर समृद्धी महामार्गावर गोवंशाने भरलेला ट्रक पकडला. चौकशीत गोवंशांना कत्तलीसाठी घेऊन जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी या प्रकरणात गुन्हा नोंदवून एकाला अटक केली. अब्दुल कलाम अब्दुल सुभान (45) रा. कोळसा टाल, कामठी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

बुधवारी रात्री पोलिस पथक परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान एमएच-40/सीडी-5314 क्रमांकाच्या ट्रकमध्ये गोवंशांना कोंबून समृद्धी महामागनि कत्तलखान्यात नेले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी वडगाव गुजर परिसरात सापळा रचून वरील नंबरचा ट्रक पकडला. झडतीदरम्यान ट्रकमध्ये 20 गोवंश मिळाले. त्यांना क्रुरतेने कोंबण्यात आले होते. त्यांच्या चारा आणि पाण्याचीही व्यवस्था तेथे नव्हती. काही गोवंशांची स्थिती गंभीर होती. पोलिसांनी तात्काळ सर्वांची सुटका करून त्यांची रवानगी गोरक्षणकडे केली. आरोपीविरुद्ध प्राणी क्रुरता आणि प्राणी संरक्षण अधिनयमाच्या कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

# अग्निशमन दलात अत्याधुनिक ८ नवीन फायर टेंडर दाखल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत शहरातील आगीच्या घटनांवर अधिक प्रभावीपणे नियंत्रण मिळवण्यासाठी विविध क्षमता असलेले ८ नवीन फायर टेंडर अग्निशमन ताफ्यात दाखल झाले आहे. तर उर्वरीत ६ मिनी फायर टेंडर लवकरच सेवेत दाखल होणार आहेत. शहरात नव्याने सुरू झालेल्या वाठोडा, पुनापूर व पाचपावली अग्निशमन केंद्राकरीता १४ नवीन अग्निशमन गाड्या (फायर टेंडर) सेवा देणार आहेत. यामुळे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या क्षमतेत लक्षणीय वाढ झालेली आहे. उंच तसेच दूरवरून पाण्याचा मारा करून आग तात्काळ नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश मिळणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच या फायर टेंडरचे लोकार्पण झाले. यावेळी राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. अतिरिक्त आयुक्त अजय चारठाणकर यांच्या



मार्गदर्शनाखाली मुख्य अग्निशमन अधिकारी तुषार बाराहाते यांच्या नेतृत्वात अग्निशमन विभागाचे आधुनिकीकरण केले जात आहे. या अंतर्गत नवीन फायर टेंडर अग्निशमन दलात दाखल झाल्याने अग्निशमन विभागाला अधिक बळ मिळाले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन व आपत्कालिन सेवा विभागाने खरेदी केलेल्या १४ फायर टेंडरमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या आणि क्षमतांचा समावेश आहे. याची किंमत १६ कोटी ४९ लाख रुपये इतकी आहे. १६ हजार लिटर पाणी वाहून नेण्याची क्षमता असलेले ५ वॉटर बाउजर खरेदी करण्यात आले आहे. यामध्ये १००० फूट अंतरापर्यंत पाण्याचा मारा करण्याची सुविधा आहे. ३५ फूट उंच शिडी, आवश्यक साहित्याने सुसज्ज साहित्यामुळे आगीवर नियंत्रण आणणे सोपे जाणार आहे. याशिवाय ५ हजार लिटर पाणी वाहून नेण्याची क्षमता असलेले ३ फायर टेंडर खरेदी करण्यात आले आहे. जवळपास १००० फूट पाईप तसेच ३५ फूट उंच शिडी, आवश्यक साहित्याने सुसज्ज अशी हे फायर टेंडर आहे. तर ६ मिनी फायर टेंडरची पाणी वाहून नेण्याची क्षमता २ हजार लीटर एवढी आहे. हे मिनी फायर टेंडर खरेदी करण्यात आले आहे. ५०० फूट पाईप, ३५ फूट उंच शिडी, आवश्यक साहित्याने सुसज्ज अशी मिनी फायर टेंडर आत लहान अरुंद रस्त्यामध्ये जात असते.

शहराच्या वर्दळीच्या ठिकाणी, बाजारातील अरुंद रस्ते असलेल्या वस्त्यातील आगीच्या घटना नियंत्रणात आणण्यासाठी हे फायर टेंडर अग्निशमन विभागाच्या ताफ्यात दाखल झाले आहे. वेगाने होणारे शहरीकरण आणि वाढत्या उंच इमारती यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या अग्निशमन विभागाला उभारी देण्याचा प्रयत्न मनपा प्रशासनाकडून केला जात आहे. अत्याधुनिक फायर टेंडरमुळे अग्निशमन विभाग सक्षम बनला आहे. वेगाने वाढणाऱ्या शहरात या नवीन फायर टेंडरमुळे आगीच्या घटना आटोक्यात आणण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येणार आहे.

अग्निशमन विभागाच्या नव्या 22 अग्निशमन केंद्राचा मास्टर प्लानमध्ये प्रामुख्याने गगनचुंबी इमारतींवर सेवा पोहोचविण्यासाठी अग्निशमन विभागाने फिनलॉण्ड येथून १३ कोटी१५ लाख रुपयांत ७० मीटर हॅड्रोलिक प्लॅटफॉर्म मशीन खरेदी केली असून, लवकरच ही यंत्रणा अग्निशमन दलाच्या ताफ्यात येणार आहे. या नव्या यंत्रणेमुळे आता शहरातील एखाद्या ७० मीटर पर्यंत इमारतीतील आग नियंत्रणात आणता येईल. तसेच आपत्कालीन स्थितीमध्ये या मजल्यावरील नागरिकांना सुरक्षितपणे खाली आणता येईल. सध्या अग्निशमन विभागाकडे ४२ मीटर उंचीची १ टर्न टेबल लॅडर (टीटीएल) व ३२ मीटर उंचीची हॅड्रोलिक प्लाटफॉर्म (एचपी)मशीन, २ रॅपिड इंटरवेंशन व्हेइकल (आरआयवी),१ क्विक रिस्पॉन्स व्हेईल (क्युआरवी) आणि ४ बूलेट फायर फायटिंग बाईक सेवेत आहे. मनपाकडे १६हजार लिटरचे ७ वॉटर ब्राऊजर, ५ हजार लिटरचे १४ फायर टेंडर, ३हजार लिटरचे ४ मीनी फायर टेंडर असून यातील २ मिनी फायर टेंडर डम्पींग यार्डमध्ये आगीच्या घटना आटोक्यात आणण्यासाठी देण्यात आलेल्या आहेत. याशिवाय २ हजार लिटरचे ४ मिनी टेंडर सेवेत आहे. उर्वरीत २हजार लिटरचे ६ मिनी फायर टेंडर लवकर सेवेत दाखल होणार आहे.

## अग्निशमन केंद्रांची संख्या पोहोचणार २२ वर

शहराच्या लोकसंख्येनुसार महानगरपालिकेचे १२ अग्निशमन केंद्र कार्यरत आहेत. नुकतेच पाचपावली अग्निशमन केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. तसेच जुने अग्निशमन केंद्रांचे नूतनीकरण देखील या वर्षात होईल. आणखी १० अग्निशमन केंद्रे उभारण्यात येणार आहे. यात बजाजनगर, अंबाझरी, नरसाळा, मानेवाडा, चिंचभवन, दाभा, वायुसेनानगर, ठाकरे लेआऊट, वांजरा व वांजरी या भागांमध्ये नवी अग्निशमन केंद्रे उभारण्यात येणार आहे. यानंतर शहरातील एकूण अग्निशमन केंद्रांची संख्या २२ वर पोहोचणार असून प्रक्रिया सुरु लकडगंज येथे नव्या अग्निशमन केंद्राच्या बांधकामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून अत्याधुनिक सुविधायुक्त या अग्निशमन केंद्राच्या बांधकामावर १४.८९ कोटी खर्च करण्यात येणार असून प्रशासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच सध्या प्रशासनाने अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेता व अतिवृष्टी कालावधीची दखल घेत प्रशिक्षीत 68 अग्निशमन विमोचक/ इनर्टन्स 4 महिन्याच्या कालावधी करिता विशेष मानधनावर नियुक्त केले आहे.

# विवाह करणाऱ्या दाम्पत्यांकरीता कन्यादान योजना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांकरीता कन्यादान योजना सन २००३ पासून सुरु करण्यात आली आहे. या योजनेतर्गत सामुहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या वधूच्या पालकास २५ हजार व संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे चार हजार रुपये अनुदान देण्यात येते.

या योजनेंतर्गत २०२५-२६ वर्षाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. सामूहिक विवाह सोहळ्यात भाग घेऊन विवाह करणाऱ्या दाम्पत्यांनी सहाययक आयुक्त समाज कल्याण नागपूर कार्यालयाकडे सामूहिक विवाह सोहळा आयोजित करणाऱ्या संस्थेमार्फत आवश्यक कागदपत्रांसह ३० जूनपर्यंत अर्ज सादर करावे असे कळविण्यात आले आहे.

या संदर्भात समाज कल्याण विभागाच्या संकेतस्थळावर यासंबंधी सखोल माहिती उपलब्ध आहे. लाभार्थ्यांनी वेळेपुर्वीच अर्ज सादर केल्यास या योजनेंतर्गत लाभ मिळू शकतो. यासाठी कुठल्याही आमिषाला बळी न पडता लाभार्थ्यांनी थेट संपर्कही साधल्यास माहिती देण्याची व्यवस्था आहे.

अर्ज कसा करावा :- १) ज्या सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये विवाह करावयाचा आहे त्या संस्थेमध्ये शासन निर्णयात दिलेल्या अर्जाच्या नमुन्यानुसार शासन निर्णयात नमूद निकषानुसार परिपूर्ण अर्ज सादर करावा. सदर संस्थेमार्फत एकूण प्राप्त अर्ज विवाह संपन्न होण्याच्या १५ दिवस अगोदर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सफाई कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. २७ :

नगरपरिषद वानाडोंगरी आणि सहयोगी संस्था फीडबॅक फॉउंडेशन, गोदरेज, यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि. 27 जून 2025 रोजी बाबडे सभागृह येथे सफाई कर्मचारी यांच्यासाठी नगरपरिषदनगर परिषद वानाडोंगरी मुख्यअधिकारी राहुल परिहार यांच्या मार्गदर्शना खाली ही कार्यशाळा पार पडली. सफाईकर्मचारी यांचे क्षमता विकास आणि संवर्धन एक महत्वपूर्ण पायरी आहे. ज्यामुळे त्यांचे कौशल्य आणि ज्ञान वाढविण्यासाठी मदत होऊ शकते ज्याचा उपयोग सफाई मित्रा ची क्षमता विकास झाल्यामुळे आधिक प्रभावी कार्य होण्यायास मदत होईल.

प्रशिक्षण आणि विकास, सुरक्षा उपकरण सफाई कर्मचारी यांना आवश्यक सुरक्षा उपकरण उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. स्वास्थ्य आणि सुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत गरजेचे आहे. सफाईमित्र यांच्या साठी कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करून त्याच्या कार्यात अधिक कुशलता निर्माण करणे, यासाठी सामुदायिक भागीदारी, सामुदायिक जागरूकता वाढविण्यासाठी सफाईकर्मीचे महत्व पटवून देण्यासाठी जागृती होणे गरजेचे आहे. या प्रयासा मुळे सफाईकर्मि ची क्षमता संवर्धन आणि क्षमता विकास एक महत्वपूर्ण भूमिका निभाऊ शकते. आणि त्यांचे अधिक प्रभावी कार्य होण्यासाठी मदत होऊ शकते.

सफाई कर्मचारी महत्वाचे घटक असल्यामुळे त्यांनी सुरक्षा उपकरणा चा वापर करणे याबद्दल प्रोत्साहित करणे. कौशल्य विकास कार्यक्रम आयोजित करणे. समर्थन और प्रोत्साहन सफाई मित्र यांना नेहमी आत्मविश्वास टिकून राहण्यासाठी सतत प्रोसाहन देणे आणि त्याचे मनोबल वाढविण्यासाठी त्याना विविध प्रकारचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे ज्यातून त्यांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य उत्तम राहील.

आरोग्य आणि कल्याण कारी योजना याबद्दल मार्गदर्शन करणे आणि अति आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे. सफाई कर्मचारी क्षमता विकास कार्यशाळेसाठी मार्गदर्शन सविता गजभिये, हिमांशू यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन शहर समन्वयक आचल चव्हाण, यांनी केले, कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर मुख्याधिकारी राहुल परिहार, पाणी पुरवठा व स्वच्छता अभियंता निलेश नंदनवार, प्रशासकीय अधिकारी प्राची लांजेवार, कपिल डाफे, सोनाली राऊत,हरिश्चंद्र बारंगे,किरण रोंगे,इतर सर्व अधिकारी कर्मचारी तसेच सफाई कर्मचारी, आणि फीडबॅक फॉउंडेशन गोदरेज उपस्थित होते.

## समाज कल्याण उपायुक्तांची ज्येष्ठांनी घेतली भेट

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

राजश्री छत्रपती शाहू महाराज एक महान समाज सुधारक होते. शिक्षा, सामाजिक न्याय आणि समानतेसाठी त्यांचे मोलाचे योगदान आहे. १८९४ ते १९२२ या त्यांच्या शासन काळात त्यांनी अनेक सामाजिक सुधारणा केल्या. अशा महान समाज सुधारकांची जयंती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग विभागाच्या वतीने सामाजिक न्याय दिन म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऑडीटोरियम, दिक्षाभूमि येथे साजरी करण्यात आली. यावेळी समाज कल्याण विभागाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यालय, महाविद्यालयीन विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त डॉ. सिद्धार्थ गायकवाड यांची ज्येष्ठ नागरिकांनी भेट घेतली व ज्येष्ठांच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले.

## दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या इतवारी-छिंदवाडा-सिवनी रेल्वे खंडावर ट्रॅक संरचना व प्रवासी सुविधांचा तपासणी दौरा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री दीपक कुमार गुप्ता यांनी दिनांक 27 जून 2025 रोजी इतवारी-छिंदवाडा-सिवनी रेल्वे खंडाचा विंडो ट्रेलिंग निरीक्षण दौरा केला. ट्रेन्सच्या सुरक्षित व सुरळीत वाहतुकीची खात्री, विकासकामांची प्रगती आणि प्रवासी सुविधांचा आढावा घेणे या उद्देशाने हा दौरा करण्यात आला. निरीक्षणाची सुरुवात सकाळी 07.30 वाजता नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी स्थानकावरून विशेष निरीक्षण यान (स्पीक) द्वारा झाली.

निरीक्षणादरम्यान विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी खापरीखेडा, सौसर, सावनेर, लिंगा आदी स्थानकांची पाहणी केली, ट्रॅक व रेल्वे संरचना यांची स्थिती तपासली तसेच छिंदवाडा व सिवनी स्थानकांचे सविस्तर निरीक्षण केले. छिंदवाडा येथे रेल्वे हॉस्पिटल, लॉबी, रनिंग रूम यांचाही तपशीलवार आढावा घेण्यात आला आणि रनिंग स्टाफसाठी उपलब्ध सुविधांची पाहणी करण्यात आली.

यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापक आणि इतर अधिकारी यांच्या उपस्थितीत स्वच्छ व हरित पर्यावरणाच्या दिशेने पावले उचलत स्थानक परिसरात व्यापक वृक्षारोपण करण्यात आले. या निरीक्षणामध्ये संबंधित शाखांचे वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

निरीक्षणाचा प्रमुख हेतू म्हणजे रेल्वे ऑपरेशन, सुरक्षा, संरक्षा आणि कर्मचाऱ्यांच्या कल्याणाशी संबंधित सुविधा तपासून त्यात आवश्यक सुधारणा सुनिश्चित करणे हा होता. यावेळी विभागीय रेल्वे व्यवस्थापकांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रवासी व रनिंग स्टाफ/रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निर्देश दिले.

तसेच, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संवेदनशील ठिकाणांची ओळख करून संभाव्य अडचणी दूर करण्यासाठी आणि अतिवृष्टी किंवा आपत्तीजनक परिस्थितीत तात्काळ प्रतिसाद देण्यासाठीही अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

# वाडीत बहि:श्रवण दिनानिमित्त जनजागृती



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २७ :

येथील मानव विकास फाऊंडेशन आणि सरोजिनी पब्लिक स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हेलेन केलर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये बहि:श्रवण व बहुविकलांग बाबत जनजागृती करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्ये बहि:श्रवण म्हणजे काय, अशा व्यक्तींच्या अडचणी काय असतात आणि आपण त्यांना मदतीचा हात कसा देऊ शकतो, हे समजावणे होता. विशेष शिक्षक जितेश ठाकरे यांनी बहि:श्रवण म्हणजे काय, त्यांच्याशी संवाद साधताना काय लक्षात घ्यावे, याबाबत माहिती दिली.

विशेष शिक्षक ऐश्वर्या पाटील व शिक्षिका अंकिता मेश्राम यांनी विद्यार्थ्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधून क्रियाकलाप घेतल्या. कार्यक्रमाचे आयोजन मानव विकास फाऊंडेशनचे प्रकल्प समन्वयक श्रुतिका अंजनकर यांनी केले. संचालन शिक्षिका माधुरी फुलझेले यांनी तर आभार जया सावरकर यांनी मानले. यावेळी सरोजिनी पब्लिक स्कूलचे संचालक शशिधर पाडिगला, मुख्याध्यापिका जसिंता मॅथ्यू व्यावसायिक प्रशिक्षणकर्ता राहुल कांबळे, विशेष शिक्षक निखिल बागडे उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सहानुभूती, समज, आणि समावेशाचा संदेश पोहोचवण्यात यश आले.

# जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त डी.वाय.एफ.आयचे जनजागृती अभियान




■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २७ :

डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया च्या वतीने जागतिक अमली पदार्थ विरोधी दिनाच्या निमित्ताने रामटेक येथे जनजागृती अभियान राबविण्यात आला.

दरवर्षी २६ जून हा जागतिक अमली पदार्थ विरोधी दिन जगभरात साजरा केला जातो. या दिनानिमित्त जगभरातील विविध देशात अमली पदार्थांच्या तस्करी विरोधात व व्यसनमुक्त समाज घडवण्याचा उद्दिष्टाने जनजागृती केली जाते. गेल्या काही दशकात संपूर्ण भारतात अमली पदार्थांची तस्करी व अमली पदार्थाचा सेवनात अभूतपूर्व वाढ झाली आहे.

विशेषतः तरुण या अमली पदाथार्चे बळी पडत आहेत. यामुळे एकीकडे तरुणांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर दुषप्रभाव पडत आहे तर दुसरीकडे अमली पदार्थाच्या तस्करीच्या पैसा हा दहशतवादी संघटनेला मिळत असल्याने ते देशासमोर नवीन आव्हान उभे करत आहेत.

त्यामुळे सामान्य जनतेने या विरोधात उभे राहावे असे आवाहन डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया चा वतीने जनजागृती मोहिमाच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष, अमित हटवार, अभिजित रामटेके, उमेश तुमडाम यांनी केले आहे.

त्याचप्रमाणे यामाध्यमातून सरकारने ही या अमली पदार्थांची प्रामाणिकपणे तस्करी रोखली पाहिजे अशी मागणीही केली आहे.

# आश्रिता महिला मंडळाच्या रौप्य महोत्सवी कार्यक्रमाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

आश्रिता महिला मंडळ येत्या शनिवार दिनांक ५ जुलै रोजी २५ वर्षे पूर्ण करत आहे. मंडळाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त हॉटेल अशोक, लक्ष्मीनगर चौक येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात मुख्य आकर्षण आणि विशेष अतिथी म्हणून अभिनेत्री रेणूका शहाणे यांची उपस्थिती राहणार आहे. यासोबतच प्रमुख अतिथी म्हणून शहरातील प्रसिद्ध नाटककार व दिग्दर्शक प्रभा देऊस्कर यांची उपस्थिती राहणार आहे. आश्रिता महिला मंडळ ही संस्था मागील २५ वर्षापासून सेवा परमो धर्मः या ब्रीदवाक्यानुसार सातत्याने महिलांसाठी कार्य करत आहे.

महिलांच्या सामाजिक प्रश्नांवर, महिला सक्षमीकरणासाठी या संस्थेमार्फत अनेक उपाययोजना वर्षभर आयोजित करण्यात येत असतात.

महिलांना प्राथमिक शिक्षण, रोजगार तसेच स्वयंरोजगार आणि आरोग्य यासारख्या प्राथमिक गरजांसाठी ही संस्था कार्य करत आहे. संस्थेमार्फत यंदा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना रजत गर्विता पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. या रौप्य महोत्सवी कार्यक्रमात प्रमुख पाहूणे म्हणून रेणूका शहाणे उपस्थित राहणार असून त्या उपस्थित महिलांशी संवाद साधणार आहे. तसेच नागपुरातील प्रसिद्ध नाटककार प्रभाताई देऊस्कर या देखील याप्रसंगी मार्गदर्शन करणार आहे.

या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा विलासीनी नायर यांनी केले आहे. यासंदर्भात आयोजित पत्रपरिषदेला संस्थेच्या उपाध्यक्ष अनिता बोस, महासचिव डिनी मेनन, सचिव भारती डिसावल, निलम शुक्ला, समन्वयक प्रभा देऊस्कर उपस्थित होत्या.

## आरटीओचे सर्व्हर वारंवार चालू बंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

शिकाऊ परवाना काढण्यासाठी आरटीओच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. या संकेतस्थळावर परीक्षा देत असताना सर्व्हर वारंवार बंद होत असल्याने परीक्षार्थींना विनाकारण मनसंताप सहण करावा लागतो. यासंदर्भात महाराष्ट्र परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रारी केल्यानंतरही सर्व्हर बंद होण्याचा प्रकार अनेक दिवसांपासून कायम आहे. मुख्यतः शिकाऊ (लर्निंग) लायसन्ससाठी (परवाना) गिरीपेठ येथील मुख्य आरटीओ कार्यालयात परीक्षा देण्यासाठी कक्ष तयार आले आहे. आरटीओच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन परीक्षा घेत असताना नव्या परीक्षाथीर्ला योग्य मार्गदर्शन न करताच संगणकावर बसविल्या जाते. अशावेळी नवख्या परीक्षाथीर्ने कधीच संगणक हाताळलेले नसल्यास परीक्षा देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.आरटीओचे पूर्णतःदुर्लक्ष शिकाऊ परवान्याच्या परीक्षेत बहुपयार्यी १५ प्रश्नांचे उत्तर देत असताना मध्यल्या वेळेत केव्हाही सर्व्हर बंद होत परीक्षार्थींना पुन्हा परीक्षा द्यावी लागते. महाराष्ट्र विभागाने ड्रायव्हिंग लायसन्स देण्यासाठी ऑनलाइन परीक्षेची व्यवस्था केली.

# बोरीपहिलेपार जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांचे ट्रॅक्टर मधुन पडले पहिले पाऊल



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. २७ :

नागपूर तालुक्यातील बोरखेडी ( रेल्वे ) केंद्रातील पीएम श्री उच्च प्राथमिक शाळा बोरीपहिलेपार शाळेतील विद्यार्थ्यांनी ट्रॅक्टर मधुन टाकले पहीले पाऊल. यावेळी शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महिला व बालकल्याण जि. प. नागपूर चे उप कार्यकारी अधिकारी डॉ. कैलाश घोडगे तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख प्रकाश सव्वालाखे,व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रवीण सातपैसे, उपाध्यक्ष बंडू तुमडाम,सदस्य संजय ठाकरे उपस्थित होते.

प्रवेश उत्सवानिमित्त विद्यार्थ्यांची ट्रॅक्टर वरून ढोल ताशांच्या गजरात प्रभात फेरी काढण्यात आली. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच पाठ्यपुस्तक गणवेश बूट मोजे यांचे वाटप करण्यात आले. प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक नामदेव नागरगोजे यांनी केले. संचालन शिक्षिका शितल ब्राह्मणकर यांनी तर आभार शिक्षिका भारती गिरी यांनी मानले. आयोजनासाठी प्रमिला मोरे, अनूरमा कांबळे, मीना पावडे , प्रीती घायवट, गंगा वाघमारे,मीना मेश्राम,जयश्री वाठोरे, प्रेषिता हनवते, मिलींद जाधव, स्नेहा पानबुडे, नरेंद्र पिंपळे आदींनी सहकार्य केले.

## साई इंटरनॅशनल स्कुल येथे वसुंधरा दिनानिमित्त आमची पृथ्वी,आमचे भविष्य



■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. २७ :

साई इंटरनॅशनल स्कूल, शितलवाडी, रामटेक यांनी आर्ट फॉर चेंजः आमची पृथ्वी, आमचे भविष्य आयोजित केले. हे युनायटेड स्कूल्स ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी वसुंधरा दिनानिमित्त आयोजित केले होते.

१२३ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग घेतला. सर्व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

आदिश्री दुर्गेश चौरसिया, नील विवेक झेलपेलवार, स्वरा रेवनाथ मदनकर आणि वेदश्री व्ही उपासे यांना सर्वोत्कृष्ट प्रवेश शाळा स्तर आणि शाळेचे वरिष्ठ प्राचार्य राजेंद्र मिश्रा यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शाळेचे संचालक डॉ.व्ही.बी.नागपुरे यांनी सर्व उत्कृष्ठ यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल अभिनंदन केले.

# बहादूरात सौर प्रकल्पाचे उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. २७ :



नागपूर शहराच्या सीमेवर असलेल्या बहादुरा नगर पंचायत कार्यालयात २५ किलोवॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला. नगर पंचायत बहादुराचे मुख्याधिकारी आणि प्रशासक राजेंद्र चिखलखुंडे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. साई सन एनर्जी द्वारे हा सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला. त्यामुळे नगर पंचायत कार्यालयात सौर ऊर्जेपासून मोठ्या प्रमाणात वीज वापरली जाईल. यावेळी प्रशासकीय अधिकारी सागर ठाकरे, विद्युत अभियंता मिलिन पाटील, कर निरीक्षक साहस कनार्ळे, शहर अभियंता अक्षय झिरपे, लेखापाल प्रसाद कोरमकर, डिझाइन सहाय्यक रवी हिरुरकर, लेखापरीक्षक वैभव किटुकले, अजय भोयर, सुमित गव्हाळे, जीवन बावणे, पियुष सेलोकर आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४५ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :



नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, 79 मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई केली जात आहे. )शुक्रवार (ता.27) रोजी शोध पथकाने 45 प्रकरणांची नोंद करून 49,600/- रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. 400/- दंड) या अंतर्गत 17 प्रकरणांची नोंद करून 6,800/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/- दंड) या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 100/- रुपयांची वसुली करण्यात आली.

मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/-रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत 08 प्रकरणांची नोंद करून 21,500/- रुपयांची वसुली करण्यात आली. रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी जनावरे/ वाहने धुवून परिसर अस्वच्छ करणे या अंतर्गत 01 प्रकरणाची नोंद करून 1000/- रूपयांची वसुली करण्यात आली. चिकन सेंटर, मटन विक्रेता यांनी त्यांचा कचरा रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी टाकणे या अंतर्गत 05 प्रकरणांची नोंद करून 5,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावू कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत 01 प्रकरणांची नोंद करून 2,000/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास 21 प्रकरणांची नोंद करून 4,200/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास 07 प्रकरणांची नोंद करून रु.7,000/- चे दंड वसूल करण्यात आलेला आहे.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. स्काय लाईन रियालिटी यांच्यावर बांधकामाचे साहित्य रस्त्यालगत टाकल्याबद्दल रु. 10,000/- चे दंड वसूल करण्यात आले.

**कोर्ट विद्यमान तहसिलदार, नरखेड यांचे कार्यालय ता. नरखेड जि. नागपूर**

दुरध्वनी क्र.०७१०५-२३२२०६ Email ID- tahsildarnarkhed1@gmail.com

क.म.स./प्र-२/ना.तहन/कावि- २१०/२०२५ दिनांक २०/०६/२०२५

प्रति,
१ पोलीस स्टेशन अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा
२ तलाठी, मौजा भिष्णूर ता. नरखेड, जि. नागपूर.
३ ग्रामपंचायत भिष्णूर

विषय - जन्म / मृत्यु प्रकरणात अहवाल सादर करण्याबाबत.

संदर्भ - अर्जदार श्रीमती अरुणा लक्ष्मण गौरखेडे रा. भिष्णूर तह. नरखेड जि. नागपूर यांचा अर्ज

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुशंगाने कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती अरुणा लक्ष्मण गौरखेडे रा. भिष्णूर तह. नरखेड जि. नागपूर यांनी त्यांची आजी सासु सखुबाई नारायन गौरखेडे व त्यांचे सासरे नामदेव नारायन गौरखेडे यांचा मृत्यु मौजा भिष्णूर येथे अनुक्रमे दिनांक २९/०२/१९७१ व २०/१०/१९८७ रोजी झाला असून त्यांचे मृत्युची नोंद ग्रामपंचायत भिष्णूर तह. नरखेड जि. नागपूर येथे घेण्यात आली नाही. करीता अर्जदाराचे मृत्युची नोंद होण्याबाबत आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

अर्जासोबत प्रतिज्ञापत्र, नमूना १०ब, रेशनकार्ड प्रत, आधारकार्ड ग्रामपंचायत यांचा दाखला इत्यादि कागदपत्रे सादर केलेली आहे.

सबब आपण सखुबाई नारायन गौरखेडे व नामदेव नारायन गौरखेडे यांचा मृत्यु मौजा भिष्णूर ता. नरखेड जि. नागपूर येथे झाला किंवा कसे याबाबत स्थानिक चौकशी करून स्वयंस्पष्ट अहवाल पंचनाम्यासहीत या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

तहसिलदार,
नरखेड

**सायटेशन नोटीस**

**कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कामठी यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. केस नं. ४७/२०२५ पे.ता.: ०५/०८/२०२५
प्रोसेस नं. : ७८१/२०२५ (दि. २४/०६/२५)

अर्जदार : सुरेखा अनित दहाट, रा. पोरवार कॉलेज जवळ, सैलाब नगर, कामठी, जि. नागपूर

----- विरुध्द ----

गैरअर्जदार : कोणीही नाही

मयतदार : १. अंजली अनिल दहाट मयत दि. २१/१२/२०२३ रा. पोरवार कोलेज जवळ, सैलाब नगर, कामठी जि. नागपूर
२. अनिल ताराचंद दहाट मयत दि ०२/०४/२०१६ रा. पोरवार कोलेज जवळ, सैलाब नगर, कामठी, जि नागपूर

सदरहू अर्जदारांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे १८२७ फलम ८ प्रमाणे या न्यायालयात मयतदार १ अंजली अनिल दहाट, मयत दि २१/१२/२०२३, रा. पोरवार कॉलेज जवळ, सैलाब नगर, कामठी, जि. नागपूर यांचे वारसान सर्टीफिकेट मिळण्याकरीता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार मैयताचे वारसान नव्हे, असा कोणाचा उजर असल्यास किंवा हरकत असल्यास त्याने आपला उजर पेशी तारखेचे आत अथवा तारखेवर या न्यायालयात पेश करावा, जर सदरहू मुदतीत सर्व संबंधित नातेवाईकांना व आम जनते कडुन योग्य ती हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास सदरहु न्यायालय अर्जदार यांचा सदरहु मयतदार अंजली अनिल दहाट, मयत दि २१/१२/२०२३. रा पोरवार कॉलेज जवळ, सैलाब नगर, कामठी, जि नागपूर ह्यांचे त्यांना वारसान प्रमाणपत्र देण्यात देईल.

आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## नागपूर मेडिकल कॉलेज ट्रॉमा सेंटरच्या डॉक्टरांवर कारवाई करावी : चंद्रशेखर अरगुलेवार

# निष्काळजीपणामुळे जीव गेला, कुटुंबीयांनी केला आरोप

■ महासागर प्रतिनिधी
कामठी, दि. २७ :

१४ जून रोजी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर बोर्ड टोल नाका डिव्हाईन हॉटेलजवळ नागपूर जबलपूर रोडवर भरधाव कारमुळे किरण गंगाधर शेंडेचा अपघात झाला होता. मृतकचे कुटुंब आणि तेजस संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार यांनी नागपुर मेडिकल महाविद्यालयाचे डीन, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांना तेजस बहुउद्देशीय संस्था तर्फे लेखी तक्रार केली आणि नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या ट्रॉमा सेंटरच्या डॉक्टरवर कठोर कारवाई करण्याबाबत डॉक्टर अविनाश गावंडे वैद्यकीय अधीक्षक यांना निवेदन सादर केले.



१४ जून रोजी कन्हान पोलीस स्टेशन हद्दीतील गांव खंडाळा घटाटे तहसील पारशिवनी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर, कार क्रमांक TC 08/EP 1001 च्या चालकाने दुचाकीला पाठीमागून धडक दिली. या अपघातातील किरण गंगाधर शेंडे गंभीर जखमीं झाला. प्रथम उपचारकरिता मेयो रुग्णालयात नेण्यात आले आणि नंतर मेयो रुग्णालयातून नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये दाखल करण्यात आले. १८ जून रोजी योग्यउपचार नाही भेटल्या मुळे किरण शेंडे यांची मृत्यू झाला. नागपूर जिल्ह्यात आजूबाजूच्या क्षेत्राचे लोक कोणत्याही अपघात आणि उपचारासाठी चंद्रशेखर अरगुलेवार यांना मदत मागत असतात. मृतकयांचे मदतसाठी खंडाळाचे पूर्व सरपंच रवींद्र केने व मृतकच्या लहान भाऊ रपित शेंडे यांनी अरगुलेवारला फोनवर अपघातची जानकारी दिली व मदत मागितली.

१४ जून पासून ट्रामा सेंटर मधे मृतकाला फक्त वेंटीलेटर वर ठेवले होते दूसरा कोणताही उपचार केला नाही. १७ जून रोजी, मृतकची प्रकृती बिघडत असल्याचे पाहून, अरगुलेवारने आपले सोबत मृतकचा लहान भाऊ रतिप शेंडेला घेऊन नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाचे डीनचे पीए डॉ. अक्षय सज्जनवार आणि वैद्यकीय अधीक्षक यांचे कार्यालयामध्ये तक्रार केली. मृतकच्या योग्य उपचार होत नाही, मृतकच्या डाव्या कानात अपघात मुळे मोठी जखम झाली होती. त्या जखमेवर किडे लागले होते, ट्रामा सेंटरचे डॉक्टर लक्ष देत नाहीत आणि ट्रॉमा सेंटरमधील सफाई कामगार तिच्याकडून पैशाची मागणी करत आहे.

मृतकच्या भावाकडून किडे काढण्यासाठी आणि ड्रेसिंगसाठी २०० रुपए मागितले होते. तक्रारीनंतर, प्रकरण वाढत असल्याचे पाहून, मृतकच्या कानातील किडे काढून मलमपट्टी करण्यात आली. परिस्थिती बिकट होत असल्याचे पाहून १७ जून रोजी रात्री दरम्यान ३ वाजता किरण शेंडे यांना मृत घोषित करण्यात आले. आणि मृतकाची बॉडी मरचुरीमध्ये ठेवण्याकरिता ५०० रुपये घेतले अशा प्रकारचा निष्काळजीपणामुळे किरण शेंडेचा जीव गेला हा गरिबावर एक मोठा अत्याचार आहे.

२५ जून २०२५ रोजी, तेजस संस्थेच्या वतीने नागपूर मेडिकल कॉलेजचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अविनाश गावंडे यांना तेजस संस्था तर्फे एक लेखी निवेदन देण्यात आले, ज्यामध्ये मृतकच्या उपचारात निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर आणि पैसे मागणाऱ्या व्यक्तीवर कठोर कायदेशीर कारवाई करून मृताच्या कुटुंबाला न्याय देण्याची मागणी तेजस संस्थे तर्फे करण्यात आली. योग्य कार्यवाही नाही झाली तर राज्याचे मसुहल मंत्री पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे वा राज्याचे मंत्री आशिष जयस्वाल यांना पण निवेदन देऊन न्यायाची मागणी करण्यात येईल यांच्याकडून पण न्याय मिळाला नाही तर तेजस संस्थेच्या वतीने मेडिकल कॉलेजवर एक भव्य मोर्चा काढून आंदोलन करण्याची जानकारी अरगुलेवार यांनी दिली निवेदन देताना तेजस संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर अरगुलेवार, सदस्य अर्जुन उपासे, मृतकाचा लहान भाऊ रपीत शेंडे, मोरेश्वर शेंडे आदी उपस्थित होते.

## २५ सापांच्या पिलांना जिवनदान

■ महासागर प्रतिनिधी
नरखेड, दि. २७ :



नरखेड तालुक्यातील खरसोली गावातील लक्ष्मण वाकडे यांच्या घरा मागील २५ सांपाच्या पिलांचा झुंड आणि ७ फुंटाचा नाग दिसून आल्यास गावकरी नागरिकांनी एकच गर्दी केली.

सर्पेमित्र प्रफुल नारनवरे, श्याम धुर्वे, दिनेश सर्याम, प्रबुद्धा नारनवरे, प्रविन नारनवरे यांना फोन वर माहिती देताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. आणि संपूर्ण सर्पेमित्र टीम घटनास्थळी पोहचुन २५ सांपाच्या पिलांना आणि ७ फुटाचा नाग यांचा नागरिकांपासून बचाव करत जंगलात सोडून जीवनदान दिले.

गावकरी नागरिकांना काहीही नुकसान न होता सर्पेमित्र टीमने बचाव केला व सापांना जंगलात सोडून जीवनदान दिले ही मोठी धाडसी कामगिरी मानावी लागेल. सर्पमित्र टीम ही नरखेड तालुक्यात साप पकडण्याचे धाडसी काम करून नागरिकांचा बचाव करतात.

कोणतेही प्राणी असो साप, पक्षी, जीव घेणी प्राणी असो, जमखी अवस्थेत सुद्धा असल्यास त्यांना जीवदान देण्याचे काम करतात आपल्या परिसरात अशा घटना घडल्यास सर्पेमित्र टीम ला ९७६६१५६५९५ ९०२८९१८८६०, या नंबर वर फोन करा असे आवाहन सर्पमित्र टीमने नागरिकांना केले.

# प्रसेनजीत गायकवाड यांच्या पुढाकाराने सात विद्यार्थ्यांचा जिल्हा परिषद शाळेत प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

उमरेड पंचायत समिती अंतर्गत मकरधोकडा येथील जि.प. प्राथ. शाळा क्रमांक दोन मध्ये वीस विद्यार्थ्यांचा शाळेत प्रवेश होणार होता. पण शिक्षकांच्या प्रयत्नाने केवळ दहा विद्यार्थ्यांनी या शाळेत प्रवेश घेतला.



ऐनवेळी पालक भेटी घेऊन समुपदेशन करून इतर शाळात प्रवेशित होणारी सात बालके तत्काळ प्रवेशित करण्यात आली. बालरक्षण समन्वयक प्रसेनजित गायकवाड यांच्या समुपदेशनाने दोन पालकांनी इतर शाळा प्रवेशित असलेल्या आपल्या पाल्यांच्या टीसी तत्काळ काढून जिल्हा परिषद शाळेत प्रवेश घेतला. इतर एका पालकांनीही इयत्ता दुसरी मध्ये तत्काळ प्रवेश मागितला.

## मुद्रा इव्हेंट्सतर्फे दर्जेदार कार्यक्रमाचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

आज साई सभागृह येथे, संध्याकाळी ६:०० वाजता "सुरों का सफर" हा कार्यक्रम शंकर जयकिशन पासून शंकर महादेवन पर्यंतच्या विविध संगीतकारांच्या गाण्यांचे सादरीकरण मुद्रा इव्हेंट्सतर्फे करण्यात येणार आहे. मुकुल पांडे सह रचना पंजाबी, सोनाली अय्यर, गार्गी मोरोणे, सवित्र पोफळी, डॉ. ऋचा येनूरकर, कीर्ती डोकरीमारे, मनिषा काशीकर सादर करतील. कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन पोलिस आयुक्त डॉ. राजेंद्र सिंघल, सुलेखा कुंभारे, संजय भेंडे आविष्कार कला संस्था संचालक स्मिता जोशी, सुप्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर, डॉ. विकास महात्मे करणार आहेत. या कार्यक्रमाला सूत्र संचालन शुभांगी रायलू यांचे आहे. संगीत नियोजन नागपूर मधील नामांकित गौरव टांकसळे, महेंद्र ढोले, आनंद मास्टे, नंदू गोहणे, प्रमोद बावने, अनिकेत दहेकर हे आहेत. तसेच या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती खासदार नितीन गडकरी यांची लाभणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन आणि रूपरेषा मुद्रा इव्हेंट्सच्या संचालिका मनिषा काशीकर यांचे आहे व त्यांनी सर्व रसिकांना सपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घ्यावा अशी विनंती केली आहे.

# १६५ वी विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समिती बैठक संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

मंडल रेल उपयोगकर्ता सलाहकार समितीची १६५ वी बैठक दिनांक २६ जून २०२५ रोजी आयोजित करण्यात आली.

या बैठकीस विविध भागांतून आलेले अनेक मान्यवर सदस्य उपस्थित होते.




त्यामध्ये सुनील हरिप्रसाद जेजानी (नागपूर), डॉ. मिलिंद भानुदास दाभेरे (चंद्रपूर), मोहन (बेतूल), रमेश परसरामजी जिचकार (अमरावती), नितीन पुरुषोत्तमराव लोंकार (नागपूर), गणेश सैंदाने (चंद्रपूर), नितीन नरेंद्र मुकेवार (नागपूर), सत्यव्रत रामानुज पटनायक (नागपूर), सुरेश रामदासपंत डोंगे (नागपूर), नितीन मधुकरराव तिनखेडे (नागपूर), प्रविण वसंतराव शिंदे (यवतमाळ) यांचा समावेश होता.

बैठकीची सुरुवात वरिष्ठ मंडल वाणिज्य व्यवस्थापक अमन मित्तल यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यानंतर मंडल रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांनी मंडलातील यशस्वी कामगिरीवर प्रकाश टाकला आणि रेल्वे प्रवाशांसाठी सुविधा वाढवण्यासाठी सल्लागार सदस्यांकडून मिळणाऱ्या मौल्यवान सूचना यांचे कौतुक केले. गर्ग यांनी सांगितले की, मध्य रेल्वेचे नागपूर मंडल हे भारतीय रेल्वेचे एक महत्त्वाचे मंडल आहे, जे पूर्वेकडून पश्चिम व उत्तरेकडून दक्षिणेला जोडते. त्यांनी असेही सांगितले की नागपूर मंडल माल वाहतुकीच्या क्षेत्रात मोठे योगदान देत आहे, ज्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळत आहे.

गर्ग यांनी नागपूर मंडलामध्ये अंमलात आणलेल्या काही महत्त्वाच्या उपक्रमांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की अलीकडेच नागपूर-सिकंदराबाद वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ करण्यात आला असून, रिद्धीपूर हाल्ट स्थानकावर मेमू गाडी थांबविण्यात आली आहे. नागपूर स्थानकावर प्रवासी माहिती कीओस्क बसविण्यात आले असून, वेंडर मॅनेजमेंट सिस्टीम ॲप विकसित करण्यात आले आहे. तसेच तिसऱ्या व चौथ्या लाईनच्या बांधकाम प्रकल्पातही लक्षणीय प्रगती झाली आहे.

बैठकीदरम्यान मान्यवर सदस्यांनी आपले मौल्यवान सुझाव दिले, जे प्रशासनाने गांभीर्याने ऐकून भविष्यात अंमलात आणण्याचे आश्वासन दिले. या बैठकीस अपर मंडल रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) अमोल कुमार पिंगळे, अपर मंडल रेल्वे व्यवस्थापक (यांत्रिक) अरुण कुमार सिंह, मुख्य प्रकल्प व्यवस्थापक नवीन पाटील तसेच इतर विभागीय अधिकारी उपस्थित होते.

## एसटीची माल वाहतूक बंद होणार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपुर, दि. २७ :

एसटी महामंडळाची कमाईपेक्षा खर्च वाढल्याने आता राज्य परिवहन महामंडळाची माल वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाच्या गणेशपेठ येथील एसटीची माल वाहतूक लवकरच बंद होणार असल्याने नागरिकांना आपला माल इतर वाहनातून पाठवावा लागणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या महसूल वाढीसाठी माल वाहतूक सेवा सुरु करण्यात आली होती. मात्र गत पाच महिन्यांत केवळ लाख रुपयांचे उत्पन्न माल वाहतूकीतून मिळाले आहे. एकंदरीत या व्यवहारात खर्च अधिक असल्याने एसटी महामंडळाने माल वाहतूक सेवा इतिहासजमा करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळाच्या नियमांमध्ये प्रवासी वाहतुकीसह मालवाहतूक करण्याचा समावेश आहे. याचा आधार घेत २०१९ मध्ये मालवाहतूक सुरू करण्याबाबत चाचपणी सुरू करण्यात आली. आठ वर्षे पूर्ण झालेल्या प्रवासी बसचे मालवाहतूक ट्रकमध्ये रूपांतर करण्यात आले होते. एप्रिल २०२४ ते मे २०२५ या कालावधीत एप्रिल आणि मे महिना वगळता अन्य महिन्यात एक कोटींचा टप्पाही मालवाहतुकीला ओलांडता आला नाही.

# बोथिया पालोरा येथे राणी दुर्गावती यांचा बलिदान दिवस साजरा

■ महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. २७ :

महाराणी विरांगना राणी दुर्गावती यांच्या ४६१ व्या बलिदान दिनानिमित्त देवलापार परिसरासह बोथिया पालोरा येथे बलिदान दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने राणी दुर्गावती यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच 'जय राणी दुर्गावती'च्या गगनभेदी घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा गोंडवाना गणतंत्र पार्टीचे प्रदेश अध्यक्ष हरीष भाऊ उईके, आसाराम मसराम, गोंडी भुंमक, जगन्नाथ कुंमरे, अरुण लांजेवार, शिवप्रसाद कुंमरे, गयान्सिंग खंडाते, सुदाम कुमरे, मनोज पंधरे, शेखर भलावी, राधेश्याम वरठी, दीनानाथ कुमरे, गुलाब भलावी, हरीचंद भलावी, चंद्रकला कुंमरे, सुनीता इनवाते, मीना परतेती, संगीता वरठी, आशा कुमरे, शिला कुंबरे, शोभा कुमरे कुलवंती कुंबरे माया वाडीवे तसेच गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. राणी दुर्गावती यांच्या शौयार्चा आणि बलिदानाचा गौरव करत नागरिकांनी त्यांचे स्मरण केले.

## माहेश्वरी युवा संघटनेतर्फे मानसिक आरोग्य चर्चासत्र

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

माहेश्वरी युवा संघटना, सीताबर्डी (संलग्नः माहेश्वरी पंचायत, सीताबर्डी, नागपूर) द्वारे युवा संघटनेचा सुवर्ण महोत्सव नवीन वर्षाच्या निमित्ताने, मानसिक आरोग्याशी संबंधित "नो स्ट्रेस, बस एक्सप्रेस!" या विशेष चर्चासत्राचे आयोजन २९ जून २०२५ रोजी सकाळी १०:०० वाजता श्री कुंदनलाल चांडक भवन, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित केले आहे. कार्यक्रमातील प्रमुख वक्तेः डॉ. आभा बंग सोनी आणि डॉ. प्रीतम चांडक (बाल आणि किशोर मानसोपचारतज्ज्ञ) मार्गदर्शन करतील. हा कार्यक्रम मुलांसाठी आहे. माहेश्वरी युवा संघटना, सीताबडीर्चे अध्यक्ष शैलेश मोक्ती, सचिव एस.आय.अखिल राठी, युवा संघटन सुवर्णमहोत्सवी महोत्सवाचे प्रमुख - हिमांशू चांडक, प्रकल्प समन्वयक ललित तावरी (मोबाइलः ९८२३१५४९८७), आणि सर्व माहेश्वरी तरुण संस्थेच्या कार्यकारिणी यांनी सर्वांना त्यांच्या कुटुंबासह, मुलांसह या चर्चासत्रात उपस्थित राहण्याची विनंती केली आहे.

## नागपूर विभागाच्या टीआरडी विभागामार्फत उच्च-दाब विद्युतरोधक सुरक्षा बूटांची खरेदी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन विभागाने त्यांच्या आघाडीवरील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, उच्च-दाब विद्युतरोधक सुरक्षा बूटांची खरेदी केली आहे. हे विशेष प्रकारचे बूट 25 ते 27 किलोव्होल्ट ('श) या श्रेणीतील ओव्हरहेड उपकरणांच्या (डलूए) देखभाल व दुरुस्ती कार्यात कार्यरत कर्मचाऱ्यांसाठी तयार करण्यात आले आहेत. या बुटांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यांची डाई-इलेक्ट्रिक क्षमता, जी 30 किलोव्होल्टपर्यंत विद्युत झटक्यांपासून परिणामकारक संरक्षण देते. त्यामुळे विद्युतीय अपघातांचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो. याशिवाय, या बुटांमध्ये स्लिप-रेसिस्टंट सोल्स आहेत, जे ओले किंवा पावसाळी हवामानात देखील भक्कम पकड देतात. फील्डमधील कामाच्या वेळी ही बाब अत्यंत महत्त्वाची असते. या अत्याधुनिक सुरक्षा बुटांच्या माध्यमातून टीआरडी विभागाने सुरक्षित व संरक्षित कामकाजाचे वातावरण निर्माण करण्याच्या आपल्या कटिबद्धतेला अधोरेखित केले आहे. मध्य रेल्वे, नागपूर विभाग आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत असून सतत तांत्रिक प्रगती आणि सर्वोत्तम कार्यपद्धती अंगीकारण्याचा प्रयत्न करीत आहे.

## शरद बावनकुळे यांचे निधन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :



शहरातील प्रतिथयश नागरिक श्री. शरद बावनकुळे (वय ७३) यांचे गुरुवार, २६ जून २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने बावनकुळे परिवार आणि स्नेही मंडळींमध्ये शोककळा पसरली आहे. कै. बावनकुळे यांनी आपल्या आयुष्यात सामाजिक बांधिलकी जपली. त्यांनी माधव नेत्रालय येथे नेत्रदान करून समाजासमोर एक आदर्श उदाहरण ठेवले आहे.

त्यांच्या या परोपकारी कार्यामुळे अनेकांना दृष्टी मिळणार आहे.

त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी वृंदावन गार्डन, खामला येथील त्यांच्या निवासस्थानी ठेवण्यात आले आहे. अंत्ययात्रा शुक्रवार, २७ जून २०२५ रोजी सकाळी ०९:३० वाजता वृंदावन गार्डन येथील निवास स्थानावरून निघाली आणि सहकार नगर मोक्षधाम येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. कै. शरद बावनकुळे यांच्या पश्चात दोन सुपुत्र, डॉ. निशांत आणि इंजिनिअर विक्रांत, आप्त परिवार आहे.

# काटोलमध्ये 'प्राइड ऑफ विदर्भ २०२५' मॉडलिंग शो थाटात




■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. २७ :

विदर्भातील नवोदित आणि ग्रामीण भागातील कलावंतांना व्यावसायिक ग्लॅमर व मॉडलिंग क्षेत्रात संधी मिळावी, या हेतूने KSM Group व Galaxy Events यांच्या संयुक्त विद्यमाने प्राइड ऑफ विदर्भ 2025 हा भव्य मॉडलिंग शो काटोल शहरात थाटात आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक मयूर मुरोडिया आणि पूर्वा बारई असून, त्यांच्याच संकल्पनेतून या अभिनव उपक्रमाची कल्पना प्रत्यक्षात उतरवण्यात आली. या कार्यक्रमात 4 वर्षांपासून ते प्रौढ वयोगटांपर्यंतच्या स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यामुळे विविध वयोगटातील स्पर्धकांना आपले कलागुण सादर करण्याचे अनोखे व्यासपीठ मिळाले. प्रमुख पाहुणे म्हणून वंदनाताई चरणसिंग ठाकूर, सुप्रसिद्ध फॅशन कोरिओग्राफर हनी खट्टर, आंतरराष्ट्रीय मंचावर झळकलेली मॉडेल निशिता सुवर्णा, आणि युवा समाजसेवक व उद्योजक श्रुती सोरटे, नायब तहसीलदार भागवत पाटील मंचावर उपस्थित होते.

हनी खट्टर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विदर्भात अपार टॅलेंट आहे. गरज आहे योग्य व्यासपीठाची आणि आयोजकांनी ते उत्तमरित्या उपलब्ध करून दिलं आहे.

विजेत्यांना आकर्षक ट्रॉफी, प्रमाणपत्र व विशेष सन्मान चिन्ह देण्यात आले. त्याचबरोबर निवडक स्पर्धकांना पुढील राज्यस्तरीय शोसाठी शॉर्टलिस्टही करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या मागे असलेली टीम हीच खरी ताकद ठरली. KSM Group चे निहाल कुमेरिया, निखिल मुरोडिया, आशीष ची चोरिया, कबीर कुमेरिया, गौरव खिरवार, हिमांशू नाईक, अनिकेत कुमेरिया, खुशील कुमेरिया यांनी संपूर्ण वेळेचे नियोजन, व्यवस्थापन, स्पर्धकांची मदत व कार्यक्रमाची पारदर्शकता राखली.

त्याचप्रमाणे Galaxy Events कडून कोरिओग्राफर राहुल कांबले, सावरकर व संदीप वांजारी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे संयोजन, सौंदर्य व फिनिशिंग टच उत्तम प्रकारे दिला.

कार्यक्रमासाठी काटोल परिसरातून शेकडो नागरिक, स्पर्धकांचे पालक व कुटुंबीय, मीडिया प्रतिनिधी व सौंदर्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमात टाळ्यांचा गजर, सेल्फीचा वर्षाव आणि आनंदमय वातावरण पाहायला मिळाले

**Kids Princess २०२५ :**
1st : वेदश्री गिराडकर
2nd : आस्था मोरोलीया
3rd : आराध्या रहाटे

**Kids Prince २०२५ :**
1st : आरव घोर्से
2nd : रिधान तिवासकर
3rd : हिराम सावरकर

**Miss २०२५ :**
1st : गर्गी पुनसे
2nd : माधुरा साठोणे
3rd : मैथिली गाढवे

**Mrs २०२५ :**
1st : पूर्णिमा गिरी
2nd : मनीषा पांचेश्वर
3rd : विनिता गंगभोज

**Mister २०२५ :**
1st : अमन पठाण
2nd : शैलेश कुमार
3rd : रोहित प्रजापती

कार्यक्रमाच्या शेवटी आयोजक मयूर मुरोडिया आणि पूर्वा बराई यांनी सांगितले की, विदर्भात चमकणारी प्रतिभा आहे - त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहचवणं हेच आमचं ध्येय आहे. 'प्राइड ऑफ विदर्भ' ही केवळ स्पर्धा नाही, ती एक चळवळ आहे. आत्मविश्वास आणि स्वप्नांची!

# धरती आबा जनभागीदारी अभियान अंतर्गत आदिवासी बहुल गावात शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. २७ :

प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय उन्नत ग्राम अभियान अंतर्गत तालुका प्रशासनाच्या वतीने अभियानात निवड झालेल्या अनुसूचित जमाती बहुल अश्या इंदापूर आलेसुर, वणी, कवडसी बरड ह्या गावांमध्ये जनजागृती व लाभ वाटप शिबीराचे आयोजन आज २७ जून शुक्रवारला सकाळी अकरा वाजता करण्यात आले होते. यावेळी गट विकास अधिकारी डॉ. चेतन जाधव, नायब तहसीलदार प्रवीण राठोड,कल्याणी वैद्य व सर्व विभाग प्रमुख होते.




ह्या विशेष शिबिरात संजय गांधी निराधार योजना मंजुरी पत्र, शबरी आवास योजना मंजुरी पत्र, उत्पन्न दाखले वाटप करण्यात आले. शेतकऱ्यांना फार्मर आयडी तयार करून देण्यात आले. तसेच आरोग्य विभागकडून मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

शिबिरात महसूल, कृषी, पंचायत समिती, शिक्षण, आरोग्य,महिला बाल कल्याण, आदिवासी विकास प्रकल्प, सहकारी बँक, वन विभाग या विविध विभागामार्फत आदिवासी समूहासाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती संबंधित विभाग अधिकारी यांनी उपस्थितांना दिली. नायब तहसीलदार प्रविण राठोड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. चेतन जाधव यांनी सदर अभियान व ग्राम विकास विभागाच्या योजना बाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

**नावात बदल**

मी, दिपावली त्रिंबक चकोले वरून माझे नाव दिपाली सुरेश अवचट असे बदलले आहे. आणि माझा पत्ता : 29, नवनाथ आयटीआय कॉलेज, सर्वश्री नगर, उमरेड रोड, दिघोरी, बेसा, नागपूर हे भविष्यातील सर्व उद्देशांसाठी वैध असेल.

# विद्यार्थ्यांना विज्ञानाची सफर घडविणारी यंग कलाम डिस्कवरी सायंस सेंटर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :




नागपूर महानगरपालिकेने एचसीएल फाऊंडेशन आणि एसईडीटी यांच्या सहकार्याने रामदासपेठेतील हिंदी मोर शाळेत यंग कलाम डिस्कव्हरी सायंस सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. या विज्ञान केंद्रात ५ वी ते १० वीतील विद्यार्थ्यांना विज्ञानाच्या विविध शाखांबद्दल माहिती दिली जाते व त्यातून मिळालेल्या ज्ञानावर आधारित वस्तुनिष्ठ परीक्षा घेऊन त्यांची चाचणी घेतली जाते. यातून महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड व विज्ञान दृष्टीकोन दृढ होण्यास मदत होत आहे. विशेष म्हणजे, केंद्राच्या उभारणीसाठी एचसीएल फाऊंडेशन द्वारे अर्थसहाय्य केले जात असून, सोशल इकोनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्टची ही संकल्पना आहे.

विज्ञान क्षेत्रात झालेले बदल आणि विज्ञानाची अनोखी दुनियेचे दर्शन घडविणारी सफर यंग कलाम डिस्कवरी सायंस सेंटरमध्ये घडविली जाते. नवे प्रयोग दाखविणारी डिस्कवरी सायंस सेंटर विद्यार्थ्यांना विज्ञानाची अधिक भुरळ घालते. त्याचबरोबर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण करण्यासह वैज्ञानिक घडविण्यास मोठा हातभार लावला आहे.मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी आणि अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी. यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शिक्षणाधिकारी श्रीमती साधना सयाम यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी विविध प्रयत्न केले जात आहेत. नुकतेच या केंद्राला आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी भेट देत कार्याचे कौतुक केले होते.

एचसीएल फाऊंडेशनच्या परभणी येथील केरवाडी केंद्रातील विज्ञान प्रयोग आणि साहित्य नागपूरच्या या केंद्रात आणण्यात आले आहे. मनपा आणि एचसीएल यांच्यात २०१७ पासूनच या केंद्राच्या माध्यमातून मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची रुची वाढवण्यावर आणि त्यांना वैज्ञानिकदृष्ट्या जागरूक करण्यावर काम केले जात आहे. पूर्वी हे केंद्र इतवारी येथील लालगंजमध्ये होते, जे २०१९ मध्ये बॅरिस्टर शेषराव वानखेडे विद्यानिकेतन, रामदासपेठ येथे हलवण्यात आले. मनपाने या केंद्रासाठी तीन वर्गखोल्या उपलब्ध करून दिल्या आहेत, ज्यांचे प्रयोगशाळेत रूपांतर करण्यात आले आहे.

यंग कलाम डिस्कवरी सायंस सेंटरच्या तीनही प्रयोगशाळेत रसायनशास्त्र, जीवशास्त्र, भौतिक शास्त्रातील,खगोलशास्त्र व इतर शास्त्राचे विविध प्रयोगाचे अदभूत दर्शन होते. विद्यार्थ्यांमध्ये कुतहूल निर्माण व्हावी याकरीता विद्यार्थ्यांना प्रयोग करण्याची संधी मिळते. मनपाच्या शाळेतील पाचवी ते १० वीच्या विद्यार्थ्यांना सर्वप्रथम या केंद्रात आल्यावर त्यांची अर्धा तासात 30 गुणांची वस्तुनिष्ठ परीक्षा घेतली जाते. त्यानंतर परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना त्यांचे गुण सांगितले जाते. पुढे तीनही लॅबमध्ये विद्यार्थ्यांना केंद्रातील फॅसिलेटर निखिल लक्षणे आणि कालीदास नाकाडे व इतर सहकारी यांच्यामार्फत माहिती दिली जाते. प्रत्येक विज्ञान प्रयोगाची सविस्तर माहिती दिली जात असल्याने वर्गात शिकलेल्यापेक्षा विद्यार्थ्यांना कृतीतून अधिक माहिती मिळते. सोशल इकोनॉमिक डेव्हलपमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य कुळकर्णी आणि एचसीएल फाऊंडेशन व्यवस्थापक श्री. पियुष वानखेडे यांच्या देखरेखीत उत्तम कार्य केले जात आहे.

शाळेतही आपण हेच शिकलो पण प्रत्यक्ष कृतीतून आणि नजरेखालून प्रयोग गेल्याने विद्यार्थ्यांचा आनंदही द्विगुणित होत असतो. तसेच केंद्रातही विविध प्रयोग करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळत असते. विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची, हुशारीची परीक्षा या प्रयोगातून घेतली जाते.

**न्यूटनचा सिद्धांत, विविध खेळामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर**

यंग कलाम डिस्कवरी सायंस सेंटरतर्फे तीनही वर्ग खोल्यात प्रयोगशाळा तयार करण्यात आली आहे. या तिन्ही प्रयोग शाळेत चंद्रग्रहण, सूर्यग्रहन, पवनचक्की, सोलार, आर्किमिडीजचा सिद्धांत, दृष्टीभ्रम, पिरिऑडिक टेबल, न्यूटनची रंग तबकडी, टॉवर ऑफ पिसा, डीएनए, ह्युमन बॉडी पार्ट, न्यूटॉनचा सिद्धांत,अंतवर्क, बहिवर्क, विविध गेम्स, विविध इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वॉटर हार्वेस्टिंग, वसुंधरा, मातीचे विविध प्रकार सह अनेक विज्ञानाविषयी माहिती या सेंटरमुळे मिळत असल्याने विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकत आहे.

# द.पू.म.रेल्वे, नागपूर मंडळाच्या राजभाषा कार्यान्वयन समितीची बैठक आयोजित



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

दक्षिण पूर्व मध्य रेल्वे, नागपूर मंडळाच्या राजभाषा कार्यान्वयन समितीची वर्ष 2025 मधील दुसरी बैठक दिनांक 26.06.2025 रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठक विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (परिचालन) व अतिरिक्त प्रमुख राजभाषा अधिकारी श्रीकांत प्रे. चंद्रिकापूरे, प्रमुख प्रकल्प व्यवस्थापक - गति शक्ति युनिट ए. के. सूर्यवंशी तसेच विविध विभागांचे शाखाधिकारी / त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीच्या पहिल्या टप्प्यात, जानेवारी ते मार्च 2025 या तिमाहीत दोन कर्मचाऱ्यांनी शासकीय कामकाज राजभाषा हिंदीत केल्याबद्दल त्यांना उत्कृष्ट ठरवून, विभागीय रेल्वे व्यवस्थापक दीपक कुमार गुप्ता यांच्या हस्ते विभागीय रेल्वे व्यवस्थापक राजभाषा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या बैठकीत 31 मार्च रोजी संपलेल्या तिमाहीच्या राजभाषा प्रगतीबाबत विविध मुद्द्यांवर चर्चा व पुनरावलोकन करण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी श्रीकांत प्रे. चंद्रिकापूरे यांनी समितीच्या अध्यक्षांसह सर्व सदस्यांचे मनःपूर्वक स्वागत केले. त्यांनी शाखाधिकाऱ्यांना संबोधित करताना सांगितले की, तांत्रिक शब्द लिहिताना विशेष काळजी घेतली पाहिजे जेणेकरून कोणतीही गोंधळाची परिस्थिती निर्माण होणार नाही. यासाठी तांत्रिक स्वरूपाच्या इंग्रजी शब्दांना देवनागरी लिपीत लिहिणे हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. तसेच हिंदीत काम करताना अगदी सोप्या व सहज शब्दांचा वापर केला पाहिजे.

आपल्या अध्यक्षीय भाषणात दीपक कुमार गुप्ता यांनी राजभाषा नियम 1976 च्या अनुपालनाबद्दल समाधान व्यक्त केले व ते सातत्याने पाळले जावे यासाठी सूचनाही दिल्या. शाखाधिकाऱ्यांनी कलम 3 (3) अंतर्गत दस्तऐवज हिंदी-इंग्रजी द्विभाषिक स्वरूपात प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले आणि हे कार्य कोणत्याही परिस्थितीत सुरू ठेवावे असा सल्ला दिला. तसेच, जनतेशी संबंधित माहिती राजभाषा नियमांनुसार प्रसिद्ध करण्यात कोणतीही ढिलाई न करण्याचा त्यांनी आग्रह धरला. त्यांनी मंडळातील राजभाषेच्या प्रचार-प्रसार व अनुपालनाच्या प्रगतीवर समाधान व्यक्त केले.

# बाल संरक्षण अधिकाऱ्यांकडून ४९ बालमजुरांना संरक्षण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २७ :

जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीत जिल्हा महिला व बालकल्याण विभागाचे संरक्षण अधिकारी यांनी 49 बालमजुरांना संरक्षित केले तर 36 बालविवाह थांबविण्यात त्यांना यश आले आहे. गेल्या पाच महिन्यात कामगार आयुक्त विभागाकडून 11 बालमजुरांची सुटका करण्यात आली.

बालकांचे हक्क व अधिकारानुसार 0 ते 18 वयोगटातील मुलांना बालक असे म्हणतात. बालकांचे हक्क व अधिकार या कायद्यानुसार बालकांचा जगण्याचा अधिकार, विकासाचा अधिकार, सहभागाचा अधिकार याची जपणूक होणे आवश्यक आहे. परंतु गरिबी, मुलांना सांभाळण्याचा प्रश्न, स्थलांतरण, रूढी व परंपरा यामुळे बालकांच्या अधिकारांचे संरक्षण होताना दिसत नाही. त्यामुळे बालमजुरी व बालविवाह सारख्या घटना अजूनही घडताना दिसतात.

सर्वेक्षणानुसार असे आढळले आहे की 30 मजुरांमागे साधारणतः पाच बालमजूर आढळून येतात. याचाच परिणाम म्हणून जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 पर्यंत महिला व बालकल्याण विभागाकडून 49 बालमजुरांना संरक्षण देण्यात आले आहे तर 36 बालविवाह थांबविण्यात यश मिळाले आहे.

26 भिक्षेकरी मुलांची सुटका करण्यात आली आहे. अप्पर कामगार आयुक्त विभागाकडून 11 बालमजुरांची मुक्तता गेल्या पाच महिन्यात करण्यात आली आहे. आईस्क्रीम पार्लर, हॉटेल्स, गॅरेज येथून या बालमजुरांची मुक्तता करण्यात आली आहे.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**नागपूर :** ट्रकच्या चालकाने निष्काळजीपणे व भरधाव वाहन चालवून मोटारसायकलला धडक दिली. या गंभीर जखमी मोटार सायकलस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. दीपककुमार शाहू (35) रा. सदुरूनगर, पारडी असे मृताचे नाव आहे. गुरूवारी सकाळी 5.20 वाजताच्या सुमारास दीपक एमएच-22/ई-9593 क्रमांकाच्या मोटारसायकलने कामावर जात होता. जबळपूर महामार्गावर बाराद्वारी चौकाजवळ भरधाव असलेल्या अज्ञात ट्रकच्या चालकाने दीपकच्या वाहनाला जबर धडक दिली आणि पळून गेला. ट्रकखाली आल्याने दीपक गंभीर जखमी झाला. स्थानिक नागरिकांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. दीपकला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले.




**नागपूर : मागील अनेक दिवसांपासून दडी मारलेल्या वरूण राजाचे आता आगमन झाले असून, नागपूर शहरातही पाऊस बरसू लागला आहे. परिणामी, कामानिमित्त बाहेर पडलेल्या नागरिकांची तारांबळ उडू लागली आहे.**

# आकाश फाउंडेशनच्या माध्यमातून मेडिकल एज्युकेशन फेअरचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २७ :

NEET परीक्षेचा निकाल घोषित झाल्या बरोबर विद्यार्थ्यांना प्रवेशाबाबत योग्य माहिती उपलब्ध असने गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना विदेशामध्ये MBBS वैद्यकीय अभ्यासक्रम व त्याची प्रवेश प्रक्रिया माहिती व्हावी. या दृष्टिकोनातून विदर्भातील सर्वात मोठा विदेशामध्ये वैद्यकीय शिक्षण व शिष्यवृत्ती योजनाची माहिती संदर्भात कार्यक्रम - मेडिकल एज्युकेशन फेअर आयोजित केलेला आहे. सदर कार्यक्रम दिनांक 29 जुन 2025 रोज दुपारी 11.00 वाजता पासून 6.00 वाजे पर्यंत, हॉटेल जिंजर सिटी सेंटर, कॅनल रोड, रामदासपेठ, नागपुर येथे आयोजित केलेला आहे.

कार्यक्रमामध्ये जॉर्जिया मधील कॉलेजचे वाईस रेक्टर तथा एडमिशन इंचार्ज उपस्थित राहतील. विदेशातील युरोप येथील रोमेनिया, उझबेकिस्तान, कजाकिस्तान, किर्गिस्थान, रूस या देशातील शासकीय व प्रायव्हेट मेडिकल कॉलेजचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. विदेशामध्ये टइइर करण्याकरिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मध्ये हॉस्टेल सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येते तसेच नीट मधील मार्क नुसार स्कॉलरशिप देण्यात येते.

# कुही शहरातील अंगणवाड्यांची दुर्दशा

**इमारतींची दुरवस्था.., असमाजिक तत्त्वांचा वावर**

■ महासागर प्रतिनिधी
कुही, दि. २७ :



नगरपंचायत कुही अंतर्गत येणाऱ्या कुही शहरातील अकरा ही अंगणवाड्यांची परिस्थिती बिकट असून त्यांची अत्यंत दुर्दशा झालेली दिसून येते. या अंगणवाड्यांची देखभाल दुरुस्ती व लाईटची व्यवस्था करण्याबाबत निवेदन नगरसेवक राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटनेता विनोद हरडे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे. प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट जिल्हाध्यक्ष प्रवीण कुंटे पाटील अविनाश गोतमारे उपस्थित होते.

नागपुर जिल्हा परीषदेच्या अंतर्गत येणाऱ्या नगर पंचायत कुही शहरातील 17 प्रभागात एकूण 11 अंगणवाड्या आहेत. यातील एकही अंगणवाडी चांगल्या अवस्थेत दिसून येत नाही. अंगणवाड्या अत्यंत दुरावस्थेमध्ये आहेत. अंगणवाड्यांमध्ये लाईट, पंखे या सारख्या सुविधा नाहीत. बऱ्याच अंगणवाड्यांच्या खिडक्यांच्या काचा फुटलेल्या आहेत. तसेच दरवाजे नसल्याने बाहेरील असामाजीक तत्व घाण करतात. अंगणवाडी केंद्रामध्ये लहान मुले शिकतात. परिसराची दुरावस्था व घाणीमुळे लहान मुलांच्या आरोग्यास धोका निर्माण होतो. ज्यामुळे मुलांच्या शिक्षणावर आणि आरोग्यावर परिणाम होत आहे. अनेक अंगणवाड्यांच्या इमारतींची दुरवस्था झाली आहे, भिंतींना तडे गेले आहेत, छत गळके आहेत, आणि सुविधांचा अभाव आहे. यामुळे, मुलांचे आरोग्य धोक्यात आले आहे. आणि शिक्षणातही अडचणी येत आहेत.

**अंगणवाड्यांची दुर्दशा होण्याची कारणे:**

अनेक अंगणवाड्यांच्या इमारती जुन्या झाल्या आहेत, त्यांची डागडुजी झालेली नाही, आणि काही ठिकाणी तर धोकादायक स्थितीत आहेत. पावसाळ्यात छत गळल्यामुळे मुलांना ओल्यात बसावे लागते. ज्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येते. अनेक अंगणवाड्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही, स्वच्छतागृहांची व्यवस्था नाही. आणि खेळण्यासाठी पुरेसा परिसर नाही. अंगणवाड्यांची नियमितपणे देखभाल आणि दुरुस्ती करण्याची गरज आहे. परंतु अनेक ठिकाणी याकडे दुर्लक्ष केले जाते. या दुर्दशेमुळे मुलांच्या शिक्षणात आणि आरोग्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे, अंगणवाड्यांची दुरुस्ती करणे आणि आवश्यक सुविधा पुरवणे गरजेचे आहे.

## महासागर — प्रभाग वार्ता —

# ओम नगरात रस्त्यांची दुर्दशा



■ प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. २७:

प्रभाग क्र. १ ओमनगर येथील इरोज सोसायटीतील रस्त्याची अक्षरशः दुर्दशा झाली असून नागरिकांना या रस्त्यावरून ये जा करणे कठीण झाले आहे.

चार वर्षांपूर्वी या परिसरातील नाल्यावर पूल तयार करण्यात आला. कच्चा रस्ता तयार करण्यात आला होता. डांबरीकरण न केल्याने रस्त्यावरील गिट्टी वर आली आहे. स्थानिक नागरिक एल्विन गायकवाड यांनी सांगितले की, पावसामुळे रस्त्यावरील गिट्टी वर आल्याने ये जा करता येत नाही.

त्याचप्रमाणे वाहने घसरून चालकांना दुखापत होते. पुलाच्या काठावर मोठा खड्डा झाला असून त्यावरून वाहन पुढे नेता येत नाही. रस्त्यावर पाणी साचत असल्याने नवीनच डोकेदुखी झाली आहे. प्रशासनाने या रस्त्याचे लवकरात लवकर डांबरीकरण करावे अशी मागणी प्रशांत साखरे, अमोल गजभिये, मुकेश भोतमांगे आदींनी केली आहे.

# मनपाच्या सदर हॉस्पीटलमध्ये सुखसुविधांचा अभाव

■ क्लॉउडीज पीटर
नागपूर, दि. २७:

सदर येथील मनपाच्या दवाखान्यात सुखसुविधांचा अभाव असल्याने रुग्णांना अतोनात त्रास सहन करावा लागतो. सकाळपासून येथे रुग्णांची गर्दी असते. परंतु, डॉक्टर वेळेवर येत नाही. हा प्रकार नेहमीचाच आहे. त्यामुळे रुग्णांना ताटकळत बसावे लागते.

डॉक्टरांच्या कक्षात तुटलेल्या वस्तू भरून ठेवल्या आहेत. त्यामुळे रुग्णांना बसायला जागा नसते. दवाखान्यात काय सुविधा आहेत याचा फलक लिहून ठेवला आहे. परंतु, त्या सुविधा मिळत नाही. त्यामुळे रुग्णांना खाजगी दवाखान्यात जावे लागते. सरकारी दवाखाना असून देखील रुग्णांना आवश्यक.

# नवीन इंदोरा येथे जनसंवाद अभियान सभा



■ महासागर प्रभाग मित्र

**नागपूर, दि. २७ :** भारतीय जनता पार्टी उत्तर नागपूरच्या वतीने प्रभाग ७ मधील नवीन इंदोरा येथे ओमप्रकाश इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली जनसंवाद अभियान सभा घेण्यात आली.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या छायाचित्राला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला भाजपाचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, धर्मपाल मेश्राम, माजी आमदार डॉ. मिलिंद माने, अशोक मेंढे, प्रभाकर येवले, वीरेंद्र कुकरेजा, अश्विनीताई जिचकार, अमित पांडे आणि माजी नगरसेवक दीपक अरोरा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पाहुण्यांनी आपल्या भाषणातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. करोना काळात मोदी यांनी जनतेला भरपूर मदत केली. भाजपाच्या काळात भारतीय संविधान सुरक्षित आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने मोठे कन्वेक्शन सेंटर आणि मुंबईत इंदू मिलच्या जागेवर मोठे स्मारक तयार होत आहे.

कार्यक्रमाचे संचालन राखी मानवटकर यांनी तर संदीप मानवटकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला शिवनाथ पांडे, संजय तरारे, नेताजी गजभिये, रवींद्र डोंगरे, सतीश सिरसवान, मनोज उके, विक्की सहारे, रौनक डुले, शशांक साखरे, सुमीत रामटेके, छोटू गायकवाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रभाग क्र. १६ येथे मोदी सरकारची ११ वर्षे अभियान



■ नरेंद्र देशपांडे
नागपूर, दि. २७:

भारतीय जनता पक्ष प्रभाग १६ च्या वतीने पावनभूमी, उज्वलनगर आणि झेंडा चौक सोमलवाडा येथे मोदी सरकारची ११ वर्षे कार्यक्रम घेण्यात आले.

कार्यक्रमाला रितेश गावंचे, प्रमोद कडू, माजी नक्षरसेविका वनिता दांडेकर, घई प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय प्रभागाचे अध्यक्ष, सचिव, माजी नगरसेवक आणि नगरसेविका देखील उपस्थित होत्या. यावेळी उपस्थित पाहुण्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यप्रणालीवर प्रकाश टाकला. पंतप्रधान मोदी सत्तेवर आल्यापासून भ्रष्टाचार, दहशतवाद, नक्षलवाद कमी होत आहे. सोबतच गरीबांना मोफत धान्य, शेतकऱ्यांना आर्थिक मदत, लाडकी बहीण योजना, देशातील प्रत्येक राज्यात दळणवळणासाठी रस्ते, समृद्धी महामार्ग आणि गडचिरोली सारख्या मागास जिल्ह्यात येणारे प्रकल्प असा सर्वांगिन विकास केला आहे. केंद्रीयमंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नाने या योजना गरीबांपर्यंत पोहचल्या असल्याचे पाहुण्यांनी सांगितले.